**ज्या ग्राहकांना डिशेन ची उत्पादने किरकोळ दुकानातून खरेदी करणे शक्य होत नाही**

**ते ग्राहक त्याची खरेदी**

# ऑनलाईन

**करू शकतात**

# @

# [www.dechane.com](http://www.dechane.com)

**कुरीयर मार्फत औषधे मिळविण्यासाठी ग्राहक खाली उल्लेख करण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ई-मेल वर सुद्धा कंपनीशी संपर्क करू शकतात.**

**08008401669/ 08008401668/24753538**

**ई-मेल – [dechane@hotmail.com](mailto:dechane@hotmail.com)**

**खालील लिंकचा वापर करून ग्राहक आमच्या फिजिशियन्सकडून ऑनलाईन सल्ला घेऊ शकतात**
**[https://dechane.com/lastform/1](https://dechane.com/lastform/1)**
**या मार्गदर्शिकेच्या शेवटी देण्यात आलेल्या नमुन्यानुसार ग्राहक, आम्हाला रूग्णाचे तपशील सुद्धा पाठवू शकतात.**

**प्रस्तावना**

हर्बो-मिनरल औषधाच्या जे ऍण्ड जे डिशेन मार्गदर्शिकेची एक सुधारित आवृत्ती सादर करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे. हर्बो-मिनरल औषधे म्हणजे विविध औषधांचे एक मिश्रण/संयोजन आहे, खूप वेळ वाटून/दळून त्यावर प्रक्रिया केली जाते जेणेकरून आम्ही शिफारस केलेली लहान मात्रा सुद्धा प्रभावी होऊ शकेल.

ही औषधे, प्रभावी आणि जलद क्रिया होणारी असण्यासह, यांमुळे कोणत्याही प्रतिक्रिया होत नाहीत. भारतीतील बहुसंख्य लोकांना परवडावे म्हणून यांच्या किमती नेहमी कमी ठेवण्यात आल्या आहेत. 104 वर्षांपूर्वी डिशेन ने ग्रामीण भागातील आपल्या लोकांच्या गरजांना उत्तर देण्यास सुरवात केली. आज, डिशेन ची औषधे ग्रामीण भागामध्ये आणि शहरांमध्ये लोकप्रिय झाली आहेत. अशा मोठ्या देशातील संवादामधील अंतर मिटविण्यासाठी आमचे मार्गदर्शक विविध भाषांमध्ये उपलब्ध आहेत.

या 104 वर्षांमध्ये मेडिकल प्रॅक्टिशनर (वैद्यकीय चिकित्सक) नी दिलेल्या त्यांच्या सहकार्याबद्दल आम्ही प्रामाणिकपणे त्यांचे आभार मानतो. आम्ही संपूर्ण भारतामध्ये साठवणूकदारांचे एक मोठे आणि विस्तृत जाळे तयार केले आहे. डिशेन ची कोणतीही उत्पादने उपलब्ध न झाल्याच्या घटनेच्या संदर्भात, कृपया त्याबद्दल आम्हाला लिहून कळवा आणि आम्ही यासाठीचा जवळचा साठवणूकदार पाहू किंवा आपल्याशी संपर्क करू शकेल असा प्रतिनिधी एजंट पाहू. अद्ययावत माहिती आणि नवीन उत्पादनांसाठी कृपया आमची वेबसाईट (www.dechane.com) तपासा.

हैद्राबाद,

एप्रिल-2021

## सूत्रीकरणांचे संस्थेनुसार/प्रणालीनुसार वर्गीकरण

### आहार आणि पचन संस्था

| | |
|---|---|
| ऍण्टॅसिडस/पित्तशामक: | मॅग्नाईन |
| अमिबारोधक/अतिसाररोधक: | डयासिन गोळया आणि सिरप/पातळ औषध |
| सोरायसिस: | हर्बिटार्स, आल्बो सांग |
| बद्धकोष्ठता: | स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई, हर्बिटार्स, सॉलफॉस |
| पाचक : | सॉलफॉस, बायो-साल, गॅस्ट्रोमोन |
| यकृत-पित्ताशय उत्तेजक : | हर्बिटार्स |
| कावीळ: | कायनोटोमाईन, हर्बिटार्स |

### हृदय-धमनी संस्था

| | |
|---|---|
| हृदयधमनी विकारासाठीची औषधे: | ऍमिग्लिया |
| उच्च रक्त दाब रोधक: | व्हिटेस्सन, ग्रॅन्डि-को, ऍमिग्लिया |
| रक्ताची गुठळी होणे रोधक: | चिनियमको |
| कोलेस्टेरॉल कमी करणारे: | हाईपसिल |

### मध्यवर्ती चेता संस्था

| | |
|---|---|
| वेदनाशामक / ताप-उतरविणारे: | डेसिल+, फ्लुजेन |
| फेफरे रोधक : | अगर-को, व्हिटेस्सन |
| चिंता रोधक: | नेव्हॉस्स, व्हिटेस्सन |
| चिंता/भिती/ताण कमी करणारे: | व्हिटेस्सन |

### स्नायू-अस्थिचे विकार

| | |
|---|---|
| संधिवात: | रेमोरीन कॅप्स्युल्स आणि तेल |
| स्नायू दुखणे: | डेसिल+, चेसॉल, रबजॉन |
| स्नायू-ऊतींचे विकार: | रबजॉन, चेसॉल,ओलोसिन |
| नसा दुखणे: | डेसिल+, रेमोरीन कॅप्स्युल्स आणि तेल, चेसॉल, व्हिटेस्सन, रबजॉन |
| हृमॅटिक /सांध्यांचा विकार: | डेसिल+, रेमोरीन कॅप्स्युल्स आणि तेल, चेसॉल, रबजॉन |
| रूबेफॅसिएन्टस/वेदना शामक मलम: | रबजॉन, चेसॉल |
| अस्थि रोगासाठीचे: | आल्बो सांग, अल्बोकॅल |

**पोषक**

| | |
|---|---|
| मद्यमापान करणा-यांसाठी (संरक्षक): | आल्बो सांग, हर्बिटार्स |
| भूक वाढविणारे: | सॉलफॉस, बायो-साल, आल्बो सांग, हर्बिटार्स |
| लोह तयार करणारे : | फेरस फ्युमारेट |
| टॉनिक्स/शक्तीवर्धके: | आल्बो सांग, अल्बोव्हिट, आयोबिन, बायो-साल, लिव्हॅक्टिन-जी |
| कॅल्शियम पूरके: | अल्बोव्हिट, अल्बोकॅल, आल्बो सांग |

**त्वचा**

| | |
|---|---|
| सेप्टिक/पू रोधक पावडर घालणे: | सेप्टिक बरे करण्यासाठी घालण्याचे चूर्ण |
| मुरूम/तारूण्यपिटिका: | आयोबिन, गिगि सिरप |
| एक्झिमा/त्वचारोग: | स्किनमेंट, रीपॅन्टो, आयोबिन, हर्बो-सल्फ |
| केसांचे टॉनिक: | ओलोसिन |
| रंगद्रव्याचे विकार: | आयोबिन |
| गजकर्ण/रींगवर्म: | स्किनमेंट |
| सुखदायक आणि संरक्षक: | रीपॅन्टो, आयोबिन, ओलोसिन |
| खरूज: | स्किनमेंट, रीपॅन्टो |

**श्वसन संस्था**

| | |
|---|---|
| घशामध्ये झालेली मांसल गाठ: | आयोबिन, हिमोप्लेक्स, एन्ट्रॉप्स |
| ऍलर्जिक सर्दी/नाक गळणे: | आयोबिन, रबजॉन, चेसॉल |
| खोकला कमी करणारे: | कोफ्लिन, डॅन्जाईन, मेडिटॅब |
| श्वासनलिकेशी संबंधित दमा: | डेस्मा, आयोबिन, मेडिटॅब, कॉफलिनगोळया आणि सिरप |
| ब्रॉन्कायटिस/फुफ्फुसांच्या नळयची सूज: | आयोबिन, मेडिटॅब, चेसॉल, रबजॉन, डेस्मा |
| एपिटॅक्सिस/नाकातून रक्त येणे: | चिनियमको |
| टॉन्सिलायटिस/घशातील गाठ: | डेसिल+, एन्ट्रॉप्स, हिमोप्लेक्स, आयोबिन |
| डांग्या खोकला : | डॅन्जाईन, ऍमिग्लिया |

**प्रजनन-मूत्र संस्था**

| | |
|---|---|
| ऍडाप्टोजेनिक/पुरूषांमधील रजोनिवृत्ती: | आल्बो सांग, सेन्जाईन, नेव्हॉस्स, लिव्हॅक्टिन-जी |
| सिस्टिटिस/मूत्राशयाचा दाह होणे: | तुरैको |
| लघवीचे प्रमाण वाढवणारे: | तुरैको |
| वेदनादायक मासिक पाळी: | औरॅटिनम, ब्रॉम्हडाइन गोळ्या आणि सिरप, चिनियमको, ऍमिग्लिया |
| लघवीतून रक्त जाणे: | चिनियमको |
| श्वेत पदर/अंगावरून पांढरे जाणे: | ब्रॉम्हडाइन गोळया आणि सिरप, आल्बो सांग, औरॅटिनम |
| रजोनिवृत्ती: | व्हिटेस्सन, आल्बो सांग, अल्बोव्हिट, ब्रॉम्हडाइन गोळया आणि सिरप, झहेर-को |
| मासिक पाळीमध्ये जास्त रक्तस्राव होणे: | चिनियमको, ब्रॉम्हडाइन गोळया आणि सिरप, आल्बो सांग |
| लैंगिक न्युरास्थेनिया/दुर्बलता: | सेन्जाईन, नेव्हॉस्स, आल्बो सांग, लिव्हॅक्टिन-जी |
| मूत खडा: | तुरैको |

**सामान्य**

| | |
|---|---|
| ऍन्टिऑक्सिडंट/विषरोधक: | लिव्हॅक्टिन-जी |
| सहायक (चांगले शोषण होण्यासाठीचे): | आयोबिन |
| ऍलर्जिक विकार: | आयोबिन |
| शरीराचा /डोक्याचा मसाज/चोळणे: | ओलोसिन |
| दाताची काळजी घेणे: | आल्बो सांग, दंतमंजन, एन्ट्रॉप्स |
| मधुमेह: | मेर्सिना, लिव्हॅक्टिन-जी, आल्बो सांग गोळया |
| विंचवाने डंख मारल्यास: | झहेर-को, डेसिल+ |
| विषाणूरोधक: | फ्ल्युझेन |

# अंतर आरोग्य

आजच्या अतिशय वेगवान युगामध्ये,

आपण असे मानतो की चांगले

आरोग्य ही देवाची देणगी आहे.

आपल्या पूर्वजांना हे अधिक चांगले माहित होते, त्यांनी

जगण्याची, प्रार्थना करण्याची, संतुलित आहाराची,

व्यायामाची आणि निसर्गातील औषधाची एक प्रणाली

विकसित केली होती.

आपले  अंतर आरोग्य जपण्यासाठी

हर्बो मिनरल औषधे

विकसित करण्यात आली आहेत.

# भाग - I

## वैद्यकीय दृष्टीकोन

प्रामुख्याने ग्रामीण प्रदेशांमध्ये वैद्यकीय मदत देणे या उद्देशाने, जे ऍण्ड जे डिशेन ची सुरूवात 1917 मध्ये झाली. बहुतेक खेडी वैद्यकीय मदतीपासून वंचित आहेत ही सामान्य माहिती आहे. भारत 500,000 खेड्यांची भूमी आहे, आणि एकूण लोकसंख्येच्या 3/4 पेक्षा जास्त लोक या खेड्यांमध्ये राहतात.

आम्ही, मागील 104 वर्षांमध्ये त्यांना परिणामकारक, सुरक्षित आणि किफायतशीर औषधे देऊन या संपूर्ण देशामधील आमच्या लोकांच्या आरोग्यासाठी आणि तंदुरूस्तीसाठी आमचे सर्व प्रयत्न समर्पित केले आहेत. **"गमावलेले आरोग्य पुनर्प्राप्त करणे"** या नावाच्या पुस्तिकेचा अभ्यास करावा अशी आम्ही शिफारस करतो. पोषणातील काही त्रुटी आणि जीवनाची सामान्य तत्वे यांमध्ये सुधारणा करणे हे या पुस्तिकेचे उद्दीष्ट आहे. जीवनावश्यक खुणांची अधिक काळजी घेणे आणि चेता संस्थेमधील बिघाड यावर आम्ही विशेष जोर देतो. **विनंतीवरून, आम्ही ही पुस्तिका पोस्टाने पाठवितो.**

**प्रतिबंध करणे हे उपचार करण्यापेक्षा नेहमी चांगले असते** आणि जर स्थिर आणि चिरस्थायी आरोग्य निर्मिती करण्याकडे आपले लक्ष केंद्रीत करणे शक्य होण्यासाठी सर्वाधिक प्राधान्य दिले गेले तर हा एक विषय आहे. आमचे जीवनमान उंचावण्यास आणि रोग होण्याच्या घटना कमी करण्यामध्ये निश्चित प्रगती करण्यास हे योगदान देईल. सामान्य तक्रारींच्या साध्या वस्तुस्थितींची समज नसल्यामुळे हजारो लोक अनावश्यकपणे स्वत:वर अत्याचार करून घेतात. अनेक रोग लवकर उपचार केल्याने बरे करता येतात, किंवा निवारणा केली जाऊ शकते त्यामुळे, एखाद्याच्या आरोग्य स्थितीबद्दल माहिती नसणे हे हानीकारक आहे.

**प्रत्येक रोगाचे एक कारण असते पण त्याच रोगाच्या प्रत्येक संदर्भामधील हे कारण नेहमी सारखेच नसते.**

सारखे कारण नेहमी सारखेच रोगाचे चित्र तयार करत नाही, किंवा सारख्या रोगाच्या चित्राचे कारण नेहमी सारखेच असत नाही. कोणत्याही रोगामध्ये उपचार करण्याचे कोणतेही नियमित स्वरूप असू शकत नाही, पण येथे नियमित स्थितींच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी नियमित उपाय असू शकतात.

बहुतेक तक्रारींचे कारण खालील कारणांपैकी एक किंवा अधिक असते असे म्हटले जाऊ शकते:

1. अयोग्य पोषण, पचन, एकरूप होणे/मिसळणे आणि निर्मूलन.
2. मानसिक आणि चेतासंस्थेतील बिघाड.
3. रक्ताच्या चित्रामधील बदल.

मानसिक आणि चेतासंस्थेतील बिघाडामुळे जठराशी संबंधित अल्सर (व्रण) होऊ शकतो. मोठ्या प्रमाणातील जुनाट तक्रारी ह्या मानसिक विकाराच्या एका स्थितीमुळे होतात असे मानले जाते.

खराब पचनामुळे डोळयांवर परिणाम होऊ शकतो. चेतासंस्थेतील बिघाडामुळे सुद्धा डोळयांवर परिणाम होऊ शकतो. रक्तामधील बदल सुद्धा डोळयांमधील स्थितीमध्ये बदल घडवू शकतात. त्याचप्रमाणे मानवी संस्थेतील सर्व अवयवांवर वरील कारणांमुळे किंवा कोणत्याही दोहोंच्या संयोजनामुळे किंवा सर्व तिन्ही कारणांमुळे परिणाम होऊ शकतो. अयोग्य पचन किंवा चेतासंस्थेतील बिघाड किंवा रक्ताच्या चित्रामधील बदल यांमुळे दाताच्या समस्या होऊ शकतात.

**रूग्णाच्या रचनात्मक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.**

डोळयांना त्रास होणे, यकृतामधील अनियमितता, बद्धकोष्ठता, फुफ्फुसाचा त्रास, अगदी कान दुखणे, दात दुखणे किंवा एखादा गळू होणे यांसाठी सुद्धा ती विशिष्ट स्थिती सुधारण्यासाठी गणना करण्यात आलेल्या काही नियमित अंतर्गत आणि बाह्य औषधांची आवश्यकता असू शकते, पण रूग्णाच्या रचनात्मक वैशिष्ट्यांचा एक योग्य अभ्यास केल्याशिवाय, हा उपचार पूर्ण होत नाही, किंवा परिणाम समाधानकारक असू शकत नाहीत.

उपचाराचे रचनात्मक आणि उपचारात्मक स्वरूपांचे आमचे संयोजन हा डिशेन च्या औषधांच्या उपचाराचा पाया आहे आणि कदाचित, आमच्या छोट्या कामाच्या यशाचे रहस्य आहे. कोणत्याही रोगासाठी येथे उपचाराचे कोणतेही नियमित स्वरूप असू शकत नाही पण नियमित स्थितींच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी येथे नियमित उपाय आहेत. वेगवेगळ्या लोकांनी विविध क्षेत्रांमध्ये आणि तिमाहीमध्ये प्राप्त केलेल्या आणि विविध दृष्टीने पाहिलेल्या ज्ञानाचे समायोजन करणे हे आमचे ध्येय आहे. सर्व सिद्धांत स्वतंत्रपणे बरोबर असले तरी, त्यांचा ठोक वापर करणे चुकीचे असते, कारण माणूस हा एक जटिल प्राणी आहे. म्हणून संयोजन करण्याच्या आवश्यकता, ह्या केवळ औषधासाठी नाहीत तर वैद्यकीय सिद्धांतासाठी सुद्धा आहेत. या कार्यासाठी आम्ही स्वत:ला झोकून दिले आहे.

***डिशेन हर्बो-मिनरल औषधे आयुर्वेद, होमिओपॅथी आणि ऍलोपॅथी च्या तत्वांवर आधारित आहेत.***

आम्ही ज्ञानाच्या अफाटतेचा सामना केला आहे आणि त्याला सामोरे जाताना आम्ही विनम्रपणे सामोरे गेलो आहोत. जर माणसाला नम्रतेचा एक पाठ शिकण्याची आवश्यकता असेल तर त्याने केवळ वैद्यकीय शास्त्रामधील, त्याच्या सर्व शाखांचा अभ्यास केला पाहिजे. एखादे ऍलोपॅथिक डॉक्टर एखादा रोग त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने बरा करतात. होमिओपॅथिक डॉक्टर तोच रोग अगदी विरूद्ध पद्धतींनी बरा करतात. आयुर्वेदिक डॉक्टर हाच रोग त्यांच्या विशेष पद्धतींनी बरा करतात. आणि तसेच युनानी डॉक्टर सुद्धा नॅचरोपथीने करतात, इत्यादि...

सर्वात महान डॉक्टर ते आहेत जे शिकताना अतिशय विनम्र असतात आणि ते कोणाकडूनही शिकतात. सर्वात महान डॉक्टर ते आहेत जे खूप काही जाणत असून सुद्धा, स्वत:ला अगदी कमी माहिती आहे असा विचार करतात. सर्वात महान डॉक्टर ते आहेत जे वैयक्तीक पाकीटांना परवडेल अशा योग्य उपायांचा प्रामाणिकपणे शोध घेतात. अंतिमत:, सर्वात महान डॉक्टर ते आहेत ज्यांनी खालील गोष्टी अभ्यासण्यासाठी कष्ट केले आहेत:

मानवी मनाचे कार्य, मानवी शरीराच्या दुर्बलता आणि त्याच्या आत्म्याची स्वर्गीय आकांक्षा. ही सर्व तिन्ही कार्ये रोगाचा उपचार करण्यामध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात आणि ते खरोखर एक गरीब डॉक्टर आहेत ज्यांना एखाद्याचा सहवास माहित नाही.

**डिशेन ने अशी उत्पादने विकसित केली आहेत जी विविध संस्थांचे/प्रणालींचे फायदे देतात.**

वैद्यकीय शास्त्राच्या विविध शाखांच्या सर्व अधिका-यांचा आणि संशोधन कर्मचा-यांचा आम्ही आदर करतो. आम्ही त्यांच्या मूलभूत तत्त्वांचा अभ्यास केला आहे आणि मतैक्याचे मुद्दे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून, आम्ही पूर्व आणि पश्चिम दोन्हीमधील मूळ कल्पनांचे संयोजन करण्याचा प्रयत्न केला आहे. खात्रीशीरपणे पूर्ण असलेली एक प्रणाली आम्ही विकसित केली आहे असा दावा आम्ही करत नाही, पण आम्ही असे मानतो की आम्ही एक मिश्रण/संयोजन तयार केले आहे, जे विविध प्रणालींचे फायदे देते पण यांमधील कशाचेही तोटे यात असत नाहीत.

## आयुर्वेद, होमिओपॅथी आणि ॲलोपॅथीची मुख्य सिद्धांत

खूप वेळ वाटणे/दळणे [चूर्ण करणे] यामुळे औषधाचे सामर्थ्य वाढते; हे होमिओपॅथी मध्ये शिकविल्या जाणा-या "पोटेन्टायझेशन/सामर्थ्य" सिद्धांतासारखे नाही. आयुर्वेदिक आचार्यांनी निरीक्षण केले आहे की "खूप वेळ वाटण्यामुळे/दळण्यामुळे औषधाला क्रियेची एक शक्ती किंवा सामर्थ्य देते जे त्या औषधामध्ये असलेल्या सामर्थ्यापेक्षा खूपच जास्त प्रमाणात असते". म्हणून आमची हर्बो-मिनरल औषधे वाटली/दळली जातात आणि "ॲटोमाईझ्ड/अणूशक्ती" प्रात होते याचा परिणाम म्हणून ते खोलवर काम करतात आणि लहान मात्रांमध्ये दिल्यावर सुद्धा वेगाने कार्य करतात. "ॲटोमाईझ्ड/अणूशक्ती" हा शब्द आम्ही मागील एकशे एक वर्षांमध्ये वापरत आहोत त्याच अर्थाने या मार्गदर्शिकेमध्ये वापरला आहे, म्हणजे खूप वेळ वाटण्यामुळे/दळण्यामुळे संपूर्ण विघटन प्राप्त केले जाते.

## 'ॲटोमाईझ्ड औषधांच्या' क्रियेची गती दर्शविण्यासाठी प्रयोग करण्यात आले आहेत.

ग्रीफ्सवाल्ड विद्यापिठातील फार्माकोलॉजी (औषधनिर्माणशास्त्र) चे प्राध्यापक, डॉ. स्कुल्झ, यांनी विविध सामर्थ्याच्या मर्क्युरी क्लोराईड मध्ये यीस्टच्या पेशी ठेवल्या. सर्वाधिक मजबूत द्रावणामध्ये या यीस्ट पेशी वेगाने मारल्या गेल्या. दुर्बल द्रावणांमध्ये, या पेशी दीर्घ काळ जिवंत राहिल्या. आणखिन दुर्बल द्रावणामध्ये, या पेशीची शक्ती/चैतन्य तपासले गेले. तथापि जेव्हा या पेशी 7 ते 8 मिलियनच्या 1 द्रावणांमध्ये ठेवण्यात आल्या होत्या, तेव्हा त्याची शक्ती इतकी वेगाने वाढली होती की गुणाकाराच्या पटीमध्ये सुद्धा वेगाने वाढली होती. म्हणून आम्ही पाहू शकतो की जेथे छोट्या मात्रा (विशेषत: ॲटोमाईझ्ड औषध) संस्थांना योग्य उत्तेजित करतात तर मजबूत मात्रा एकतर संस्थांची शक्ती बांधून ठेवतात किंवा सकारात्मकपणे नष्ट करतात आणि वास्तविकपणे ब-या होणा-या रोगापेक्षा वेगळे रोग होण्यास कारणीभूत ठरतात.

पुन्हा हे देखील दर्शविले गेले आहे की 'ॲटोमाईझ्ड' औषधे पोटात पोहोचण्यापूर्वी तोंडाच्या श्लेष्मल त्वचेमधून अवयव संस्थेमध्ये शोषली जातात. अशाप्रकारे, तीव्र परिस्थितींमध्ये ही औषधे काही तासांमध्ये नव्हे तर काही मिनिटांतच कार्य करतात.

सूक्ष्मपणे आयनिकृत केलेले आणि मॉल्युक्युलर्ली सस्पेन्डेड (ज्याचे कण द्रवामध्ये विरघळत नाहीत) पदार्थ (जशी की आमची ॲटोमाईझ्ड औषधे) जीभेच्या श्लेष्मल त्वचेमधून थेट रक्तामध्ये शोषली जाऊ शकतात हे सिद्ध करण्यासाठी, एस्सेन च्या डॉ. मेड मेंडल यांनी खालील प्रयोग केले होते.

त्यांनी एका डिजिटेल्स (एॅटोमाईझ्ड) द्रावणामध्ये बुडविलेल्या काचेच्या एका लहान दांड्याचा स्पर्श एका व्यक्तीच्या जीभेच्या पृष्ठभागावर केला. काही सेकंदातच, नियंत्रण करणा-या एॅपरेटस (रक्त दाब मोजण्याच्या यंत्राने) ने हृदयावरील परिणामाची नोंद केली. नंतर त्यांनी आयनिकृत अर्क घेतला आणि चाचणी व्यक्तीच्या जीभेवर एक थेंब पडू दिला. दोन मिनिटांनंतर, ते त्या व्यक्तीच्या हृदय धमनीमधून काढलेल्या रक्तामधील औषधाची उपस्थिती सिद्ध करू शकले.

म्हणून, आमची संयुगे/मिश्रणे जेव्हा अगदी लहान मात्रांमध्ये दिली जातात किंवा तीव्रतेच्या संदर्भांमध्ये द्रावणामध्ये विरघळून दिली जातात, तेव्हा अत्यंत वेगाने काम करतात काहीवेळा तर डॉक्टरांना सुद्धा आश्चर्यचकित करून सोडतात. “एनग्राफ्टिंग/कलम करणे” हा एक दुसरा शब्द आयुर्वेदासाठी आणि काही प्रमाणात, औषधाच्या युनानी संस्थेसाठी विशेष शब्द आहे. याचा अर्थ असा की खनिजे आणि धातू वाटणे/दळणे आणि त्यांचे विविध हर्बल/वनौषधींचे अर्क तयार करणे हीच गोष्ट अशी सांगता येते की धातू आणि खनिजांची द्रावणे टिंक्चर्स (द्रावणात भिजवून काढलेला अर्क) आणि अर्काबरोबर एकत्र करणे. तथापि यामध्ये एक फरक आहे की द्रवरूप मिश्रणे रासायनिक बदलांमधून जातात, तर पावडर मध्ये ते त्यांचे संपूर्ण नैसर्गिक सामर्थ्य तसेच राखून ठेवतात, आणि अनन्य परिणामकारकतेच्या आधारे, अधिक खोलवर काम करतात आणि दीर्घ काळ परिणाम देतात. आयुर्वेदिक आचार्यांनी याचे सुद्धा निरीक्षण केले आहे की “एक कच्चे औषध कोणती क्रिया उत्पन्न करते, त्याच्या उलटची क्रिया त्याचा अणू उत्पन्न करतो.

होमिओपॅथी मध्ये हा सिद्धात केवळ वेगळया नावाने ओळखला जातो **सिमिलिया सिमिलिबस क्युरानटुर**. हा सिद्धांत एॅलोपॅथीमध्ये सुद्धा अनुसरला जातो. नंतरच्या दोन संस्थांमध्ये एक स्पष्टीकरण आहे जे वैज्ञानिक मानले जाते पण  मूलभूतपणे तिन्ही समान सिद्धांतांचे अनुसरण करतात आणि सारखाच परिणाम प्राप्त करतात केवळ त्यांची श्रेणी वेगळी असते.

## एॅलोपॅथी

अनेक प्रख्यात वैद्यकीय अधिकारी अगदी एॅलोपॅथिक संस्थेमधील सुद्धा, असे मानतात की 'मोठी मात्रा विविध जीवाणूंची प्रतिकारता कमी करते, तर लहान मात्रा ही शक्ती वाढविते' लहान मात्रा एँटीजेन (प्रतिजन) सारखे कार्य करतात, आणि प्रतिपिंडे, संरक्षणात्मकता आणि गुणकारीता उत्पन्न करतात. ते असे सुद्धा मानतात की औषधाच्या प्रमाणामुळे परिणाम होत नाही तर अवयव संस्थेने शोषून घेण्यात आलेल्या आयन्समुळे फरक पडतो.  “एॅटोमायझेशन” पुरेसे आयनिकरण होण्यास मदत करते. डॉ. डब्ल्यू कारो यांनी त्यांचे पुस्तक “युरीनरी एॅण्ड प्रोस्टॅटिक ट्रबल्स” मध्ये लिहिले आहे की “होमिओपॅथी आणि एॅलोपथी एकमेकांना पूरक आहेत; दोघांनाही

त्यांच्या परिणामकारकतेची मर्यादा अचूक माहित आहे. केवळ सहकार्यानेच भविष्यातील आदर्श कला पुढे येऊ शकते".

**आम्ही वैद्यकीय कार्याच्या आध्यात्मिक बाजूवर जोर देतो.**

आम्हाला काहीजणांनी सांगितले की, शुद्ध वैद्यकीय बाबींमध्ये आध्यात्मिक प्रश्नांचा अभ्यास करणे योग्य नाही. डॉक्टरांना एखाद्या माणसाच्या केवळ शरीराकडे पाहावे लागत नाही तर त्याच्या मनाचा सुद्धा विचार करावा लागतो, कारण मनाचा शरीरावर परिणाम होतो आणि म्हणून एका अर्थाने शरीरापेक्षा मनाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक असते. पण मनाची स्थिती आत्मा म्हणून ओळखल्या जाणा-या चैतन्याच्या आरोग्यावर अवलंबून असते, आणि म्हणून शरीर, मन आणि आत्मा परस्पर जोडलेले आहेत आणि त्यांच्या आरोग्यासाठी एकमेकांवर अवलंबून आहेत.

या विचारसरणीमुळे डिशेन हर्बो-मिनरल उपायांचे सूत्रीकरण तयार करणे अनुकूल झाले आहे कारण आम्ही मानतो की मनुष्य एक संपूर्ण युनिट/घटक आहे – ज्यामध्ये संपूर्ण व्यवस्थित संतुलित भाग असलेल्या वेगवेगळया अवयव संस्था आहेत.

जर आपण जगातील संशोधन अभ्यासकांच्या नवीन निष्कर्षांचे विश्लेषण केले, तर आम्ही पाहू शकतो की मूलभूतपणे मनुष्याच्या सुख आणि दु:खामध्ये, त्याच्या स्वत:च्या यशामध्ये किंवा विफलतेमध्ये, त्याच्या स्वत:च्या चांगल्या अरोग्यामध्ये किंवा आजारी असण्यामध्ये केवळ ताच्या स्वत:च्या चैतन्याचे योगदान असते.

डॉक्टरांनी रूग्णांवर उपचार केले पाहिजेत आणि रोगावर नाही हे तत्व असे सुचविते की त्यांनी रूग्णाची खाण्याची आणि पिण्याची पद्धत; जगण्याची; विचार करण्याची आणि कार्य करण्याची पद्धत या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. या सर्व गोष्टींवर त्याच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा प्रभाव पडतो आणि हा दृष्टीकोन बरोबर असल्याशिवाय, त्याचे विचार किंवा त्याची कार्ये बरोबर असू शकत नाहीत.

**मानसोपचार हे मनावर उपाचार करणारे आणि म्हणजेच शरीरावर उपचार करणारे शास्त्र आहे.**
असे म्हटले जाते की चेतासंस्थेवरील सर्वोत्तम उपाय म्हणजे, **रूग्णाची आध्यात्मिक बाजू सुधारणे.**

ज्या डॉक्टरांनी केवळ विज्ञानाचा अभ्यास केला आहे आणि त्याच्याबद्दल अभ्यास केला नाही, जे विज्ञानाचे शिक्षक आहेत, ते याला मानसोपचार म्हणतील.

मानसिक परिणाम सामान्यपणे रोगांच्या उपचारामध्ये एक अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात आणि विशेष करून चेतासंस्थेच्या वेदनेमध्ये. तथापि मानसिक शक्ती जास्तीतजास्त रूग्णाच्या कल्पनाशक्तीमध्ये बदल घडवू शकतात आणि एखादा रोग बरा करण्याच्या डॉक्टरांच्या क्षमतेवरील त्याचा किंवा तिचा आत्मविश्वास अधिक वाढवू शकतात. आत्तापर्यंत, मानसोपचाराने निश्चितपणे बरेच चांगले केले आहे, पण ते यापुढे जाऊ शकत नाही.

दुसरीकडे आध्यात्मिक विकास केवळ कल्पनेवर काम करत नाही तर आत्म्याचे विशेष पैलू जागृत करतो. डॉक्टरांच्या आणि त्यांच्या औषधांच्या सहकार्याने हे 'आत्म्याचे-सामर्थ्य' एकत्रितपणे, रूग्णास बरे करतो किंवा वेदना सहन करण्यास शिकवतो आणि रोगाच्या असुविधांचा रूग्ण शांतपणे आणि एक स्मित हास्य घेऊन स्वीकार करतो.

**रोगांचा प्रतिबंध करण्यासाठीची आणि रोग बरे करण्यासाठीची काही तत्वे**

प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीला हे माहित असले पाहिजे

- जीवनाचा तात्विकदृष्ट्या स्वीकार कसा करावा आणि
- एखाद्याने स्वत:च्या आरोग्याची काळजी आणि त्यांच्यावर देखरेख सोपविलेल्या एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी

जीवनाचा तात्विकदृष्ट्या स्वीकार करणे याचा अर्थ असा आहे की आपण या जगात आपल्या स्वत: च्या इच्छेने नव्हे तर निर्मात्याच्या इच्छेने आहोत याची जाणीव आपण ठेवली पाहिजे, आपल्याला येथे पाठविण्यामागे त्याचे एक ध्येय आहे, आणि त्या उद्दीष्टाच्या पूर्ततेवर आपला आनंद किंवा दुःख संपूर्णपणे अवलंबून आहे. हा मुद्दा समजून घेतला नाही तर आपले जीवन खूपच घाईघाईत संपून जाते, आपण काय केले पाहिजे आणि काय करू नये हे न समजून न घेता परिणामी आम्ही जे काही करतो आणि आपण पूर्ण करू शकतो याचा आपल्याला किंवा इतर कोणालाही काहीही उपयोग होत नाही. हे निव्वळ आयुष्य व्यर्थ घालविण्यासारखे आहे.

शिक्षणाने येणारी दुसरी जबाबदारी म्हणजे प्रत्येक व्यक्तीला चांगल्या आरोग्याचे कमीतकमी प्राथमिक नियम तरी माहित असले पाहिजेत. अशा किती सुशिक्षित व्यक्ती आहेत ज्या सांगू शकतात की त्यांच्या आजारी आरोग्यासाठी ते जबाबदार नाहीत?

**चला आरोग्य चांगले राखणे आणि आजार बरे करणे यांच्या सामान्य तत्त्वांचा आपण विचार करू.**

जेव्हा आपण आरोग्य गमावतो तेव्हाच आपल्याला त्याची किंमत कळते. आपल्यापैकी बहुतेक जणांना मागील चुकांसाठी पश्चाताप करावा लागतो. जर रूग्ण त्याच्या आजारपणासाठी जबाबदार असेल तर त्याने निराश होण्याची गरज नाही. तो निश्चितपणे ते पुन्हा मिळवू शकतो. तथापि, त्याच्या स्वत:साठी आणि इतरांसाठी त्याने प्रतिबंधात्मक उपाय समजून घेतले पाहिजेत – जेणेकरून तो त्याने मागे केल्या असतील अशा चुका करणे टाळण्यास त्यांना मदत करू शकेल.

**मनुष्याच्या स्वभावाची सर्वात जास्त सामान्य विफलता म्हणजे बेशिस्त होय.**

जेव्हा आपण आपल्या इंद्रियांच्या कोणत्याही आज्ञेला 'नाही' म्हणू शकत नाही तेव्हा एक मोठी समस्या उद्भवू शकते. आपण पूर्णपणे आपल्या इंद्रियांच्या वर्चस्वाखाली असतो आणि आपण त्यांच्या कोणत्याही आज्ञेला 'नाही' म्हणत नाही. इंद्रिये ही निसर्गाची देणगी आहेत आणि म्हणून तो खरोखरचा आशीर्वाद आहे, परंतु त्यांची तपासणी केली नाही तर ते आपले मोठे शत्रू ठरू शकतात. खूप प्रमाणात आजारी-आरोग्य आणि दु:ख यांसाठी प्रत्येक स्वरूपातील इंद्रिय आणि आसक्ती/वासना जबाबदार असतात. म्हणून खाणे आणि पिणे यावर नियंत्रण ठेवणे, काळजी आणि अपव्यय टाळणे, मनोरंजन योग्य सुदृढ आहे याची खात्री करून घेणे, योग्य व्यायाम करणे, कामाच्या तासांचे, मजोरंजनाचे आणि झोपेच्या वेळेचे नियंत्रण/नियोजन करणे आवश्यक आहे.

कठोर परिश्रम करणे, इतरांची सेवा करण्यास शिकणे, निस्वार्थीपणाने वागणे आणि चांगले होण्यासाठीची आणि चांगले कार्य करण्याची संधी शोधणे ही गोष्ट चांगली आहे. वास्तविकपणे हे चांगल्या आरोग्याचे नियम आहेत, ज्यामध्ये विज्ञानाने घालून दिलेले इतर नियम जोडले जाऊ शकतात.

**आपल्या मर्यादेमध्ये जगणे हा आणखिन एक महत्वाचा नियम आहे.**

हे सांगणे अगदी मूर्खपणाचे वाटू शकेल, कारण बरेच लोक हे मूलभूत तत्व विसरतात, हे करणे आवश्यक आहे. वास्तविक आपण कसे आहोत त्यापेक्षा मोठे असल्याचा आव आणण्यामुळे हानीकारक नैतिक परिणाम दिसून येतात. डोक्यात हवा गेली असेल, की आपल्या कल्पनांमध्ये सुद्धा अतिशयोक्ती येते, आणि याचा परिणाम म्हणून आपण मोठ्या कृती करतो.

जुन्या काळातील ऋषीमुनींना, आजारी आरोग्याची जवळची आणि दूरची कारणे माहित असायची आणि जीवन कसे मर्यादेत जगले पाहिजे याबद्दल ते स्पष्टपणे आणि प्रामाणिकपणे बोलायचे.

**आणि देव, डॉक्टर, औषधे आणि स्वत:वर आपला विश्वास असला पाहिजे.**

जेव्हा आपण आजारी असता, तेव्हा आपले मन गोंधळलेले असते, हे साहजिक आहे. आपण एका डॉक्टरांकडून दुस-या डॉक्टरांकडे जातो. एकापाठोपाठ एक औषध घेत राहतो. ही कार्यपद्धत आपली स्थिती आणखिन वाईट करण्यास मदत करते. म्हणून आपण शांत राहणे, रूग्णाने स्वत:ला ज्यांच्या हाती सोपविले आहे त्या डॉक्टरांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. डॉक्टरांना आपल्याला बरे करण्यासाठी वेळ आणि एक संधी दिली पाहिजे. एखादा जुनाट रोग बरा होण्यासाठी वेळ लागू शकतो, पण याचे परिणाम सामान्यपणे अधिक चांगले असतात आणि बरे होणे चिरस्थायी असते. जुनाट रोग त्वरीत बरा होणे हे अनेकदा फसवे असते.

**वैज्ञानिक युगामध्ये जगणे याचा अर्थ निसर्गाच्या नियमांचा अनादर करावा असा होत नाही.**

आमच्या साहित्यामध्ये देण्यात आलेल्या सुचनांच्या मदतीने उपचार करण्यास [म्हणजे आमच्या औषधांनी] सुरूवात केली गेली तर रूग्णाची रचनात्मक वैशिष्ट्ये पूर्णपणे समजून घेणे, रोग काय आहे ते समजून घेणे, निवड केलेले उपाय समजून घेणे, आणि शेवटी औषधांनी योग्य रितीने कार्य करावे याला मदत होण्यासाठी कोणत्या गोष्टी, कोणते विचार आणि कोणत्या कृती करणे टाळावे हे समजून घेतले पाहिजे. हे विसरता कामा नये की औषधांना सुद्धा त्यांच्या मर्यादा असतात ते फक्त निसर्गास मदत करतात: म्हणून निसर्गाचे नियम मोडू नयेत तर परिस्थिती अनुमती देईल तितक्या काटेकोरपणे त्याचे पालन केले पाहिजे.
आपण वैज्ञानिक युगामध्ये राहात आहोत. पण काहीवेळा, विज्ञानाचा आदर करताना – विज्ञानाची जननी असलेल्या निसर्गाचा अनादर करतो.

हल्ली लोकांना वाटते की औषधे, टॉनिक्स, इंजेक्शन्स, इ. त्यांच्यासाठी सर्व काही करू शकतात आणि खरे तर ते स्वत: काहीही करत नाहीत. हे मूर्खपणाचे आहे. अविचाराने/वेडीवाकडी औषधे घेण्याने रोग निर्माण होतात जे काहीवेळा ज्या आजारासाठी औषध घेतले आहे  त्यापेक्षा खूप वाईट असतात. अगदी डिशेन हर्बो-मिनरल औषधांसारख्या निरूपद्रवी औषधांचा सुद्धा गैरवापर करू नये.

**चैतन्य/प्राणशक्ती – रोगाविरूद्ध प्रतिबंधक असते.**

चैतन्य हा असा शब्द असा आहे ज्याचा खूप चूकीचा अर्थ लावला जातो. वैद्यकीय व्यक्तीसाठी याचा अर्थ असा होतो की 'मानवाच्या शरीरातील असंख्य पेशींचे कार्य योग्य चालणे' सामान्य लोकांना वाटते की 'चैतन्य' चा

समानार्थ 'सामर्थ्य' आहे आणि प्रत्येक जण ते कसे मिळवायचे याचा मनापासून अभ्यास करतो. तथापि, आमचे मत असे आहे की चैतन्य ही शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आहे.

इतर दोघांशी तुलना केली असता मानसिक चैतन्य हे नैसर्गिकपणे अत्यंत महत्वाचे आहे. मन शरीरावर राज्य करते. शरीराने अशक्त असलेली एखादी व्यक्ती केवळ मनाच्या बळावर बराच दीर्घकाळ आयुष्य जगते. मजबूत मानसिक चैतन्य असलेली एखादी व्यक्ती दुर्बल मानसिक सामर्थ्य असलेल्या एखाद्या व्यक्तीपेक्षा अधिक सहजपणे रोगातून मुक्त होते. म्हणून जुन्या म्हणीची सत्यता पटते की:

'एका निरोगी शरीरातील एक निरोगी मन'

आध्यात्मिक चैतन्य ही आणखी एक महत्त्वाची बाब आहे – ही गोष्ट जीवन स्वत: आपल्याला दाखवते. आमचा आदर राखण्याची आज्ञा करणारे लोक कोण आहेत? ती व्यक्ती शरीरयष्टी चांगली असलेली असली पाहिजे असे नाही, किंवा जी व्यक्ती खूप शिकलेली असली पाहिजे असेही नाही; किंवा ती श्रीमंत आणि सुंदर असली पाहिजे असेही नाही. पण ती व्यक्ती नेहमी नम्र स्वभावाची असते, आणि जे बरोबर आहे ते करते आणि काटेकोरपणे चूकीचे करणे टाळते. आध्यात्मिक चैतन्य असण्यासाठी एक 'सन्यासी' असण्याची आवश्यकता नाही. कशाची आवश्यकता असेल तर आपले अंत:करण निर्मात्याच्या पायी वाहिले पाहिजे, आणि त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्या बद्दल ज्या गोष्टी होतात त्यांचा स्वीकार केला पाहिजे.

याला निराशवाद म्हणने अगदी सोपे आहे. तथापि आपली समजूत अशी असते की जेव्हा मनुष्य देवाची आज्ञा मानतो, तेव्हा गोष्टी माणसाच्या आज्ञा पाळतात – पण,  जेव्हा माणूस देवाविरूद्ध बंड करतो, तेव्हा माणसाच्या अधीन असलेल्या सर्व गोष्टी त्याच्याविरुध्द बंड करतात – अगदी औषधे सुद्धा.

**योग्य पोषण, एकरूप होणे/मिसळणे आणि निर्मूलन या मार्फत पुनरूज्जीवन प्राप्त केले जाते.**

आपण आपले जीवन कशा रितीने नियंत्रित करतो, मोठ्या प्रमाणात यावर आपले शारीरिक आरोग्य अवलंबून असते. थोडक्यात, आपण कर्तव्यासाठी जगले पाहिजे, आनंदासाठी नाही. रूग्ण नेहमी डॉक्टरांकडे विविध तक्रारी असलेल्या गुंतागुंतीचा एक इतिहास घेऊन, सल्ला घेण्यासाठी आणि उपचारासाठी येतात. 'गमावलेले चैतन्य' परत मिळवायची इच्छा आहे यावर विशेष जोर दिला जातो. तथापि, ते हे विसरतात की चैतन्य ही चांगल्या आरोग्याची देणगी आहे आणि जोपर्यंत चांगल्या आरोग्याचे अडथळे दूर करत नाही; तोपर्यंत चैतन्य परत आणता येत नाही. एक अशी समजूत आहे की [1] चांगल्या आरोग्याचे मूळ तत्व [पोषण, पचन, एकरूप होणे/मिसळणे] आणि [२] विभाग III मधील 'रचनात्मक उपचार' शीर्षकाखाली देण्यात आलेले तपशील

रोगाच्या उपचारासाठी समर्पित करण्यात आले आहेत आणि ते अनुक्रमे दाखवतात की चैतन्य पुनर्प्राप्त करण्यासाठी आपण स्वत: प्रयत्न केले पाहिजेत आणि विज्ञान मानवासाठी जे देते ते स्वत:ला दिले पाहिजे.

**पोषण**

चांगले पोषण म्हणजे आपण योग्य खाल्ले पाहिजे. योग्य खाणे याचा अर्थ समृद्ध खाणे असा होत नाही. योग्य आहार तो आहे जो आपल्या सगळयांसाठी नैसर्गिक आहे. एखाद्याचे जे खाद्य असते ते दुस-यासाठी विष असू शकते. चटणी आणि चपाती खाणारे लोक नेहमी अधिक मांसल असतात आणि बदक आणि टर्की (कोंबड्यासारखा एक पक्षी) खाणा-यांपेक्षा काटक असतात. वैज्ञानिक पोषण याचा अर्थ असा होतो की आपण आपला आहार समृद्ध करू शकतो.

आपल्या पॉलिश केलेल्या तांदळाच्या भातामध्ये आणि बेक केलेल्या ब्रेड मध्ये आहार मूल्ये खूप कमी असतात. समृद्ध गोष्टी आपल्या दुर्बल/नाजुक पोटासाठी खूप जड पडतात आणि इतर गोष्टी आपल्या कमी उत्पन्नासाठी खूप खर्चिक असतात. याच ठिकाणी विज्ञान बचाव करण्यास येते.

**पचन**

चांगले पचन हे चांगल्या आरोग्याची गुरूकिल्ली आहे. आपण काय खाता आणि आपण कसे खाता यावर पचन अवलंबून असते. आपण चुकीच्या गोष्टी खाऊ शकतो आणि आपण बरोबर गोष्टी चुकीच्या पद्धतीने खाऊ शकतो. अन्न चांगले चावले पाहिजे आणि तोंडात दाताने त्याचा लगदा होईपर्यंत ते घशाखाली जाऊ नये. चावण्यामुळे जास्त खाणे टाळले जाते. दात खराब असणे आणि पचन खराब होणे या दोन्ही गोष्टी एकत्र असतात. पचनाच्या समस्या नेहमी फसव्या असतात. जे लोक चांगले खातात (आणि ते नेहमी जास्त प्रमाणात खातात) आणि त्यांचे पचन उत्कृष्ठ आहे असे प्रतिपादन करतात, ते इतरांपेक्षा जास्त वाईट प्रकारच्या अपचनाने त्रस्त असू शकतात. जास्त प्रमाणात चहा आणि कॉफी पिण्यामुळे आणि धूम्रपान करण्यामुळे सुद्धा पचनाच्या समस्या होतात.

**एकरूप होणे/मिसळणे**

जेव्हा एखादी व्यक्ती चांगले खाते आणि चांगले पचन करते आणि तरीही अशक्त दिसते तेव्हा एकरूप झाले/मिसळले नाही असे म्हटले जाते. हे अनेक माहित असलेल्या आणि माहित नसलेल्या कारणांमुळे होते ज्याचे विवरण विभाग III खालील 'उपचार' मध्ये दिले आहे.

**सामान्य समस्या – चेतासंस्थेमधील बिघाड, रक्ताच्या चित्रामधील बदल.**

**चेतासंस्थेमधील बिघाड**

चांगल्या आरोग्याचे नियंत्रण चेता संस्थेद्वारा सुद्धा केले जाते. आपल्या मोठ्या-सामाजिक सुधारणेमुळे मेंदूवर आणि चेता संस्थेवर भारी कर लादला गेला आहे. अगदी लहान मूलांचा जन्म सुद्धा उदासिनतेमध्ये होतो. उदासिनतेसाठीचा अत्यंत उत्तम नैसर्गिक उपाय म्हणजे सवयींमधील नियमितता, शांत झोप घेणे आणि डोके थंड ठेवणे. केवळ जीवनाच्या योग्य संकल्पनांमुळे डोके थंड ठेवणे शक्य होते. जर आपण आनंदासाठी किंवा प्रसिद्धी आणि संपत्तीसाठी जगत असू, तर याच गोष्टी एके दिवशी आपल्या शत्रू होतात.

जर आपण कर्तव्यासाठी जगत असू तर तो स्वामी, जो आपल्यावर ते लादतो, तो जबाबदारीची जाणीव होण्यासाठी आणि खंबीरपणे आयुष्य जगण्यासाठी स्वाभाविकपणे आपल्याला मदत करतो. हे जीवनाचे तत्वज्ञान आहे पण तत्वज्ञानाला निसर्गाच्या मदतीच्या आवश्यकता असते आणि विज्ञानाने दयाळूपणे आणि उदारतेने दुर्बल चेतासंस्थेकडे (शिरांना) लक्ष दिले जाते.

चेतासंस्थेची वेदना नैसर्गिक कारणांमुळे होते तसेच अनैसर्गिक कारणांमुळे सुद्धा होतो. नैसर्गिक कारणे म्हणजे आजारपण, मानसिक ताण, अति काम करणे, चिंता, दु:ख आणि जीवनामधील अनेक चढ आणि उतार आपण ज्याच्या अधीन असतो. अनैसर्गिक कारणे म्हणजे निसर्गाच्या विरूद्ध काम करणे, खूप श्रम घेऊन अनेक गोष्टी करणे, स्वत:ला कोसणे आणि प्रत्येकाचा अतिरेक करणे. एखाद्याने निसर्गाचा नियम मोडला आहे आणि शिक्षा मिळली नाही असे होत नाही.

अयोग्य पोषण, पचन आणि एकरूप होणे/मिसळणे यामुळे चेतासंस्थेचे रोग होऊ शकतात जे चुकीचे झाले आहे ते बरोबर करण्याद्वारे समस्या घालविता येते. तर दुसरीकडे चेतासंस्थेमधील बिघाडामुळे पचन, एकरूप होणे/मिसळणे बाधित होऊ शकते आणि अगदी रक्त दूषित होऊ शकते. हे एक दुष्टचक्र आहे आणि एक वैद्यकीय समस्या आहे.

“आधुनिक औषधामधील नवीन दृष्टीकोनाचे संक्षिप्त विवरण” असे वर्णन केलेले पुढील विधान, सर्व संदर्भांमध्ये चेता संस्थेवर उपचार करण्याचे महत्व दर्शविते.

जवळपास अडीच हजार वर्षांपूर्वी सोक्रॅटेस सैन्याच्या सेवेतून परत आले आणि त्यांच्या ग्रीक देशवासीयांना सांगितले की एका असंस्कृत युगामध्ये ग्रीक संस्कृतीपेक्षा थ्रॅसियन्स आधुनिक होते. “त्यांना माहित होते की मनाशिवाय शरीर बरे केले जाऊ शकते”. पुढे त्यांनी सांगितले की, “हेच ते कारण आहे ज्यामुळे अनेक रोग बरे कसे करायचे ते हेलास च्या फिजिशियनना माहित नव्हते, कारण ते याबद्दल संपूर्ण अज्ञानी होते”.

**रक्तातील चित्रामधील बदल**

आपण पाहिल्याप्रमाणे, कोणत्याही गोष्टीमुळे रक्त दूषित होऊ शकते आणि दूषित रक्तामुळे चेतासंस्थेचे त्रास होऊ शकतात तसेच पचनाचे त्रास सुद्धा होतात. आम्ही उपचाराच्या खाली रक्ताच्या विविध परिस्थितींबद्दल विवरण देतो, त्यापैकी सर्वात महत्वाची दोन कारणे आहेत ज्यांचा उल्लेख खाली करण्यात आला आहे:

**जुनाट मलेरीयामुळे रक्तामध्ये बदल होणे**

या रोगाने भारतामध्ये हाहाकार माजविला आहे. सामान्य लोकांना हे सामान्यपणे माहित नाही की मलेरीया शरीरात गुप्तपणे अनेक वर्षे लपून राहतो. एखाद्या व्यक्तीला 25 दिवसांपूर्वी मलेरीया झाला होता किंवा 25 महिन्यांपूर्वी झाला होता याने काहीही फरक पडत नाही, शरीर संस्थेमध्ये हे गुप्तपणे काम करत असल्याची एक शक्यता नेहमीच असते. जुनाट आणि सुप्त स्वरूपातील मलेरीयाच्या प्रकटीकरणाचे एक लक्षण म्हणजे शुल्लक कारणाने सुद्धा पचन क्रिया बिघडते. काही संदर्भांमध्ये ताप येण्याची लक्षणे असतात, तर इतर लोकांमध्ये तापाची लक्षणे दिसत नसतात.

**रक्तवाहिन्यांच्या रोगांमुळे रक्तामध्ये बदल होणे**

जे गोनोरिया(जननेंद्रियाच्या मार्गातील गंभीर संक्रमण) किंवा सिफिलिस (एक प्रकारचा गुप्त रोग) त्रस्त झाले होते आणि ज्यांनी स्वत:वर पूर्णपणे उपचार करून घेण्याचे कष्ट घेतले नाहीत त्यांनी सर्व स्वरूपातील अडथळे अनुभवण्यास तयार असले पाहिजे, केवळ रोगाच्या उपचारामध्येच नाही तर सामान्यपणे सुद्धा पण चांगले आरोग्य राखण्यासाठी सुद्धा प्रयत्न केले पाहिजेत.

वैद्यकीय अधिका-यांच्या मते रक्तवाहिन्यांमधील विष अनेक वर्षे शरीरामध्ये सक्रिय राहते, आणि म्हणून, ज्या व्यक्तींना हे झाले होते त्यांनी आधीच्या वर्षांमध्ये एक शारीरिक वैद्यकीय उपचार घेतला असला तरी “शुद्धीकरणाच्या” प्रक्रियेमध्ये अनेक वर्षे टिकून राहिले पाहिजे. रूग्णांना सुरक्षित असल्याची एक चुकीची जाणीव असू नये आणि त्यांना या रोगांच्या विशिष्ट खुणा दिसल्या नाहीत, म्हणून ते तंदुरूस्त आहेत असे त्यांनी समजू नये. आमची लोकांना घाबरविण्याची इच्छा नाही.

म्हणून आम्ही गमावलेले आरोग्य पुन्हा प्राप्त करण्याची माध्यमे सुचवितो – अशी माध्यमे जी चांगली, वेगवान, विश्वासार्ह आणि शक्यतो स्थिर असल्याचे विज्ञानाने आणि अनुभवाने दर्शविले आहे.

# भाग – II

# मॅटेरीया मेडिका

**डिशेन हर्बो-मिनरल औषधांची मात्रा लहान आहे.**

निर्दिष्ट केलेल्या कमी मर्यादेचे अनुसरण केले पाहिजे. तथापि, ज्या संदर्भांमध्ये त्वरित आराम मिळण्याची आवश्यकता असते उदा. खूप ताप येणे, पोटात/आतड्यात तीव्र कळ येणे इ. मध्ये जास्तीतजास्त मात्रा दिली जाऊ शकते.

**मात्रांमधील नेहमीचे अंतर 8 तासांचे असते.**

तथापि, रूग्णांमध्ये जसजशी सुधारणा होते, तसतसे मात्रांमधील अंतर वाढविले पाहिजे आणि मात्रेचे प्रमाण कमी केले पाहिजे. ही कार्यपद्धत निसर्गाला स्वत:ला दृढ करण्याची एक संधी देते. उल्लेख करण्यात आलेल्या औषधांच्या मात्रेच्या माहितीसाठी, खालील विभागामध्ये देण्यात आलेल्या स्वतंत्र औषधांच्या तपशीलवार वर्णनांचा संदर्भ घ्या.

**सहायक, औषधांच्या क्रिया मध्यम करतात किंवा वाढवितात.**

कोमट पाण्यामधून देण्यात आलेली औषधे किंवा एखादी मात्रा घेतल्यानंतर कोमट पाणी घेणे यामुळे औषध वेगाने काम करते. मध (अगदी थोडे थेंब अंदाजे 1/4 किंवा 1/2 टीस्पून) हे आणखि एक फायदेशीर सहायक आहे, विशेषत: फुफ्फुस आणि छातीच्या वेदनांमध्ये आणि जेव्हा एका छोट्याशा उत्तेजनेची आवश्यकता असते.

**औषध देण्याची वेळ**

उपचारात्मक औषधे रिकाम्या पोटी किंवा भागश: रिकाम्या पोटी चांगले काम करतात – आहार घेण्याच्या अंदाजे 1 तास आधी किंवा आहार घेतल्यानंतर 3 तासांनी. शुद्ध रचनात्मक औषधे सामान्यत: आहारानंतर लगेच दिली जातात किंवा कोणत्याही द्रवरूप आहारामध्ये विरघळवून दिली जातात.

होमिओपॅथिक उत्पादने केवळ रिकाम्या पोटी दिली पाहिजेत म्हणजे या औषधाच्या 90 मिनिटे आधी आणि कमीतकमी 30 मिनिटे नंतर कोणताही आहार किंवा औषध घेऊ नये.

**डिशेन औषधे घेण्यासाठी कोणत्याही आहार निर्बंधांची आवश्यकता नाही.**

रूग्ण जे त्याच्यासाठी योग्य आहे ते खाऊ शकतो आणि जे अयोग्य आहे ते टाळू शकतो. सक्रिय रोगामध्ये, हा आहार थोडासा घनरूप स्वरूपातला किंवा द्रवरूप असला पाहिजे. पचनक्रियेच्या त्रासांमध्ये, उपचाराचे यश पूर्णत: योग्य आहार व्यवस्थापनावर अवलंबून असते.

**मिश्रण/संयोजन**

सर्व डिशेन औषधांचे एकमेकांशी संयोजन केले जाऊ शकते. विशेष आवश्यकतांसाठी एक विशेष मिश्रण/संयोजन तयार करण्यासाठी 2 किंवा 3 औषधे एकत्र घेतली जाऊ शकतात. आवश्यक प्रमाणांमध्ये मिश्रण/संयोजन तयार करण्यासाठी, एक औषध अधिक प्रमाणात घेणे आणि दुसरे कमी प्रमाणात घेणे असे केले जाऊ शकते. डिशेन औषधांच्या चूर्णांचे मिश्रण तयार करण्याने क्षमता वाढविण्यास मदत होऊ शकते.

**डिशेन हर्बो-मिनरल औषधांचे चूर्ण साखरेमध्ये कितीही सामर्थ्याने मिसळून होमिओपॅथिक पद्धतीने औषध तयार केले जाऊ शकते.**

**शेक घेणे**

शेक घेणे हा एक जुन्या पद्धतीचा उपचार आहे असे वाटू शकते पण हे प्रभावी आहे आणि डिशेन औषधे देत असताना एक सहायक म्हणून काहीवेळा याचा फायदेशीर वापर केला जाऊ शकतो. कोरड्या शेकापेक्षा वाफेचा शेक घेण्याने अधिक समाधानकारक परिणाम मिळतात. दुखणे आणि वेदना होणे पोटात/आतड्यामध्ये कळ येणे इ. मध्ये आराम मिळण्यासाठी शेक घेणे उत्कृष्ट आहे.

**डिशेन ची मलम उत्पादने केवळ बाह्य भागावर लावण्यासाठी आहेत.**

बाह्य भागावर लावण्यात येणारी औषधे अंतर्गत औषधाच्या सहाय्याने एकत्र काम करतात. बरे होणे आतून आले पाहिजे आणि बाहेरून नाही. काहीवेळा, तीव्र वेदना, अचानक दाह होणे/सूज येणे, आणि घसा, कान यांची आग होणे यांपासून त्वरीत आराम मिळण्यासाठी बाहेरून औषध लावणे पुरेसे असू शकते. बाह्य मदतींचा वापर अंतर्गत औषधांच्या संयोजनाने केला पाहिजे.

हर्बो-सल्फ मलमे तयार करण्याचा नेहमीचा नियम म्हणजे कोणत्याही 5 भाग सौम्य तेलामध्ये किंवा पेट्रोलियम जेली मध्ये औषधाचा 1 भाग मिसळणे किंवा अधिक चांगल्या परिणामांसाठी रिपॅन्टो (क्रीम) बरोबर मिसळावे. दुखण्यामध्ये सुधारणा दिसून येईल तसतसे हे मलम अधिक सौम्य तयार करणे.

रबजॉन आणि चेसॉल हे दुखणे आणि वेदना होणे, फुफ्फुस/छाती दुखणे, घशांचे त्रास, टॉन्सिल्स, सांधे दुखणे इ. साठी अत्यंत उपयोगी आहे.

आमच्या उत्पादनांचे पुढील तपशील या मार्गदर्शिकेच्या खालील विभागामध्ये दिले आहेत.

डिशेन ची हर्बो-मिनरल औषधे तीव्र आणि जुनाट या दोन्ही संदर्भांमध्ये वेगाने काम करतात. एकदा का या औषधाने फायदेशीर क्रिया केली, की तब्येतीमधील सुधारणा चालू ठेवण्यासाठी आणि निसर्गाला त्याचे काम करू देण्यासाठी एक देखभाल मात्रा पुरेशी आहे. डिशेन ची हर्बो-मिनरल औषधे शिफारस केलेल्या मात्रांमध्ये घेतली असता हानीकारक नाहीत.

किमती कमी ठेवण्यात आल्या आहेत कारण 104 वर्षांपेक्षा जास्त काळ आमचे उद्दीष्ट आहे की भारतातील गरीब वर्ग, ज्यांना प्रभावी, सुरक्षित आणि परवडणा-या उत्पादनांची आवश्यकता आहे त्यांच्या गरजा भागविणे.

## आयुर्वेदिक

**आल्बो सांग**

हर्बो-मिनरल उत्पादने अनेक उपचारात्मक वापरांसह.

वर्णन:

महत्वाची खनीजे त्याचबरोबर महत्वाच्या भारतीय वनौषधींचे मिश्रण/संयोजन यांचा वापर आयुर्वेदिक औषधामध्ये केला जातो. हे पेशी कार्यासाठी आवश्यक असणारे घटक आणि ज्या रूग्णांचे पचन दुर्बल आहे अशांसाठी सुद्धा उपयोगी असणारे घटक प्रदान करते.

औषधाचे घटकद्रव्य:

| . | प्रत्येक 100ग्रॅ. पावडर मध्ये समावेश असतो | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|---|
| सुधाकल्प (कॅल्शियम कार्बोनेट) | 5.71 ग्रॅम | 54.0 मि.ग्रॅ. |
| सुधाकल्प (कॅल्शियम डायबेसिक फॉस्फेट) | 3.43 ग्रॅम | 36.0 मि.ग्रॅ. |
| शंकाजिराका (मॅग्नेशियम ऑक्साईड) | 1.14 ग्रॅम | 3.6 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 8 ग्रॅम | 55.0 मि.ग्रॅ. |

सुचविले आहे:

*एक पूरक म्हणून: कमी दर्जाचा आहार घेत असलेल्या आणि ज्यांची पचनक्रिया दुर्बल आहे अशा रूग्णांसाठी

* सामान्य दुर्बलतेमध्ये: मानसिक आणि शारीरिक शक्तीचा अभाव असलेले रूग्ण, स्मरणशक्ती आणि एकाग्रता नष्ट झालेले, रोग किंवा ताण यामुळे अकाली वृद्धत्व येणे.

* बाळांसाठीचा आहार: ज्या बाळांना स्तनपान केले जात नाही किंवा बाटलीने दूध दिले जात नाही अशा बाळांना ताज्या दूधाबरोबर दिले जाते. याच्यामुळे पचन, आतड्याच्या/शौचास होण्याच्या सवयी, सामान्य आरोग्य यांमध्ये सुधारणा होते आणि वजन वाढविण्यास मदत होते.

* वाढणा-या लहान मूलांसाठी: खनिजे आणि इतर पोषकांशाच्या वाढत्या गरजा भागवितात, कुपोषण सुधारते, भूक लागणे, मानसिक आणि शारीरिक शक्ती यांमध्ये सुधारणा होते, आणि वजन वाढते.

* स्तनपान करणा-या स्त्रिया गरोदरपणामध्ये आणि स्तनपान कालावधीमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि इतर खनिजे पुरवते. स्तनपान करण्याचा ताण घालविते आणि आईचे दूध समृद्ध करते.

* मनावर ताण येणारे काम करणारे: अति प्रमाणात काम करणे आणि मानसिक ताण यातून आराम मिळतो.

* वयस्कर व्यक्ती: वृद्धापकाळामध्ये आरोग्य पुनर्प्राप्त करण्यासाठी.

* आजार आणि त्यातून बरे होणे: शरीराची संरक्षण यंत्रणा वाढविण्यास मदत करते, भूक लागणे आणि पचनक्रिया सुधारून बरे होण्याचा वेग वाढविते.

* अशक्तपणा/रक्तहीनता: अशक्तपणाच्या उपचाराचे एक संयोजन म्हणून काम करते सामान्य अशक्तपणा कमी करते, भूक वाढवते.

मात्रा:

आल्बो सांग पावडर नवजात बालकांसाठी आणि लहान मूलांसाठी योग्य आहे. प्रौढ लोक गोळयांची निवड करू शकतात. हे चहा, कॉफी, दूध, दही, लापशी, फळांचा रस आणि कोणताही द्रवरूप आहार किंवा पाण्यात विरघळवून घेता येते.

नवजात बालके: 1/4 टीस्पून भरून दिवसातून दोन वेळा.

लहान मूले: 1/2 टीस्पून भरून दूधातून दिवसातून दोन वेळा.

प्रौढ: 1 टीस्पून भरून  किंवा 2 गोळया दिवसातून दोन वेळा.

पाकीट:

200ग्रॅ आणि 400 ग्रॅ  पावडरचे पेट जार्स (प्लॅस्टिकच्या डब्या)

300 गोळयांची बाटली

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 10 स्ट्रीप्सचा बॉक्स

**अल्बोव्हिट पावडर**

सर्व वयोगटासाठीचे आणि स्त्री-पुरूषांसाठीचे पूर्ण पूरक

वर्णन:

शतवारी आणि केशरासह नैसर्गिक महत्वाच्या पोषक द्रव्यांचे मिश्रण/संयोजन.

| औषधाचे घटकद्रव्य: | प्रत्येक 100ग्रॅ. पावडर मध्ये समावेश असतो |
|---|---|
| शतावरी मूळापासून काढण्यात आलेला शतावरी अर्क (*ऍस्पारॅगस रेसमोसस*) | 40 ग्रॅ. |
| बदाम फळ (*प्रुनस ऍमिगडालस*) | 10 ग्रॅ. |
| खजूर फळ (*फोएनिक्स डॅक्टीलिफेरा*) | 15 ग्रॅ. |
| केशराच्या काड्या (*क्रोकस सॅटेव्हस*) | 25 ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

हे शतावरी, सुखा मेवा, आणि केशर यांनी समृद्ध असलेले एक अद्वितिय उत्पादन आहे. शतावरी हे एक ऍण्टीऑक्सिडंट, पाचक, चयापचय क्रिया वाढविणारे आणि ताण-रोधक आहे. हे नैसर्गिक प्रथिने, खनिजे आणि पोषक द्रव्ये यांनी समृद्ध आहे. हे स्त्रियांमधील दूधाचे उत्पादन वाढविते, स्तनांच्या ग्रंथींचे वजन आणि प्रमाण

वाढविते, हे प्रतिजैविक आहे. हे पुरूष प्रजनन संस्थेसाठी एक टॉनिक म्हणून सुद्धा काम करते कारण हे निरोगी शुक्राणू तयार होण्यास सहाय करते आणि त्यांची गणना वाढविते. असे सांगितले जाते की हे पुरूषांमधील लैंगिक समस्या कमी करते आणि नपुसंकत्वाची स्थिती सुधारण्यास मदत करते. बदाम हे जीवनसत्व ई चे समृद्ध स्त्रोत आहे आणि ते कॅल्शियम आणि फॉस्फरस ने बांधले गेले आहे. खजूर हे आहारातील पोटॅशियमचे एक उत्कृष्ठ स्त्रोत आहे. केशरामध्ये उत्कृष्ठ ऍण्टीऑक्सिडंटचे गुणधर्म आहेत.

मात्रा:

एक कप दूधामध्ये किंवा पाण्यामध्ये 2 ते 3 टीस्पून भरून पावडर मिसळायची आणि दररोज दोन वेळा घ्यायची.

सुचविले गेले आहे:

जे पुरूष किंवा स्त्रिया वजन वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत ते याचा उपयोग एक प्रथिन पूरक म्हणून करू शकतात. स्तनपान करणा-या स्त्रियांमध्ये, हे एक उत्कृष्ठ मॅमोजेनिक (स्तनाच्या ग्रंथी विकसित करणारे) आणि एक गॅलॅक्टॅगॉग (आईच्या दूधाचा प्रवाह वाढविणारे) म्हणून कार्य करते.

पाकीट:

200ग्रॅ पावडरचे पेट जार्स (प्लॅस्टिकच्या डब्या)

**बायो-साल**

नवजात बालकांच्या आजारांसाठी

वर्णन:

नवजात बालके आणि लहान मूले यांच्यामधील पचनाच्या तक्रारींसाठीची विश्वासार्ह वनौषधी.

बायो-साल मध्ये मद्य, क्लोरोफॉर्म, नार्कोटिक्स/अंमली पदार्थ आणि गुंगी आणणारे पदार्थ नाहीत.

औषधाचे घटकद्रव्य:

प्रत्येक 5 मिलि (अंदाजे एक टीस्पून भरून) सिरप/पातळ औषधामध्ये समावेश असतो:

बाळंतशेपाचे तेल (डिल ऑईल) 0.0018 मिलि अधिक खालील 5 मि.ग्रॅ. पदार्थांपासून काढण्यात आलेले पाण्यात विरघळणारे अर्क:

लेंडी पिंपळी (पायपर लाँगम)

भारतीय तगर (व्हॅलेरीयन) (नार्डोस्टॅचि जटामांसी)

बाळहरडा (*टर्मिनालिया चेबुला*)

सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*)

वेखंड (*एॅकोरस कॅलमस*)

रेवंदचिनी(*रेहेम वेब्बियनम*)

जेष्ठमध (*ग्लायसिरीझा ग्लॅब्रा*)

ओवा (*पायचोटिस अजवायन*)

लघु तलिसपत्र (*एॅबीस वेब्बियाना*)

सुचविले आहे:

पोट दुखणे, वातबद्धता, झोप न लागणे, एॅसिडिटी/पित्त होणे, दात खाण्याशी संबंधित विकार इ. हे पोट/आतड्यामध्ये कळ येण्यापासून त्वरीत आराम देते, अतिसार रोखते, आणि पचन संस्थेची कार्यक्षमता वाढविते.

मात्रा: (बहुतेक करून दिवसाला 2 ते 3 वेळा)

| | |
|---|---|
| नवजात बालकांसाठी: | 1/4 टीस्पून |
| 1 महिने ते 6 महिन्यांपर्यंत: | 1/2 टीस्पून |
| 6 महिने ते 1 वर्षापर्यंत: | 1 टीस्पून |
| 2 वर्षे: | 1 ते 2 टीस्पून्स |

पाकिटे:

100 सिरप ची बाटली

**ब्रॉम्हडाइन**

गर्भाशयाच्या टॉनिकच्या गोळया

वर्णन:

शतकानुशतके गर्भाशयाचे टॉनिक म्हणून काम करण्यास प्रसिद्ध असलेले आयुर्वेदिक औषधांचे एक मिश्रण/संयोजन.

| औषधाचे घटकद्रव्य: | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| बाळतगर (*व्हॅलेरीयान वालिची*) | 28 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 28 मि.ग्रॅ. |
| लोध्र (*सिमप्लोकॉस रॅसेमोसा*) | 52 मि.ग्रॅ. |
| अशोक (*साराका इंडिका*) | 52 मि.ग्रॅ. |
| स्वर्णक्षिरी/कांटेधोत्रा (*आर्गेमोन मेक्सिकाना*) | 2 मि.ग्रॅ. |
| शतावरी (*ऍस्पारॅगस रेसमोसस*) | 40 मि.ग्रॅ. |
| शिरपोरंजया (*व्हिब्रुनम फोएटिडम*) | 26 मि.ग्रॅ. |
| उलाटकमबल (*ऍब्रोमा ऑगुस्टा*) | 40 मि.ग्रॅ. |
| जेष्ठमध (*ग्लायसिरीझा ग्लॅब्रा*) | 14 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

दातांच्या ऊतींचा दाह होणे, हिरड्यांना सूज येणे आणि हिरड्या ठिसूळ होऊन रक्त येणे यांसाठीचे उत्कृष्ठ मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | |
|---|---|
| | प्रत्येक 100 ग्रॅ.मध्ये समावेश असतो |
| हरितकी/हिरडा | 12 मि.ग्रॅ. |
| वावडिंग | 15 मि.ग्रॅ. |
| कानन एरंड | 20 मि.ग्रॅ. |
| वेम्बाका | 17 मि.ग्रॅ. |
| ओवा | 1 मि.ग्रॅ. |
| तुरटी | 34 मि.ग्रॅ. |
| गंधरपूर/कापूर तेल | 1 मि.ग्रॅ. |
| सुधा | क्यू.एस./पुरेसे प्रमाण |

औषधनिर्माणशास्त्र:

बारीक पूड केलेल्या हरीतकीचा वापर एक दंतमंजन म्हणून केला जातो, याचा उपयोग हिरड्यांना रक्त येणे आणि हिरड्यांना जखम होणे याच्यावर केला जातो. वावडिंगाचा उपयोग दातदुखी आणि तोंड येणे याच्यावर केला जातो. कानन एरंडाचा उपयोग हिरड्यांना मजबूती देण्यासाठी होतो. वेम्बाका किंवा कडुलिंब दातदुखी, श्वासाची दुर्गंधी आणि हिरड्यांचे रोग बरे करतात. ओवा हे एक ॲण्टीसेप्टिक, वेदनशामक, बधिरपणा आणणारे आणि एक जीवाणूरोधक आहे. तुरटी ठिसूळ झालेल्या, रक्त येणा-या हिरड्यांसाठी, सैल झालेल्या दातांसाठी आणि तोंड आलेल्यासाठी वापरले जाते.

सुचविले आहे:

दातांच्या ऊतींचा दाह होणे, हिरड्यांना सूज येणे आणि श्वासाची दुर्गंधी यांसाठी.

लावणे:

दंतमंजनाने दात घासण्यासाठी आणि हिरड्या चोळण्यासाठी वापर केला जातो. दंतमंजनाचा उपयोग केल्यानंतर 5 – 10 मिनिटे तोंडाची चूळ भरू नका किंवा गुळण्या करू नका. रात्री झोपण्याच्या आधी आणि सकाळी पहिल्यांदा या दंतमंजनाचा उपयोग करा. एक ग्लासभर कोमट पाण्यामध्ये 5 मिलि मिसळा आणि गुळण्या करण्यासाठी वापरा.

नियमित वापर केल्याने दातांच्या ऊतींचा दाह होणे बरे होते. जर येथे खूप पू झाला असेल, किंवा श्वासाला दुर्गंधी येत असेल (हॅलिटोसिस) तर रात्री आणि सकाळी दंतमंजनाने दात घासल्यानंतर आणि हिरड्या चोळल्यानंतर हिरड्यांना लावण्याचे लेपन म्हणून एन्ट्रॉप्सचा वापर करा.

पाकीट:

50 ग्रॅ. पावडरची एचडीपीई जार/डबी.

**मेडिटॅब**

खोकला-रोधक गोळ्या

वर्णन:

खोकल्यावर त्याच्या उपचारात्मक परिणामासाठी चांगले माहित असलेले आयुर्वेदिक औषधांचे मिश्रण/संयोजन. अशक्तपणासह जुनाट खोकल्यामध्ये शरीरसंस्थेला बळ देण्यासाठी कपर्दिका भस्माचा समावेश असतो.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| नला/रानतंबाखु (*लोबेलिया निकोटियानाएफोलिया*) | 51 मि.ग्रॅ. |
| दुधी (*इयुफोर्बिया पिलुलिफेरा*) | 27 मि.ग्रॅ. |
| कपर्दिका भस्म (कॅल्सिनेड कौराईज) | 7 मि.ग्रॅ. |
| वसाका/अडुळसा (*आधतोड व्हसिका*) | 63 मि.ग्रॅ. |
| लसूण (*ऍलियम सॅटिव्हम*) | 7 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

अडुळसा, नला/रानतंबाखु आणि दुधी हे कफ पातळ करण्यामधील कफ बाहेर टाकण्यासाठी उपयोगी आहेत (तीव्र खोकल्यासाठी कॉफलिनपाहा). लसणामध्ये कफ बाहेर पाडणारे, ऍण्टीसेप्टिक, घामाचे प्रमाण वाढविणारे आणि लघवीचे प्रमाण वाढविणारे गुणधर्म आहेत. याचा वापर जुनाट ब्रॉन्कायटिस आणि फुफ्फुसाच्या इतर स्थितींमध्ये केला गेला आहे. कपर्दक भस्म हे एक सामान्य टॉनिक म्हणून काम करते असे मानले गेले आहे विशेषत: फुफ्फुसाच्या जुनाट रोगांमध्ये उदा. क्षयरोगामध्ये.

सुचविले आहे:

जुनाट खोकला, क्षयरोगातील खोकला आणि जुनाट दम्याचा खोकला.

टीप: तीव्र खोकल्यासाठी, कोफ्लिनचा वापर करा. त्रासदायक उबळ येण्याच्या खोकल्यासाठी आलटून पालटून डॅन्जाईन आणि डेस्मा चा वापर करा. छातीला चेसॉल किंवा रबजॉन ने मसाज/चोळले जाऊ शकते.

मात्रा:

1 ते 2 गोळया दूधाबरोबर किंवा मधाबरोबर, दररोज तीन वेळा.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

20 गोळयांची बाटली.

**मेर्सिना**

मधुमेह-रोधक कॅप्स्युल्स

वर्णन:

मेर्सिना हे एक पॉली हर्बल (अनेक वनौषधी असलेले) हे इन्सुलिनवर अवलंबित्व-नसलेल्या आनुवंशिक मधुमेहाच्या (प्रकार 2 चा मधुमेह) व्यवस्थापनासाठी प्रभावी असलेले मिश्रण/संयोजन आहे.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक कॅप्स्युलमध्ये समावेश असतो |
|---|---|
| मेरासिंगी/बेडकीचा पाला (*जिम्नेमा सिल्व्हेस्ट्रे*) | 75 मि.ग्रॅ. |
| कारले (*मोमॉर्डिका चरान्टिया*) | 81 मि.ग्रॅ. |
| तरवडा (*कॅस्सिया औरीक्युलाटा*) | 63 मि.ग्रॅ. |
| जांभुळ (*सिझिगियम क्युमिन*) | 96 मि.ग्रॅ. |
| आवळा (*पॅलिएॅन्थस एम्ब्लिका*) | 48 मि.ग्रॅ. |
| कडुलिंब (मेलिया*अझदिरचता*) | 30 मि.ग्रॅ. |
| मेथी (*ट्रायगोनेल्ला फोएनम ग्रेसियम*) | 15 मि.ग्रॅ. |
| कोवाई (*कॉकिनिया इंडिका*) | 93 मि.ग्रॅ. |
| गुळवेल (*टिनोस्पोरा कॉर्डिफोलिया*) | 63 मि.ग्रॅ. |
| जवाखार | 12 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

मेरासिंगी/बेडकीचा पाला, कारले, तरवडा, आवळा, कडुनिंब, गुळवेल हे मधुमेहाच्या उपचारासाठी उपयोगी आहेत. जांभुळामध्ये मधुमेह-रोधक क्रिया आहे आणि त्यामध्ये फेनोलिक (चयापचयाशी संबंधित) पदार्थ असतो, स्टार्चचे (पिष्ठमय पदार्थांचे) साखरेमध्ये होणा-या निदानात्मक परिवर्तनाला अडथळा निर्माण करते आणि तसेच लघवीमधील साखरेचे प्रमाण कमी करते आणि मधुमेहातील तहान दूर करते. मेथी एक मधुमेह-रोधक परिणाम प्रदान करते आणि याचा वापर इन्सुलिन बरोबर सुद्धा करता येतो. कोवाई हा इन्सुलिन साठीचा एक स्वदेशी पर्याय आहे आणि साखरेचे प्रमाण कमी करण्यामध्ये लक्षणीय परिणाम देते.

सुचविले आहे:

प्रकार-2 च्या मधुमेहासाठी

मात्रा:

नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण करण्याच्या 30 मिनिटे आधी 1 ते 2 कॅप्स्युल्स.

उपचारात्मक वापर:

मेर्सिना, इन्सुलिनवर अवलंबित्व-नसलेल्या आनुवंशिक मधुमेहाच्या (प्रकार 2 चा मधुमेह) प्रभावी नियंत्रणासाठी या मात्रांच्या श्रेणीमध्ये घेण्याचा सल्ला देणे सुरक्षित असू शकेल, विशेषत: सामान्यापेक्षा जास्त वजन असलेल्या रूग्णांना हे उपयोगी आहे.

विरूद्ध लक्षणे:

इन्सुलिनवर अवलंबित्व (प्रकार-1 चा मधुमेह) असलेल्यांसाठी, मधुमेहाशी संबंधित केटोसिस, पूयुक्त फोड झाल्यास, गरोदरपणामध्ये आणि स्तनपान कालावधीमध्ये शर्करेचे प्रमाण अत्यंत उच्च असल्यास (हायपरग्लायसेमिया) मेर्सिनाची शिफारस केली जात नाही.

दुष्परिणाम:

शिफारस केलेल्या मात्रा दिल्या असता काहीही नाहीत

पाकीट:

प्रत्येकी 10 कॅपस्युल्सची एक स्ट्रीप अशा 5 स्ट्रीप्सचा बॉक्स

**नेव्हॉस्स**

चेतासंस्थेचा अशक्तपणा आणि चिंता यांच्या उपचारासाठीच्या गोळया.

वर्णन:

चेतासंस्थेतील बिघाड आणि चेतासंस्थेवरील ताणाचे विविध प्रकटीकरण (स्वरूपे) यांसाठीचे आयुर्वेदिक औषधांचे एक मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| खुरसनी ओवा (*हाओस्किएॅमस नायजर)* | 20 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 60 मि.ग्रॅ. |
| जेष्ठमध (*ग्लायसिरीझा ग्लॅब्रा*) | 45 मि.ग्रॅ. |
| जायफळ (*मायरीस्टिका फ्रॅग्रॅन्स*) | 05 मि.ग्रॅ. |
| गोखरू (*ट्रिबुलस टेरेस्ट्रिस*) | 80 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

खुरसनी ओवा हे एक संमोहक, गुंगी आणणारे म्हणून, आणि आतड्यामध्ये पिळवटून कळ येणे यावर आणि मूत्र मार्गासाठी वापरले जाते. गोखरू हे वीर्यपात होणे आणि फॉस्फेटयुरीया (लघवीमध्ये फॉस्फेटचे प्रमाण जास्त असणे) आणि प्रजनन-मूत्र मार्गांच्या समस्या असल्याच्या संदर्भात एक टॉनिक, कामोत्तेजक आणि शीतलता देणारे  म्हणून वापरले जाते. जेष्ठमधाचा वापर एक टॉनिक, शीतलता देणारे आणि वेदनाशामक म्हणून केला जातो. अश्वगंध हे गुंगी आणणारे आणि टॉनिक आहे. जायफळ हे एक सुगंधी आणि एक उत्तेजक आहे.

सुचविले आहे:

चेता संस्थेची सर्व लक्षणे दिसून येणे, चिंता, वारंवार लघवीला होणे, जठर-आतड्यामध्ये पेटके येणे, कंप सुटणे इ. साठी. जास्त प्रमाणात शारीरिक आणि मानसिक ताणामुळे चेतासंस्थेमध्ये बिघाड होणे. चैतन्य नाहीसे होणे, वीर्यपतन, असामान्य लैंगिक इच्छा किंवा जास्त प्रमाणात घाम येणे. मानसिक कार्य थांबवत नाही, किंवा मानसिक गोंधळ होऊ देत नाही.

मात्रा:

प्रौढ: 1 ते 2 गोळया प्रत्येक 3 ते 4 तासांनी. दूधाबरोबर घेतल्यास उत्तम असते.

लहान मूले: 1/4 ते 1/2 गोळी प्रत्येक 4 तासांनी.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

100 गोळयांची बाटली

**ओलोसिन**

केस मजबूत व्हावेत आणि चेतासंस्था शांत करण्यासाठी टाळू/डोक्यावरच्या त्वचेवर  मसाज करण्यासाठीचे बाह्य भागावर लावायचे तेल.

वर्णन:

चेतासंस्था शांत करण्याची क्रिया करण्यासाठीचे खाद्य तेलामध्ये मिसळलेले आयुर्वेदिक वनौषधींचे अर्क.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 100ग्रॅ. तेलामध्ये समावेश असतो |
|---|---|
| भृग्रा/माका (*एक्लिप्टा अल्बा*) | 0.66 मि.ग्रॅ. |
| कडुलिंब (मेलिया*अझदिरचता*) | 0.66 मि.ग्रॅ. |
| गजगा (*कॅएसालपिनिया बॉण्डक*) | 0.66 मि.ग्रॅ. |
| ब्राम्ही (*हायड्रोकोटाईल ऍसिऍटिका*) | 0.66 मि.ग्रॅ. |
| मेथ्या (*ट्रिगोनेल्ला फोएनम ग्रॅएसियम*) | 2.2 मि.ग्रॅ. |
| धोतरा (*धतुरा मेटेल*) | 1.32 मि.ग्रॅ. |
| आवळा (*एम्ब्लिका ऑफिसिनालिस*) | 3.33 मि.ग्रॅ. |
| खाद्य तेल | क्यू.एस./पुरेसे प्रमाण |

औषधनिर्माणशास्त्र:

सुप्रसिद्ध भारतीय औषधी वनस्पतींच्या तेलाचा अर्क. जेव्हा बाहेरच्या भागावर चोळतो, तेव्हा हे स्नायूंना आणि शिरांना शांत करणा-या टॉनिकचा परिणाम देते, आणि त्वचेच्या ब-याच स्थितींमध्ये जखम ब-या होण्याचा सुद्धा परिणाम देते. हे नसांची आक्रमकता सुद्धा नियंत्रित करते, आणि सौम्य बधिरपणा देण्याची क्रिया सुद्धा करते. आवळा हे टॅन्निसने (विरघळणा-या पदार्थाने) समृद्ध आणि हे फिक्स्ड तेल (वाफ होऊन उडून न जाणारे)

आहे. हे केसांना मजबूती देते आणि केसांच्या वाढीला चालना देते. ब्राम्ही हे एक त्या जागी लावण्याचे उत्तेजक आहे, हे सोलवटलेली त्वचा, इसब आणि त्वचेवर व्रण पडणे यांसाठी उपयोगी आहे. भृग्रा/माका मध्ये तेलात विरघळणारे रंग असतात, हे टक्कल पडणे आणि त्वचा रोगांमध्ये उपयोगी आहे. कडुनिंब उवांना मारण्यासाठी आणि डोक्यावरील त्वचेचे सोलवटणे बरे करण्यासाठी उपयोगी आहे. मेथ्यांच्या दाण्यांमध्ये थंडावा देण्याचा आणि त्वचा मऊ करण्याचा परिणाम असतो, केसांच्या वाढील चालना देते, तसेच केस गळणे सुद्धा थांबवते. धोतरा उवांना प्रतिबंध करण्यासाठी आणि त्वचा सोलवटण्यासाठी उपयोगी आहे. गजग्यामध्ये फिक्स्ड तेल आहे जे पक्षघात आणि चेतासंस्थेच्या तक्रारींसाठी उपयोगी आहे.

लावणे:

याचा वापर केसांचे तेल म्हणून केला जातो. रात्री झोपण्याच्या आधी डोक्यावरच्या त्वचेवर बोटांनी मसाज केला असता, रात्री शांत झोप लागते, डोकेदुखीपासून आराम मिळतो आणि सौम्य गुंगी आणणारी क्रिया देते. यामध्ये केसांच्या वाढीसाठीची टॉनिकची एक क्रिया आहे आणि केस गळण्यावर वापरता येते. शरीरावर मसाज करण्यासाठी कोणत्याही तेलाबरोबर 1: 5 च्या प्रमाणात मिसळा आणि अंघोळीच्या आधी मसाज करा. ओलोसिन हे अपस्मार, उन्माद आणि उदासिनतेच्या विकारांमध्ये उपयोगी आहे. जर मध्यकर्णाच्या पातळ त्वचेवर कोणतेही छिद्र नसेल, तर डोक्यावर लावण्या व्यतिरीक्त कानामध्ये दिवसातून एक वेळा दोन थेंब घाला.

पाकीट:

50 मिलि तेलाची बाटली

100 मिलि तेलाची बाटली

## रेमोरीन

ह्रमॅटिक-रोधक (सांध्यांचा विकार) कॅप्स्युल्स

वर्णन:

ह्रमॅटॉईड संधिवात आणि ऑस्टिओअर्थ्रायटिस (एक प्रकारचा संधीवात) यांसाठीचे आयुर्वेदिक औषधांचे एक मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

प्रत्येक कॅप्स्युलमध्ये
समावेश असतो

| | |
|---|---|
| गुग्गुळ (*बालसॅमोडेन्ड्रॉन मुकुल*) | 100 मि.ग्रॅ. |
| आवळा (*पॅलिएॅन्थस एम्ब्लिका*) | 37 मि.ग्रॅ. |
| पांढरे मीठ (*सोडियम क्लोरीडम*) | 37 मि.ग्रॅ. |
| सैंधव (*पोटॅस्सी नायट्रास*) | 37 मि.ग्रॅ. |
| हिरडा (*टर्मिनालिया चेबुला*) | 37 मि.ग्रॅ. |
| बेहरा (*टर्मिनालिया बेलेरीका*) | 37 मि.ग्रॅ. |
| सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*) | 37 मि.ग्रॅ. |
| काळे मिरे (*पायपर निग्रम*) | 37 मि.ग्रॅ. |
| पिंपळी (*पायपर लाँगम*) | 37 मि.ग्रॅ. |
| गजपिप्पल (*स्किन्डाप्सस ऑफिसिनालिस*) | 37 मि.ग्रॅ. |
| वावडिंग (*एम्बेलिया राईबस*) | 37 मि.ग्रॅ. |
| जिरे (*क्युमिनम सिमिनम*) | 37 मि.ग्रॅ. |
| काळेजीरे (*कॅरम निग्रम*) | 37 मि.ग्रॅ. |
| कबाबचिनी/कंकोल (*क्युबेब ऑफिसिनालिस*) | 37 मि.ग्रॅ. |
| कुलनांजन (*ऍल्पिनिया गॅलंगा*) | 37 मि.ग्रॅ. |
| निरगुडी (*व्हायटेक्स नेगुंडो*) | 37 मि.ग्रॅ. |
| धणे (*कॉरीएॅण्ड्रम सॅटिव्हम*) | 37 मि.ग्रॅ. |
| लघु तलिसपत्र (*एॅबीस वेब्बियाना*) | 37 मि.ग्रॅ. |
| कुटकी (*पिक्रो-हीझा कुर्रोआ*) | 37 मि.ग्रॅ. |
| मोथा (*सायपरस रोटांडस*) | 37 मि.ग्रॅ. |
| छोटा वेलदोडा (*एलेट्टारीया कॅडामोमम)* | 37 मि.ग्रॅ. |
| लहान गोखरू (*ट्रिबुलस टेर्रेस्ट्रिस*) | 37 मि.ग्रॅ. |
| जवाखार (*पोटॅशियम कार्बोनस*) | 37 मि.ग्रॅ. |
| वेखंड (*एॅकोरस कॅलमस*) | 37 मि.ग्रॅ. |
| मिठा इन्दारजौ/श्वेत कुटज (*व्रघटिया टिन्कटोरीया*) | 37 मि.ग्रॅ. |
| ओवा (*पायचोटिस अजवायन*) | 37 मि.ग्रॅ. |
| अतिविष (*एॅकोनिटम हेटेरोफिलम*) | 37 मि.ग्रॅ. |
| सदाव (रूता ग्रॅव्हेओलेन्स) | 37 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

सांध्यांमधील दाह कमी करते; वेदना ब-या करते; स्नायूंचे पिळवटणे नियंत्रित करते; चरबीची झीज होण्यामधील बदलांचा वेग कमी करते. गुग्गुळ जो रेमोरीनचा घटक आहे ते हायपो-लिपिडेमिक (लिपिडचे प्रमाण कमी असणे) आणि हायपो-कोलेस्टेरेमिक (कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी असणे) क्रिया प्रदान करते.

सुचविले आहे:
हृमॅटॉईड संधिवात, ऑस्टिओ-संधिवात, अर्थ्राल्जिया (सांधेदुखी), ऍन्किलोझिंग स्पॉन्डिलायटिस (एक प्रकारचा संधिवात), सर्व्हायकल स्पॉन्डिलायटिस (मणक्यांना सूज येणे), आणि खांदे बाहू यांची संलक्षणे. लठ्ठपणा असलेल्या रूग्णांमध्ये रेमोरीनचा एक बोनस (जास्तीचा) फायदा म्हणजे रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळया कमी होणे.

मात्रा:
प्रौढ: सुरूवातीला: पहिल्या 15 दिवसांसाठी 2 कॅप्स्युल्स दिवसातून 3 वेळा.
त्यानंतर: 1 कॅप्स्युल दिवसातून 3 वेळा कमीतकमी 90 दिवसांसाठी. अशक्त आणि कमकुवत असलेले रूग्ण एखाद्या कमी मात्रेलासुद्धा प्रतिसाद देऊ शकतील. जीवनसत्व सी किंवा एक ताजे लिंबूवर्गीय फळ रोज खाल्ले पाहिजे.

विरूद्ध लक्षणे: गरोदरपणामध्ये , स्तनपान करण्याच्या वेळी आणि अतिसारामध्ये.

पाकीट:
प्रत्येकी 10 कॅप्स्युल्सची एक स्ट्रीप अशा 3 स्ट्रीप्सचा बॉक्स

**रेमोरीन तेल**

हृमॅटिक-रोधक तेल

वर्णन:
संधिवातामधील वेदना, सांधेदुखी, सांधे कडक होणे आणि सायटिका (पाठ, कंबर, कुल्ले, पोट-या यांमध्ये वेदना कळा येणे) यांसाठीचे आयुर्वेदिक औषधांचे एक संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

प्रत्येक 100 मि.ग्रॅ. तेलामध्ये

| | |
|---|---|
| | समावेश असतो |
| गुग्गुळ (*बालसॅमोडेन्ड्रॉन मुकुल*) | 5 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 5 मि.ग्रॅ. |
| निरगुडी (*व्हायटेक्स नेगुंडो*) | 5 मि.ग्रॅ. |
| रसना (*ऍल्पिनिया गॅलंगा*) | 5 मि.ग्रॅ. |
| हळद (*करकुमा लोंगा*) | 2 मि.ग्रॅ. |
| शेवगा (*मोरींगा ओलेइफेरा*) | 5 मि.ग्रॅ. |
| धोतरा (*धतुरा मेटेल*) | 3 मि.ग्रॅ. |
| सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*) | 3 मि.ग्रॅ. |
| एरंड (*रीसिनस कॉम्युनिस*) | 4 मि.ग्रॅ. |
| रूई (*कॅलोट्रॉपिस गिगांटिया*) | 3 मि.ग्रॅ. |
| कापूर (*कॅम्फोरा ऑफिसिनारम*) | 5 मि.ग्रॅ. |
| पुदिना अर्क (*मेंथा आर्व्हेन्सिस*) | 5 मि.ग्रॅ. |
| गंधपुरा तेल (विंटर ग्रीन ऑईल) | 6 मिलि |
| गंधबिरोजा (*पायनस पॅलसट्रिस*) | 4 मिलि |
| खाद्य तेल | क्यू.एस./पुरेसे प्रमाण |

औषधनिर्माणशास्त्र:

गुग्गुळ हे ऍन्किलोसिस (सांध्यांमधील हाडांच्या हालचाली बंद होणे), हृमॅटॉईड संधिवात आणि संबंधित विकार यांसाठी उपयुक्त आहे. हे कोणत्याही शरीर संस्थेमध्ये प्रवेश करू शकते आणि त्याच्या क्रियेच्या जागेवर पोहोचू शकते. अश्वगंधामध्ये दाह-रोधक, संधिवात-रोधक आणि वेदनाशामक परिणाम असतात. निरगुडी हे तीव्र हृमॅटिझम मुळे झालेल्या सांध्यांवरची सूज कमी करण्यासाठी अत्यंत उपयोगी आहे. रसनाचा वापर हृमॅटिझम आणि संबंधित विकारांमध्ये केला जातो. हळदीमध्ये त्या जागेचा आणि शरीरातील दाह-कमी करण्याचे गुणधर्म असतात. शेवग्याचा वापर हृमॅटिझम आणि सांधे दुखी मध्ये केला जातो. धोत-याचा वापर हृमॅटिक वेदना, सांध्यांची सूज, कमरेमध्ये उसण भरणे, सायटिका आणि चेतासंस्थेच्या वेदना कमी करण्यासाठी केला जातो. एरंडचा वापर हृमॅटिक विकारांमध्ये आणि उसण भरणे यामध्ये केला जातो. रूई, वेदनादायक सांध्यांवर आणि सूजेवर लावली जाते. सुंठ, कापूर, पुदिना अर्क, गंधबिरोजा आणि गंधपुरा तेल यांचा वापर त्या जागेचे उत्तेजक म्हणून आणि त्वचा लाल होण्यावर केला जातो. औषध जास्तीतजास्त आत शिरावे, वेगाने आणि परिणामकारकतेने आराम मिळावा यासाठी रेमोरीनच्या तेलाचा बेस/आधार विशेषकरून वरील घटकांनी तयार केला जातो.

सुचविले आहे:
संधिवातातील दुखणे, सांध्याच्या वेदना, सांधे कडक होणे आणि सायटिका.

लावणे:
प्रभावित भागाचा पृष्ठभाग साबणाने आणि कोमट पाण्याने धुवा. ते पूर्णपणे कोरडे करा. रेमोरीन तेल हळूवारपणे लावा त्यानंतर गरम पाण्याने शेक द्या. मसाज करू नका. त्याच्या बरोबर रेमोरीन कॅप्स्युल्सचा वापर करण्याने पूर्ण आणि जलद आराम मिळतो.

पाकीट:
50 मिलि तेलाची बाटली
100 मिलि तेलाची बाटली

**रीपॅन्टो**

जळलेल्यावर आणि इसबावर लावण्यासाठीचे मलम

वर्णन:
जळलेल्या, भाजलेल्या भागावर, इसबावर, व्रणांवर लावण्यासाठीचे थंडावा देणारे मलम.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 100 मि.ग्रॅ. मध्ये समावेश असतो |
|---|---|
| ओलियम लिनी | 33.6 मि.ग्रॅ. |
| तीळाचे तेल | 8.8 मि.ग्रॅ. |

मधाच्या मेणाच्या बेसमध्ये/आधारभूत मध्ये

औषधनिर्माणशास्त्र:
ओलियम लिनी आणि तीळाचे तेल हे वेदनाशामक, दाह होणा-या पृष्ठभागांवर थंडावा देणारे असते आणि जखम बरी होण्यास मदत करते.

**लावणे:**

**जळणे आणि भाजणे:** प्रभावित भागावर मुक्त हस्ताने लावा. थंडावा देणारी क्रिया वेदनेपासून आणि आग होण्याच्या संवेदनेपासून आराम देते. प्रभावित भाग बरा होईपर्यंत हे सकाळी आणि रात्री लावावे. औषध लावल्यानंतर प्रभावित भाग मलमपट्टीने झाकून ठेवला जाऊ शकतो.

**व्रण पडणे, इसब, बेडसोर्स (अंथरूणावर खिळल्यामुळे होणा-या जखमा):** प्रभावित भाग कोमट पाण्याने धूतल्यानंतर आणि एका मऊ कापडाने कोरडा केल्यानंतर सकाळी आणि संध्याकाळी लावा.

**भेगा पडलेल्या त्वचेच्या जखमा आणि राठ त्वचा:** त्वचा मऊ राहण्यासाठी हलकासा मसाज करा. एक हलके क्रीम म्हणून चेह-यावर लावण्यासाठी वापरले जाते, तसेच तळहातांवर, तळपायांवर, भेगांवर/अंग फुटलेल्यावर किंवा कोरड्या आणि  आर्द्र वातावरणामुळे त्वचा सोलवटण्यावर वापरले जाते.
मूळव्याधीमध्ये सुद्धा लावता येते, शौचास होण्याच्या आधी आणि नंतर, बद्धकोष्ठता स्पोलॅक्स ने दुरूस्त केले पाहिजे.

पाकीट:
15ग्रॅ. ची ट्यूब

**रबजॉन**
डोकेदुखी आणि सर्दीसाठी वाफेचा-शेक

वर्णन:
बाह्य भागावर लावण्यासाठी चांगले-माहित असलेल्या घटकद्रव्यांचे एक मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 100 ग्रॅ मध्ये समावेश असतो |
|---|---|
| पुदिना अर्क (*मेंथा आर्व्हेन्सिस*) | 5 ग्रॅ |
| कापूर (*कॅम्फोरा ऑफिसिनारम*) | 10 ग्रॅ |
| निलगिरी तेल (*युकॅलिप्टस ग्लोबुलस*) | 2.5 मिलि |
| गंधबिरोजा (*पायनस पॅलसट्रिस*) | 2.5 मिलि |
| गंधपुरा तेल (*मिथाईल सॅलिसिलॅस)* | 5 मिलि |
| पॅराफिन बेस/अधारभूत | क्यू.एस./पुरेसे प्रमाण |

औषधनिर्माणशास्त्र:

विशेषकरून तयार करण्यात आलेल्या पॅराफिन बेसमुळे क्रिया दीर्घकाळ चालू राहते. गंधपुरा तेल त्वचेकडून सहज  शोषले जाते आणि उसण भरली असता, सायटिका आणि ह्रमॅटिक स्थितींमध्ये आराम मिळण्यासाठी वापरले जाते. पुदिना अर्क त्वचेला लावले असता रक्तवाहिन्या विस्तारतात आणि त्यामुळे थंडपणाची संवेदना होते त्यानंतर वेदना शमविण्याचा परिणाम होतो, आणि हे डोकेदुखी, ह्रमॅटिक वेदना आणि चेतासंस्थेच्या वेदनेसाठी उपयोगी आहे. कापूर सुद्धा त्वचा लाल होणे कमी करणारे म्हणून आणि एक सौम्य वेदनाशामक म्हणून काम करते आणि फायब्रोसायटिस (संयोजी तंतुमय ऊतींचा दाह) आणि चेतासंस्थेच्या वेदना यांमध्ये दाह शमविणारे म्हणून काम करते. निलगिरी तेल हे एक श्वसनसंस्थेसाठीचे ऍण्टीसेप्टिक आहे आणि याचा वापर नेहमी श्वासावाटे वाफ घेण्याच्या स्वरूपात केला जातो किंवा सर्दी झाली असता एक मलम म्हणून बाह्य भागावर लावण्यासाठी केला जातो. गंधबिरोजा तेल हे निलिगिरी तेलासारखे आहे, याचा वापर सुद्धा दाह कमी करण्यासाठी आणि जुनाट दाहक स्थितींच्या उपचारामध्ये चेतासंस्थेच्या वेदनेपासून आणि संधिवातामधील वेदनेपासून आराम मिळण्यासाठी त्वचेवर लावण्याचे एक उत्तेजक म्हणून केला जातो आणि ब्रॉन्कायटिस आणि प्युरीसी (फुफ्फुसावरणाचा दाह) छातीवर लावण्यासाठी केला जातो. जेव्हा श्वासावाटे आत घेतले जाते, हे दोन आवश्यक तेल जास्त प्रमाणातील स्त्राव रोखतात आणि ब्रॉन्कायटिस मधील श्वास नलिका चोंदण्यापासून आराम देते.

सुचविले आहे:

डोकेदुखी, सर्दी आणि खोलका, ब्रॉन्कायटिस, अंगदुखी आणि वेदना, चेतासंस्थेच्या वेदना, मुरडणे. छातीमध्ये भरलेल्या सर्दीसाठी/कफसाठी उकळत्या पाण्याच्या वाफेतून श्वासावाटे आत घ्या. प्रभावित भागावर रूबझॉन लावा आणि हळूवार मसाज करा.

पाकीट:

15ग्रॅ. ची ट्यूब

**सॉलफॉस**

पाचक आणि भूक वाढविणा-या गोळया

वर्णन:

भूक न लागणे आणि पचनाच्या विकारांवर आयुर्वेदिक औषधांचे मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| रेवंदचिनी (*रेहेम वेब्बियनम*) | 33 मि.ग्रॅ. |
| चित्रक/चित्रमूल (*प्लम्बॅगो झेलॅनिका*) | 33 मि.ग्रॅ. |
| बाळहरडा (*टर्मिनालिया चेबुला*) | 23 मि.ग्रॅ. |
| सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*) | 8 मि.ग्रॅ. |
| जिरे (*क्युमिनम सिमिनम*) | 4 मि.ग्रॅ. |
| लघु तलिसपत्र (*ऍबीस वेब्बियाना*) | 13 मि.ग्रॅ. |
| पपई (*कॅरीका पपया*) | 12 मि.ग्रॅ. |
| आवळा (*एम्ब्लिका ऑफिसिनालिस*) | 10 मि.ग्रॅ. |
| कुटकी (*पिक्रो-हीझा कुर्रोआ*) | 8 मि.ग्रॅ. |
| बडीशेप (*फोएनिक्युलम व्हल्गरे*) | 28 मि.ग्रॅ. |
| मसाला वेलदोडा (*ऍमोमम सुबुलॅटम*) | 3 मि.ग्रॅ. |
| चिरायता/किराईत (*स्वेर्टिया चिरायता*) | 8 मि.ग्रॅ. |
| धणे (*कॉरीऍण्ड्रम सॅटिव्हम*) | 3 मि.ग्रॅ. |
| भृग्रा/माका (*एक्लिप्टा अल्बा*) | 32 मि.ग्रॅ. |
| हळद (*करकुमा लोंगा*) | 33 मि.ग्रॅ. |
| ओवा (*पायचोटिस अजवायन*) | 12 मि.ग्रॅ. |
| पिंपळी (*पायपर लॉंगम*) | 4 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

रेवंदचिनी, लहान मात्रांमध्ये एक संकोचक, कडवट म्हणून, आणि अतिसाराच्या उपचारामध्ये वापरले जाते. बाळहरडा एक संकोचक, कडवट, भूक वाढवणारे म्हणून वापरले जाते आणि आतड्यांच्या हालचाली (शौचास होणे) नियंत्रित करते. जिरे हे एक वातहारक म्हणून वापरले जाते आणि भूक वाढविते. सुंठीचा वापर एक वातहारक म्हणून केला जातो आणि तसेच अंग आखडणे रोखते. चिरायता/किराईतचा वापर मुख्यत: पोटाच्या समस्यांसाठी आणि पचन चांगले व्हावे म्हणून केला जातो. बडीशेप वातबद्धता पासून आराम देते. आवळयाचा वापर आतड्याच्या हालचाली/शौचास होणे नियंत्रित करण्यासाठी केला जातो. लघु तलिसपत्र हे एक वातहारक, उत्तेजक आणि एक टॉनिक आहे. पपईचा वापर अपचन आणि आतड्यामध्ये जळजळ होण्यामध्ये जठर रसाचा अभाव असताना केला जातो. कूटकीचा वापर भूक न लागणे, पचन न होणे, अपचन यांमध्ये केला

जातो. हळद ही एक सुगंधी, वातहारक आणि कृमिनाशक आहे. मसाला वेलदोडा, चिरायता/किराईत, धणे, माका, ओवा आणि पिंपळी हे खूप चांगले पाचक, वातहारक आणि उत्तेजक आहे. यांचे संयोजन एक वातहारक, उत्तेजक आणि पित्तरसाचा स्त्राव वाढविणारे म्हणून क्रिया करते आणि हे पचन सुधारते.

सुचविले आहे:
भूक न लागणे, पित्तदोष, अपचनाशी संबंधित लक्षणे, वातबद्धता, जुनाट बद्धकोष्ठता आणि अपचनाचे किण्वन (आंबट पित्त) विकार.

मात्रा:
प्रौढ: भूक न लागण्याच्या संदर्भात एक पाचक टॉनिक म्हणून, प्रत्येक जेवणाच्या 30 मिनिटे आधी 2 गोळया.
इतर अपचनाशी संबंधित त्रासांमध्ये प्रत्येक जेवणानंतर 2 गोळया.
लहान मूले: 1/2 ते 1 गोळी.
नवजात बालके: बायो-साल ची शिफारस केली गेली आहे.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:
प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 10 स्ट्रीप्सचा बॉक्स
300 गोळयांची बाटली

**सेन्जाईन**
टॉनिकच्या या गोळया चेतासंस्थेमधील बिघाडासाठी

वर्णन:
सेन्जाईन मध्ये आयुर्वेदिक औषधाचे मिश्रण/संयोजन आहे.
सेन्जाईन हे एक लैंगिक क्रिया उत्तेजक नाही, पण चेतासंस्थेमधील बिघाडासाठीचे आणि लैंगिक अकार्यक्षमतेसाठीचे एक विश्वासार्ह टॉनिक आहे.

औषधाचे घटकद्रव्य:

आवरण नसलेल्या प्रत्येक
गोळीमध्ये समावेश असतो

| | |
|---|---|
| गोखरू (*ट्रिबुलस टेरेस्ट्रिस*) | 115 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 44 मि.ग्रॅ. |
| स्वर्णक्षिरी/कांटेधोत्रा (*आर्गेमोन मेक्सिकाना*) | 6 मि.ग्रॅ. |
| सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*) | 9 मि.ग्रॅ. |
| लसूण (*ऍलियम सॅटिव्हम*) | 2 मि.ग्रॅ. |
| वेखंड (*ऍकोरस कॅलमस*) | 8 मि.ग्रॅ. |
| जिरे (*क्युमिनम सिमिनम*) | 11 मि.ग्रॅ. |
| जेष्ठमध (*ग्लायसिरीझा ग्लॅब्रा*) | 25 मि.ग्रॅ. |
| जायफळ (*मायरीस्टिका फ्रॅग्रॅन्स*) | 11 मि.ग्रॅ. |
| छोटाचंद/सर्पगंधा (*रॉवोल्फिया सेरपेन्टिया*) | 3 मि.ग्रॅ. |
| बाळतगर (*व्हॅलेरीयान वालिची*) | 3 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

ही घटकद्रव्ये नसांना बधिर करण्याचे काम करतात; चिंता आणि ताण कमी करतात, आणि लैंगिक क्षमता पुन्हा प्राप्त करण्यासाठी मदत करतात. सुंठ ही एक वातहारक आहे आणि आरोग्य चांगले असल्याची एक संवेदना उत्पन्न करते. जिरे हा एक वातहारक, उत्तेजक आणि एक सुगंधी पदार्थ आहे. अश्वगंध सुद्धा मध्यवर्ती चेता संस्थेचे (सी.एन.एस.) बधिरपणा निर्माण करणारे आहे. गोखरू लघवीला होताना आग होणे आणि मूत्राच्या समस्या दुरूस्त करते आणि हे एक लैंगिक क्रिया उत्तेजक आहे. लसूण हे एक ऍन्टीसेप्टिक आहे ज्यामध्ये लघवीचे प्रमाण वाढविणारे आणि घामाचे प्रमाण वाढविणारे गुणधर्म आहेत. स्वर्णाक्षिरीची लहान मात्रा दिली असता मध्यवर्ती चेता संस्था (सी.एन.एस.) उत्तेजित करते. वेखंड हे एक उत्तेजक आहे आणि नसांमध्ये बधिरपणा निर्माण करते. जेष्ठमधाचा वापर एक टॉनिक, थंडावा देणारा पदार्थ आणि श्लेष्मल त्वचेची आग/जळजळ होणे कमी करणारे म्हणून केला जातो.जायफळ हे एक उत्तेजक आणि वातहारक आहे. छोटाचंद/सर्पगंधा चा वापर एक गुंगी आणणारे आणि संमोहक म्हणून केला जातो. बाळतगर हे एक उत्तेजक आणि नसा बधिर करणारे आहे.

सुचविले आहे:

नसांची दुर्बलता किंवा चेतासंस्थेमधील बिघाड यांमुळे झालेल्या नपुसंकत्वावर. लैंगिक क्षमता पुन्हा प्राप्त करण्यासाठीचे एक सौम्य गुंगी आणणारे.

मात्रा:

नसांना बधिरपणा देणा-या म्हणून 2 गोळया एका तासामध्ये आहार घेण्याच्या आधी.
एक लैंगिक क्रिया उत्तेजक म्हणून 2 गोळया, दिवसातून तीन वेळा.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट: 100 गोळयांची बाटली

**स्पोलॅक्स**

कणीदार सारक

वर्णन:

जुनाट बद्धकोष्ठतेसाठी आणि शौचास रोज वेळेवर होण्याची सवय लागण्यासाठीचे नैसर्गिक भाज्यांचे कणीदार सारक. याच्यामुळे आतड्याच्या आतील पदराची वेदना, अस्वस्थता किंवा जळजळ होत नाही.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 5 ग्रॅ कणीदार सारकामध्ये समावेश असतो |
|---|---|
| इसबगोल (*इस्पॅघुल टेस्टा*) | 2.5 ग्रॅ. |
| डींक | 0.5 ग्रॅ. |
| साना (भुई तरवड) अर्क | 0.1 ग्रॅ. |
| बडीशेप (*फोएनिक्युलम व्हल्गरे*) | 0.125 ग्रॅ. |
| जिरे (*क्युमिनम सिमिनम*) | 0.025 ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

साना (भुई तरवड) ची सक्रिय तत्वे अशी आहेत, जठर-आतड्याच्या मार्गातून शोषले जाते आणि मोठ्या प्रमाणात आतड्यामध्ये टाकले जाते, जेथे ते आतड्याच्या सामान्य कार्यासारखी पेरीस्टॅटिक हालचाल (स्नायूंचे आकुंचन होऊन अन्नाची हालचाल होऊन ते पोटात ढकलणे) उत्तेजीत करतात. बडीशेप हे एक सुगंधी वातहारक आहे. हे वातबद्धतेच्या उपचारासाठी दिले जाते. इसबगोल डींकाच्या बियांच्या कोंड्यापासून प्राप्त केले जाते, हे पाणी शोषते आणि याच्यामध्ये जीवाणू आणि इतर विषारी पदार्थ शोषण्याची एक लक्षणीय शक्ती असते. मऊ आणि अर्धवट घट्ट असलेल्या मलाची निर्मिती करण्याची क्रिया करणे ही पूर्णत: तांत्रिक बाब आहे.

सुचविले आहे:

आतड्याची अकार्यक्षमता, आहार अपूरा पडणे, आणि व्यायामाचा अभाव यांमुळे होणा-या नेहमीच्या/सवयीच्या बद्धकोष्ठतेसाठी; वयस्कर आणि लहान मूलांमधील बद्धकोष्ठतेसाठी, अंथरूणावर खिळलेल्या रूग्णांसाठी. मलाचे विसर्जन वेदनारहीत होण्यासाठी मदत करण्याद्वारे मूळव्याधाने त्रस्त असलेल्यांना त्वरीत आराम देते. अतिसार आणि जुलाब यांच्या उपचारामध्ये एक सहायक म्हणून.

मात्रा:

प्रौढ: 1-3 टीस्पून भरून कणीदार सारक संध्याकाळी एक ग्लास पाण्याबरोबर न चघळता गिळावे, जेवणाच्या आधी किंवा नंतर 2 तासांनी. दुस-या दिवशी सकाळी मल बाहेर पडेल.

लहान मूले: (5 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले) एक टीस्पून भरून पाण्याबरोबर.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

75 ग्रॅ. कणीदार सारकाची एचडीपीई डबी (जार)

200 ग्रॅ. कणीदार सारकाची एचडीपीई डबी (जार)

**स्पोलॅक्स- ई पावडर (चूर्ण)**

जुनाट वातबद्धतेसाठीची परिणामकारक पावडर (चूर्ण)

वर्णन:

तंतुमय पदार्थांचे पूरक, सारक आणि वातहारक. यामधील विनासाखर तंतुमय पदार्थांचे जास्त प्रमाण असणे याला मधुमेहींच्या वापरासाठी सुरक्षित करते.

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 5 ग्रॅ. पावडर (चूर्ण) मध्ये समावेश असेल |
|---|---|
| इसबगोल (*इस्पॅघुल टेस्टा*) | 3.71 ग्रॅ. |
| बडीशेप (*फोएनिक्युलम व्हल्गरे*) | 0.140 ग्रॅ. |
| जिरे (*क्युमिनम सिमिनम*) | 0.028 ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

इसबकोल डींकाच्या बियांच्या कोंड्यापासून प्राप्त केले जाते, हे पाणी शोषते आणि याच्यामध्ये जीवाणू आणि इतर विषारी पदार्थ शोषण्याची एक लक्षणीय शक्ती असते. मऊ आणि अर्धवट घट्ट असलेल्या मलाची निर्मिती करण्याची क्रिया करणे ही पूर्णत: तांत्रिक बाब आहे. बडीशेप आणि जिरे हे एक सुगंधी आहेत आणि वातहारक आहेत. हे वातबद्धतेसाठी दिले जाते.

सुचविले आहे:

आतड्याची अकार्यक्षमता, आहार अपूरा पडणे, आणि व्यायामाचा अभाव यांमुळे होणा-या नेहमीच्या/सवयीच्या बद्धकोष्ठतेसाठी; वयस्कर आणि लहान मूलांमधील बद्धकोष्ठतेसाठी, अंथरूणावर खिळलेल्या रूग्णांसाठी. मलाचे विसर्जन वेदनारहीत होण्यासाठी मदत करण्याद्वारे मूळव्याधाने त्रस्त असलेल्यांना त्वरीत आराम देते. स्पोलॅक्स-ई हे बद्धकोष्ठतेच्या व्यवस्थापनासाठी सुरक्षित आहे आणि गर्भावस्थेमध्ये सुरक्षितपणे वापरले जाऊ शकते. मधुमेही आणि हृदय विकार असलेल्या रूग्णांमध्ये कोलेस्टेरॉलच्या पातळया कमी करण्यासाठी.

मात्रा:

प्रौढ: 1 ते 3 टीस्पून भरून स्पोलॅक्स-ई एका कोरड्या ग्लासमध्ये घाला, त्यात पाणी घाला, हलवा आणि लगेच प्या, आणि नंतर जास्तीचे एक ग्लास पाणी प्या.

पाकीट:

125 ग्रॅ. पावडरची (चूर्णाची) एचडीपीई डबी (जार)

**टॅक्सिन**

विषारी द्रव्य काढून टाकणारे सारक

वर्णन:

त्यांच्या विषारी द्रव्ये बाहेर टाकण्याच्या आणि सारक क्रियेसाठी माहित असलेल्या चांगल्या-प्रसिद्ध आयुर्वेदिक वनौषधांचे मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण असलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो : |
|---|---|
| साना (भुई तरवड) *(कॅस्सिया ऍन्गसटिफोलिया)* | 200 मि.ग्रॅ. |

| | |
|---|---|
| रेवंदचिनी (*रेहेम एम्बोडी)* | 100 मि.ग्रॅ. |
| हिरडा (*टर्मिनालिया चेबुला*) | 150 मि.ग्रॅ. |
| बेहरा (*टर्मिनालिया बेलेरीका*) | 150 मि.ग्रॅ. |
| आवळा (*एम्ब्लिका ऑफिसिनालिस*) | 150 मि.ग्रॅ. |
| सुंठ (*झिंगिबर ऑफिसिनेल*) | 30 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

साना (भुई तरवड) ची सक्रिय तत्वे अशी आहेत, जठर-आतड्याच्या मार्गातून शोषले जाते आणि मोठ्या प्रमाणात आतड्यामध्ये टाकले जाते, जेथे ते आतड्याच्या सामान्य कार्यासारखी पेरीस्टॅटिक हालचाल (स्नायूंचे आकुंचन होऊन अन्नाची हालचाल होऊन ते पोटात ढकलणे) उत्तेजीत करतात. रेवंदचिनी हे एक सारक आहे आणि तसेच एक संकोचक आणि  एक कडवट आहे. त्रिफळा तयार करण्यासाठी आयुर्वेदिक फळे आवळा, हिरडा, बेहरा एकत्र केली जातात. पदार्थ निरोगीपणे बाहेर टाकण्यास मदत करण्याचे पहिले पाऊल म्हणजे आतड्याच्या स्नायूंना ताणणे आणि आतड्याच्या विळीला आणि जठर-आतड्याच्या मार्गाच्या आतील पदराला वंगण देणे हे आहे. त्रिफळा (ज्याचे स्पेलिंग त्रिफला असे सुद्धा केले जाते) हे एक अभिजात आयुर्वेदिक सूत्रीकरण आहे ज्यामध्ये तीन फळे असतात जे अधून मधून होणा-या बद्धकोष्ठतेवर सुरक्षितपणे आणि परिणामकारकतेने उपचार करते. बेहरा जठर-आतड्याच्या भिंतीमधील श्लेष्मल त्वचा आणि विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास शक्ती देते. सुंठ ही सारक परिणाम देण्यासाठीची एक  सुधारात्मक सहायक आहे आणि मळमळणे आणि पेटके येणे प्रतिबंधित करण्यासाठी याची नेमणूक केली जाते.

सुचविले आहे:तीव्र बद्धकोष्ठता

मात्रा: 2 गोळया दोन ग्लास कोमट पाण्याबरोबर रात्रीच्या जेवणानंतर घेणे.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 1 स्ट्रीप्सचा बॉक्स

60 गोळयांची एचडीपीई बाटली

**तुरैको**

लघवीचे प्रमाण वाढविंण्यासाठीच्या आणि मूत्रमार्गासाठीच्या ऍण्टीसेप्टिक गोळया.

वर्णन:
लघवीचे प्रमाण वाढविणारे आणि मूत्रमार्गाचे ऍण्टिसेप्टिक्स म्हणून वापर करण्यात येणारे चांगल्या-प्रसिद्ध आयुर्वेदिक औषधांचे मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| पुनर्नवा (*बोएह्हविया डिफुसा*) | 120 मि.ग्रॅ. |
| कबाबचिनी/कंकोल (*क्युबेब ऑफिसिनालिस*) | 30 मि.ग्रॅ. |
| गोखरू (*ट्रिबुलस टेरेस्ट्रिस*) | 120 मि.ग्रॅ. |
| नागरकेशर (*मेसुआ फेरीया*) | 30 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:
कबाबचिनी हे एक चांगले-माहित असलेले मूत्रसंस्थेचे ऍण्टीसेप्टिक आहे आणि गोनो-हीयल युरेथ्रायटिस (लैंगिक रितीने संक्रमित जीवाणूमुळे मूत्रमार्गाचा दाह होणे) आणि मूत्राशयाची आग होणे मध्ये वापरले जाते. आयुर्वेदामध्ये याचा वापर मूत्रपिंडातून आणि मूत्राशयातून खडा काढून टाकण्यासाठी केला जातो. पुनर्नवा हे आयुर्वेदामधील लघवीचे प्रमाण वाढविण्यासाठी चांगले माहित आहे आणि रक्त प्रवाह कमी झाल्यामुळे हृदय आघात झाल्यामुळे झालेल्या सर्व प्रकारच्या सूजेमध्ये याचा वापर केला जातो. गोखरूचा वापर वेदनादायक मूत्र विसर्जन आणि मूत्र मार्गाचा दाह होणे यासाठी केला जातो. याचा वापर एक संकोचक आणि भूक वाढवणारे म्हणून केला जातो.

सुचविले आहे:
एक लघवीचे प्रमाण वाढविणारे, मूत्रसंस्थेचे ऍण्टीसेप्टिक म्हणून आणि खडा झाल्यामुळे किंवा संक्रमणामुळे वेदनादायक आणि त्रासदायक मूत्र विसर्जनासाठीचे एक मूत्र संस्थेला गुंगी देणारे/वेदनाशामक.

मात्रा:
1 ते 2 गोळया एखाद्या प्रौढासाठी, दिवसातून तीन वेळा.
पाणी भरपूर प्रमाणात पित राहिले पाहिजे.

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 10 स्ट्रीप्सचा बॉक्स
300 गोळयांची बाटली

**व्हिटेस्सन**

ट्रॅनक्विलिझर (चिंता, भिती, ताण कमी करणा-या) गोळया

वर्णन:

चेतासंस्थेला सशक्त करण्यासाठीचे आयुर्वेदिक औषधाचे मिश्रण/संयोजन. याची सवय लागत नाही. उदासिनतेच्या प्रभावाशिवाय असलेले ट्रॅनक्विलिझर (चिंता, भिती, ताण कमी करणारे).

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| छोटाचंद/सर्पगंधा (*रॉवोल्फिया सेरपेन्टिया*) | 20.0 मि.ग्रॅ. |
| अश्वगंध (*विथानिया सॉम्निफेरा*) | 80.0 मि.ग्रॅ. |
| बाळतगर (*व्हॅलेरीयान वालिची*) | 80.0 मि.ग्रॅ. |
| खुरसनी ओवा (*हाओस्किएॅमस नायजर)* | 20.0 मि.ग्रॅ. |
| खुरसनी ओव्याचा अर्क (*हाओस्किएॅमस नायजर*) | 0.5 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

अश्वगंधाचा वापर मध्यवर्ती चेता संस्थेचा (सी.एन.एस.) बधिरपणा निर्माण करणारे म्हणून, एक ताण रोधक आणि एक लैंगिक भावना वाढविणारे म्हणून केला जातो. हे एक सौम्य लघवीचे प्रमाण वाढविणारे सुद्धा आहे. छोटाचंदचा वापर उच्च रक्तदाब, मानसिक विकार आणि चेतासंस्थेचा ताण यांवर सुद्धा केला जातो. बाळतगरचा वापर अनिद्रा आणि चिडचिडेपणा, उन्माद आणि अपस्मार यांमध्ये सुद्धा केला जातो. खुरसनी ओवा हे एक वातहारक, पेटके-रोधक, गुंगी आणणारे आणि संमोहक आहे.

सुचविले आहे:

मानसिक विकार मूळ असणा-या विकारांसाठी. चेतासंस्थेच्या ताणासाठी, चिंता, झोप न येणे, उच्च रक्त दाब, स्नायू आणि सांधे दुखणे, डोकेदुखी आणि चेतासंस्था मूळ असणा-या वेदना यांसाठी. दिवसाच्या वेळी देण्यासाठी योग्य आहे.

मात्रा :

प्रौढ: 1 ते 2 गोळ्या, दिवसातून तीन वेळा. प्रतिसादानुसार मात्रेचे समायोजन केले जाते. इतर स्वरूपातील उपचारासाठी एक पूरक म्हणून वापर केला जाऊ शकतो.

लहान मूले: 1/4 ते 1/ 2 गोळी वयानुसार.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

प्रत्येकी 10 गोळ्यांची एक स्ट्रीप अशा 10 स्ट्रीप्सचा बॉक्स

300 गोळ्यांची बाटली

# ऍलोपॅथिक

**अल्बोकॅल**

मॅग्नेशियम, झिंक आणि जीवनसत्व डी3 ने समृद्ध कॅल्शियम पूरक.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण असलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| कॅल्शियम कार्बोनेट आय.पी. | 1250 मि.ग्रॅ. |
| मॅग्नेशियम हायड्रॉक्साईड आय.पी. | 240 मि.ग्रॅ. |
| झिंक सल्फेट मोनोहायड्रेट यू.एस.पी. | 20.59 मि.ग्रॅ. |
| जीवनसत्व डी3 (स्थिर केल्यानुसार) | 250 आय.यू. |

चेतासंस्थेच्या आणि स्नायू संस्थेच्या कार्यात्मक अखंडतेसाठी कॅल्शियमची आवश्यकता आहे, जेथे या ऊतींच्या एकाग्रतेवर आणि उत्तेजनेवर मोठा प्रभाव पडतो. सामान्य हृदय कार्यासाठी हे आवश्यक आहे आणि हे रक्ताच्या गुठळी होण्याच्या यंत्रणेमध्ये कार्य करण्यामध्ये समावेश असलेल्या घटकांपैकी एक आहे.

सुचविले आहे:

गरोदरपणामध्ये, स्तनपान करणा-यांसाठी, रजोनिवृत्तिमध्ये, वाढणा-या मूलांमध्ये.

मात्रा:

1 गोळी दिवसातून दोन वेळा

पाकीट:

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 3 स्ट्रीप्सचा बॉक्स

**डेसिल+**

वेदनाशामक आणि ताप कमी करणा-या गोळया

वर्णन:

दोन चांगली माहित असणारी वेदनाशामके आणि ताप कमी करणारी औषधे यांचे मिश्रण/संयोजन

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| ऍसेक्लोफेनॅक आय.पी. | 100 मि.ग्रॅ. |
| पॅरासिटॅमॉल आय.पी. | 325 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

ऍसेक्लोफेनॅक ताप येणे, वेदना होणे आणि संधिवात यांवर लिहून दिले जाते. हे एक स्टिरॉईड नसलेले दाह-रोधक औषध (एनएसएआयडी) आहे जे, ज्यामुळे वेदना होऊ शकते आणि सूज येऊ शकते अशा शरीरामधील एका पदार्थाच्या (सायक्लो-ऑक्सिजिनेस) क्रियेला अवरोध करते. पॅरासिटॅमॉलचा वापर सौम्य ते मध्यम वेदनेपासून आराम मिळण्यासाठी आणि ताप कमी करण्यासाठी केला जातो. हे सामान्यपणे स्वीकारले जाते की

वेदनाशामकांचे मिश्रण एकमेव औषधाच्या उच्च मात्रांपेक्षा अधिक चांगले परिणाम देते, कदाचित तितक्याच वेदना कमी होण्याकरिताचे अनपेक्षित दुष्परिणाम कमी होतात म्हणून.

सुचविले आहे:

डोकेदुखी ज्यामध्ये समावेश असतो मायग्रेनस डोकेदुखी, दातदुखी, वेदनादायक मासिक पाळी, स्नायू-अस्थिंची वेदना, हृमॅटिक (संधिवाताशी संबंधित) वेदना, आणि चेतासंस्थेच्या वेदना. तापाच्या सर्व स्थितींमध्ये जेथे तप कमी होणे अपेक्षित असते, इन्फ्लुएंझा, आणि सामान्य सर्दी इ. मध्ये.

मात्रा:

प्रौढ: 1 गोळी दिवसातून दोन वेळा

विशेष खबरदा-या: 12 वर्षे वयापेक्षा कमी वय असलेल्या लहान मूलांमध्ये वैद्यकीय सल्ल्याशिवाय घेऊ नये. रिकाम्या पोटी घेऊ नये. जास्त प्रमाणात मात्रा घेण्यामुळे यकृताला इजा होऊ शकते.

पाकीट:

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 10 स्ट्रीप्सचा बॉक्स

400 गोळयांची एचडीपीई डबी (जार)

**फेरस फ्युमारेट गोळया आयपी**

लोहाच्या अभावामुळे आलेल्या अशक्तपणासाठीचे सुरक्षित, परिणामकारक आणि अत्यंत सुविधाजन हिमॅटिनिक (रक्त पेशींचे पोषकद्रव्य).

औषधाचे घटकद्रव्य:

फेरस फ्युमारेट आय.पी. 0.2 ग्रॅ.

वर्णन :

फेरस फ्युमारेट हे अत्यंत स्थिर, कमीतकमी विषारी असलेले आणि सहजपणे शोषले जाणा-या लोहाचे मीठ असलेल्यांपैकी एक आहे. हे गोळयांच्या स्वरूपात उपलब्ध आहे प्रत्येक गोळीमध्ये अंदाजे 65 मि.ग्रॅ. इतके मूलभूत लोह असणारे 200 मि.ग्रॅ. फेरस फ्युमारेट आय.पी. आहे.

सुचविले आहे:

मूळव्याध, हूकवर्म (गोलकृमी) चा प्रादुर्भाव, रक्तक्षय, खोकल्यामधून रक्त पडणे यासारख्या रोगामध्ये जुनाट रक्तस्त्रावामुळे रक्ताची हानी जास्त प्रमाणात झाल्यामुळे निर्माण झालेल्या लोहाच्या अभावामुळे किंवा आहारामध्ये लोहाचे सेवन कमी केल्यामुळे झालेल्या अशक्तपणाच्या नेहमीच्या उपचारासाठी, वाढणा-या लहान मूलांसाठी आणि वेळेआधी जन्मलेल्या बाळांचे वजन वाढविण्यासाठी, वृद्धापकाळामध्ये हिमोग्लोबीनची पातळी राखण्यासाठी आणि आजारपणा नंतर येणा-या अशक्तपणासाठी.

मात्रा:
प्रौढ: 1 ते 3 गोळया दररोज आहार घेतल्यानंतर किंवा फिजिशियनची निर्देशित केल्यानुसार.
लहान मूले: 1/2 ते 1 गोळी आहार घेतल्यानंतर.

विरूद्ध लक्षणे:
पेप्टिक अल्सर (पोटाच्या आतल्या पदराला आणि लहान आतड्याच्या वरच्या भागाला व्रण पडणे),
मालएॅबसॉर्पशन (लहान आतडे काही पोषक द्रव्ये आणि द्रव्ये शोषू शकत नाही) संलक्षण आणि असहनशीलता असलेल्यांमध्ये.

पाकीट:
500 गोळयांची एचडीपीई डबी (जार)

## HEALING DUST
**जखम बरी करण्यासाठी घालण्याचे चूर्ण (ऍ़ण्टीसेप्टिक)**

वर्णन:
जखमा आणि व्रण यांवर घालण्यासाठीची एक एॅण्टीसेप्टिक पावडर (चूर्ण)

औषधाचे घटकद्रव्य:

| | प्रत्येक 100ग्रॅ. पावडर मध्ये समावेश असतो |
|---|---|
| लोडोफॉर्म एन.एफ. | 2.29 ग्रॅ. |
| अलुम आय.पी. (तुरटी) | 2.29 ग्रॅ. |
| बोरीक एॅसिड आय.पी. | 6.86 ग्रॅ. |
| टर्मरीक आय.पी. (हळद 1966 | 6.80 ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

लोडोफॉर्म आणि बोरीक ऍसिड हे चांगले माहित असलेले ऍण्टीसेप्टिक्स आहेत. तुरटीमध्ये चोंदलेले नाक मोकळे करण्याची कार्यक्षमता असते. हळद सुद्धा ऍण्टीसेप्टिक आहे आणि काही त्या जागेच्या वेदना घालविणारी क्रिया करते. त्या जागेवर लावली असता, लोडोफॉर्म हळूहळू नष्ट होते आणि  आयोडिनचे सतत मुक्त होणे सूक्ष्म-जीवाणूंची वाढ रोखते. पावडर स्राव कमी करते आणि जखमेच्या पृष्ठभागास स्वच्छ ठेवते.

लावणे:

- जखमांवर आणि व्रणांवर मुक्तपणे लावली जाऊ शकते, आणि जर आवश्यकता असेल, तर गॉज (पातळ कापडाचा तुकडा) आणि मलमपट्टीने झाकून ठेवले जाऊ शकते.
- कानामधून पू येण्याच्या जुनाट स्थितीसाठी, हे सैल करून लावता येते आणि कानामध्ये कापूस घालून ठेवला जातो. एक किंवा दोन दिवसांनी कान स्वच्छ केला जाऊ शकतो. ही प्रक्रिया दोन वेळा पुन्हा केली जाऊ शकते. तिस-यांदा घालण्याची आवश्यकता क्वचितपणे पडते.

**खबरदारी– डोळयांच्या जवळ अलावू नये. डोळयांपासून दूर ठेवा.**

साठवण: एका थंड आणि कोरड्या ठिकाणी साठवण करा.

पाकीट:

50 ग्रॅ. पावडरची बाटली.

110 ग्रॅ. पावडरची बाटली.

**मॅग्नाईन**

ऍण्टॅसिड (पित्तनाशक) आणि पेटके/कळ येणे-रोधक गोळया

वर्णन:

पित्ताशयाशी संबंधित अल्सर्स आणि हायपर ऍसिडिटी (अति पित्त होणे) यांच्या उपचारासाठी बेलाडोना सहित चांगल्या माहित असलेल्या पित्तनाशकांचे मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य: आवरण नसलेल्या प्रत्येक चघळण्याच्या गोळीमध्ये समावेश असतो

| | |
|---|---|
| मॅग्नेशियम ट्रिसिलिकेट आय.पी. | 250 मि.ग्रॅ. |
| कोरडी तुरटी. हायड्रॉक्स. जेल आय.पी. | 125 मि.ग्रॅ. |
| बेलाडोना कोरड्या आय.पी. चे अर्क | 5 मि.ग्रॅ. |

औषधनिर्माणशास्त्र:

ऍण्टॅसिडस हे अत्यंत व्यापकपणे वापरल्या जाणा-या औषधांपैकी एक आहे. पित्ताशयाशी संबंधित अल्सर्स असलेल्या रूग्णांमध्ये पोटामध्ये ऍसिड (पित्त) असणे हे वेदना होण्याचा एक भाग असते, जो या रोगाचा वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म आहे. हे या अल्सर्सचे बरे होण्यामध्ये सुद्धा हस्तक्षेप करते. जर ऍण्टॅसिडस उपयुक्त ठरणार असतील तर त्यांच्यामुळे जठरातील ऍसिडिटी कमी झाली पाहिजे आणि ही क्रिया शक्य असेल तितक्या दीर्घकाळापर्यंत पसरली पाहिजे. मॅग्नेशियम ट्रिसिलिकेट आणि ऍल्युमिनियम हायड्रॉक्साईड या दोन्हीमध्ये दीर्घकाळ ऍसिड तटस्थ ठेवण्याचा परिणाम असतो आणि ही दोन अत्यंत समाधानकारक ऍण्टॅसिडस आहेत. हे दोन मीठ (सॉल्टस) शोषले जात नाहीत आणि कोणतेही शारीरिक परिणाम देत नाहीत. बेलाडोनाचा अर्क व्हॅगस नसेच्या (एक प्रकारची लांब रक्तवाहिनी) क्रियेला अवरोध करतो, ऍसिडचे/पित्ताचे स्त्रवणे कमी करतो आणि पेटके येणे/कळ येणे यापासून आराम देऊन वेदना कमी करतो.

सुचविले आहे:

पित्ताशयाशी संबंधित अल्सर्स, हायपरऍसिडिटी (खूप जास्त प्रमाणात पित्त होणे) आणि अपचन.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

मात्रा:

प्रौढ: 2 गोळया चघळण्याच्या आणि आहाराचे सेवन करण्याच्या 15 ते 30 मिनिटे आधी आणि नंतर गिळायच्या. जर दोन जेवणांच्या मधे वेदना होत असेल, तर 1 किंवा 2 गोळया चोखा.

लहान मूले: 1 गोळी.

पाकीट:

प्रत्येकी 10 गोळयांची एक स्ट्रीप अशा 50 स्ट्रीप्सचा बॉक्स

500 गोळयांची एचडीपीई डबी (जार)

**स्किनमेंट**

बुरशी-रोधक/जीवाणू-रोधक त्वचेचे मलम.

वर्णन:

बुरशी-रोधक, जीवाणू-रोधक आणि परजीवींमुळे होणा-या त्वचा रोगांसाठी, त्या जागी लावण्यासाठीचे चांगल्या माहित असलेल्या औषधांचे एक प्रबल मिश्रण/संयोजन.

| औषधाचे घटकद्रव्य: | प्रत्येक 100ग्रॅ. मध्ये समावेश असतो |
|---|---|
| बेन्झॉईक ऍसिड आय.पी. | 2 ग्रॅ. |
| सॅलिसिलिक ऍसिड आय.पी. | 4 ग्रॅ. |
| इचथॅमॉल ऍसिड आय.पी. 1966 | 8 ग्रॅ. |
| डिथ्रॅनॉल आय.पी. | 0.22 ग्रॅ. |
| सबलाईम्ड सल्फर आय.पी. 1966 | 2.29 ग्रॅ. |
| पॅराफिनचा बेस/मूलभूता | क्यू.एस./पुरेसे प्रमाण |

औषधनिर्माणशास्त्र:

बेन्झॉईक ऍसिड, सॅलिसिलिक ऍसिड आणि डिथ्रॅनॉल हे त्वचेच्या बुरशीजन्य संक्रमणांमध्ये अत्यंत प्रभावी आहेत, आणि सोरायसिस सारख्या जुनाट त्वचारोगामध्ये यांचा वापर केला जातो. इचथॅमॉल मध्ये जंतूची वाढ थांबविण्याचे गुणधर्म असतात आणि याचा वापर जुनाट त्वचेच्या रोगांमध्ये मलम म्हणून केला जातो. सल्फर हे एक सौम्य ऍण्टीसेप्टिक आहे आणि परजीवी (कीटक) नाशक आहे आणि हे खरूज, गजकर्ण/रींगवर्म आणि मुरूम यांसाठी व्यापकपणे लोशन (पातळ औषध) किंवा मलम या स्वरूपात तयार केले जाते.

सुचविले आहे:

स्किनमेंटचा वापर मुख्यत: गजकर्ण/रींगवर्म, खरूज, इसब, आणि सोरायसिस यांसाठी केला जातो.

लावणे:

प्रभावित भागावर रात्रीच्या वेळी हळूवारपणे लावा आणि सकाळी धुवून टाका. नाजूक त्वचेसाठी, हे ज्वलनशील खाद्य तेलाबरोब समान भागामध्ये मिसळले जाऊ शकते. तळपायाचा आणि हाताचा हायपर-केरॅटोटिक (त्वचेचा वरचा भाग जाड होणे) झालेल्यांमध्ये दोन वेळा लावणे आवश्यक असू शकेल आणि हे हलक्या मलमपट्टीने झाकावे.

**डोळयांच्या जवळ लावू नये.**

पाकिट: 15ग्रॅ. ची ट्यूब.

## होमिओपॅथिक

**अगर-को**

गुंगी आणणा-या आणि फेफेरे-रोधक गोळया.

वर्णन:

ऍगरीकस (मशरूमची पोटजात), मात्रा दिल्याच्या काही मिनिटांमध्येच, एक गुंगी आणणारे आणि पेटके/कळ येणे-रोधक म्हणून कार्य करते आणि फेफरे येण्याचे विकार आणि उन्मादामध्ये याचे मूल्य खूप मोठे आहे. लिलिऍम ओटीपोटातील अवयवांवर एक प्रबळ प्रभाव टाकते. अगरको हे उन्मादामध्ये उपयोगी आहे कारण काही गर्भाशयाच्या आणि अंडाशयाच्या रोगनिदान स्थितींची प्रतिक्रिया म्हणून उन्मादाची लक्षणे दिसू शकतात. एथुसा हे एक गुंगी आणणारे आहे, बेचैनी, चिडचिडेपणा आणि व्हर्टिगो (अचानक चक्कर येणे) प्रतिबंधित करते.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| टीआर. ऍगरिकस क्यू | 0.0064 मिलि |
| टीआर.एथुसा क्यू | 0.0064 मिलि |
| टीआर.लिलिऍम क्यू | 0.0132 मिलि |

सुचविले आहे:

नवजात बालके आणि लहान मूलांमधील फेफरे येणे. महिलांमधील उन्माद. लहान मूले आणि पुरूषांमधील उन्मादाचे प्रकटीकरण. अपस्मारामध्ये, दिवसाच्या वेळी व्हिटेस्सन देण्यास सुरूवात करा, त्याच्याबरोबर अगरको रात्री झोपायच्या वेळी देणे. पुरेशा आणि जास्तीतजास्त परिणामासाठी उपचार दीर्घकालीन अवधीसाठी चालू ठेवला पाहिजे. वारंवार ऍटॅक्स/आघात येण्याची प्रवृत्ती असलेल्या रूग्णांमध्ये, उपचाराची सुरूवात व्हिटेस्सनच्या संयोजनाबरोबर केली पाहिजे.

मात्रा:

नवजात बालके आणि लहान मूले:

1/4 गोळीची पूड करून दूधाबरोबर किंवा मधाबरोबर दिली जाऊ शकते.

मोठी मूले आणि प्रौढ:
अर्धी गोळी, दररोज 3 वेळा.
आहार सेवनाच्या अर्धा तास आधी, रिकाम्या पोटी दिले पाहिजे.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

50 गोळयांची बाटली

**ऍमिग्लिया**

पेटके येणे/कळ येणे रोधक गोळया

वर्णन:
विशेषकरून हृदय धमनीचा ताण आणि एंजायना पिक्टोरीस (हृदयामध्ये तीव्र वेदना होणे) पासून आराम मिळण्यासाठी उपयोगी असलेल्या औषधांचे एक मिश्रण/संयोजन.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| टीआर.लिलिएॅम क्यू. | 0.0004 मिलि |
| ग्लोनिइयम | 3x 1.6 मि.ग्रॅ. |
| नॅट्रम नायट्रोझम | 3x 205 मि.ग्रॅ. |

सुचविले आहे:
एंजायना पिक्टोरीस (हृदयामध्ये तीव्र वेदना होणे) पासून आराम मिळण्यासाठी, कारण हे हृदय धमनीचा विस्तार होण्याचे काम करते. जेव्हा त्वरीत आराम मिळणे अपेक्षित असते (कारण हे रक्तवाहिन्यांचा विस्तार करते आणि रक्त दाब कमी करते) तेव्हा डोकेदुखी आणि उच्च रक्त दाब यांपासून आराम मिळण्यासाठी. जेव्हा व्हिटेस्सन घेतल्याने डोकेदुखी पासून आराम मिळत नाही तेव्हा ऍमिग्लिया द्या. वेदनादायक मासिक पाळी, दमा, डांग्या खोकला, नवजात बालकांमध्ये फेफरे येणे, आणि मायग्रेन इ. सारख्या पेटके येण्याच्या/कळ

येण्याच्या स्थितीमध्ये. पूड केलेली एक गोळी वारंवार जिभेखाली ठेवल्यास, अपस्माराचा एक हल्ला होणे बंद करते.

मात्रा:

अर्धी गोळी, दिवसातून तीन वेळा, आहार घेण्याच्या अर्धा तास आधी रिकाम्या पोटी घेणे.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:

50 गोळयांची बाटली.

**औरॅंटिनम**

स्त्रियांच्या विकारासाठीच्या दाह-रोधक गोळया

वर्णन:

औषधे विशेषत: गोळीच्या स्वरूपातील मिश्रण, त्यांच्या गर्भाशयावरील आणि अडाशयांवरील परिणामांसाठी.

औषधाचे घटकद्रव्य:

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| औरम मुरीऍटिकम | 3x 24 मि.ग्रॅ. |
| टीआर. पल्सॅटिला क्यू | 0.008 मिलि |
| टीआर.थुजा क्यू | 0.0024 मिलि |

औषधनिर्माणशास्त्र:

औरम मुरीऍटिकम हे स्त्रियांमधील ओटीपोटामधील अवयवांच्या विकारावर प्रभावी आहे. उच्च रक्त दाबावर सुद्धा याचा लक्षणीय परिणाम होतो. टीआर. पल्सॅटिला हे विशेषत: भावनाप्रधान रूग्णांमध्ये उपयोगी आहे. हे चेतासंस्थेच्या वेदनांपासून आणि दुखण्यापासून आराम देते आणि याचा वापर मासिक पाळी न येणे यासाठी आणि मासिक पाळीतील अनियमितता दुरूस्त करण्यासाठी केला जातो. टीआर.थुजा हे विशेषत: अंगावरून पांढरे जाणे, रक्तस्त्राव कमी होणे आणि मासिक पाळी कमी वेळा येणे, आणि अंडाशयाचा दाह किंवा फॅलोपियन

नळयांचा (अंडाशयातून गर्भाशयात बीज वाहून नेणा-या) दाह होण्यामुळे इनगुईनल (ओटीपोट आणि मांड्यांच्या मधला भाग) मध्ये वेदना होण्यावर उपयोगी आहे.

सुचविले आहे:
गर्भाशय आणि अंडाशयाच्या दाहक स्थिती, ज्याचा संबंध मासिक पाळीच्या वेदनांशी आणि विकारांशी असतो. योनी मुखाला व्रण पडणे, अंगावरून पांढरे जाणे, रक्तस्त्राव कमी होणे आणि अनियमित मासिक पाळी. विशेषत: भावनाप्रधान स्त्रियांसाठी उपयोगी आहे ज्यांच्यामध्ये चेतासंस्थेच्या वेदना, जास्त प्रमाणात घाम येणे, वेदनादायक मासिक पाळी, शरीर थंड पडल्याचे जाणवणे इ. सारखी विविध लक्षणे दिसून येतात.

मात्रा:
1 ते 2 गोळया दिवसातून तीन वेळा, शक्यतो आहाराचे सेवन करण्याच्या अर्धा तास आधी रिकाम्या पोटी.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट:
50 गोळयांची बाटली.

**झहेर- को**
विंचू चावणे आणि रजोनिवृत्तीमध्ये होणारे बदल यांसाठीच्या होमिओपॅथिक गोळया.

वर्णन:
होमिओपॅथिक औषधांचे एक मिश्रण/संयोजन जे वातावरणाशी/हवामानाशी संबंधित रोगांसाठी सुचविले आहे, उन्हामध्ये जाण्यामुळे होणा-या डोकेदुखीच्या उपचारासाठी आणि विंचू चावल्यावर होणारी वेदना कमी करण्यासाठी.

औषधाचे घटकद्रव्य

| | आवरण नसलेल्या प्रत्येक गोळीमध्ये समावेश असतो |
|---|---|
| लॅचेसिस | 6 x 0.78 मि.ग्रॅ. |
| ट्यूबरकुलिनियम | 6 x 0.0034 मि.ग्रॅ. |

मात्रा:
प्रौढ: 1 गोळी. आवश्यकता असल्यास 4 तासांनी पुन्हा देणे.
लहान मूले: 1/4 ते 1/2 गोळी.

दुष्परिणाम:काहीही नाहीत

पाकीट: 30 गोळ्यांची बाटली.

# भाग – III

# रोगांसाठीचे उपचार

**प्रस्तावना:**

हा भाग विविध रोगांच्या उपचाराशी संबंधित आहे. औषधांचा वापर प्रतिबंधात्मकरित्या किंवा उपचारात्मकरित्या केला जाऊ शकतो. जर रोगाचे निदान योग्य केले गेले तर उपचार करणे सोपे होते.
या प्रास्ताविक टीपांमध्ये आम्ही गोष्टी सोप्या करण्याच्या आमच्या इच्छेबद्दल आपल्यावर छाप पाडू इच्छितो. रोगाने त्रस्त असलेल्या मानवांना मदत करणे हा आमचा मुख्य हेतू/उद्देश आहे. एखाद्या विशिष्ट रोगासाठी

आपण जी काही औषधे निवडता, त्यासाठी आपण नेहमी पोषणात्मक दृष्टिकोन तसेच पचनाचा दृष्टिकोन याचा विचार केला पाहिजे.

**पोषक**

आल्बो सांग हे फॉस्फेटेस, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम ने समृद्ध केलेले उत्पादन आहे. याचा वापर एका संतुलित आहारामध्ये पूरक म्हणून केला पाहिजे. आहाराचे नियंत्रण व्यक्तीच्या आवश्यकतेनुसार आणि पचन क्षमतेनुसार केले पाहिजे.

अल्बोव्हिट हे एक दुसरे उत्पादन आहे जे नैसर्गिक प्रथिने आणि खनिजे यांनी समृद्ध आहे, आणि वय किंवा लिंग याने कोणताही फरक न पडता सर्वजण याचा वापर करू शकतात. शतावरी आणि केशर यांसह नैसर्गिक महत्वाच्या पोषक द्रव्यांचे एक मिश्रण/संयोजन असल्यामुळे, विशेषत: गर्भवती महिलांसाठी आणि स्तनपान करणा-या आईंसाठी याची शिफारस करण्यात आली आहे.

**आहार आणि व्यायाम**

जास्त प्रमाणात खाणे आणि सुस्तावलेल्या सवयी असणे या आधुनिक जीवनाच्या दोन वाईट गोष्टी आहेत. एखाद्या रूग्णासाठी आहार विषयक सवयी नियंत्रित करणे तसेच नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे कारण ते सामान्य आरोग्य टिकून राहण्यासाठी खूप प्रयत्न करतात.

हृदय रोग असलेल्या काही रूग्णांमध्ये अति प्रमाणात व्यायाम करण्याचा सल्ला देण्यात आलेला नाही. लठ्ठपणामध्ये, उच्च रक्त दाबामध्ये आणि मधुमेहामध्ये नियंत्रित आहाराची आवश्यकता असते.

**लठ्ठपणा**

रूग्णांना कमी मीठ आणि कमी चरबी असलेल्या आहाराचा फायदा होतो. लिंबूवर्गीय फळांचा रस खूप उपयोगी आहे. तूप, लोणी सारख्या संतृप्त चरबी हानिकारक असतात कारण त्यामुळे त्यांना एॅथेरोस्क्लेरोसिस (हृदय धमन्यांमध्ये कोलेस्टेरॉल, चरबी जमा होणे) आणि हृदय धमनीचे थ्रॉम्बोसिस/रक्ताची गुठळी होणे (हृदयविकाराचा झटका) होते.

**उच्च रक्त दाब**

रूग्णांना कमी मीठ आणि कमी चरबी असलेल्या आहाराचा फायदा होतो. लिंबूवर्गीय फळांचा रस खूप उपयोगी आहे. जेवणांनंतर अर्ध्या तासाने पाणी पिणे यामुळे काही प्रमाणात रक्त दाबाचे नियंत्रण केले जाते. रक्ताचा पुरवठा अपुरा झाल्यामुळे हृदय आघात होणे, मूत्रपिंडाला सूज येणे/दाह होणे, जलोदर किंवा कोणतीही सूज असलेल्या रूग्णांना मीठ नसलेल्या आहारामुळे फायदे होतात.

**मधुमेह**

या रूग्णांना रक्तातील साखरेच्या आवश्यक पातळया राखण्यासाठी आणि एक चांगल्या व्यायाम पद्धतीसह सूचित वजन राहावे यासाठी दररोज पुरेशा प्रमाणात कर्बोदके, चरबी आणि प्रथिने यांची आवश्यकता असते.

**पेप्टिक अल्सर** (पोटाच्या आतल्या पदराला आणि लहान आतड्याच्या वरच्या भागाला व्रण पडणे),

दूध, साय किंवा हायड्रोप्रोटिनयुक्त सपक आहारामुळे अल्सर बरा होण्यास मदत होते आणि काही प्रमाणात वेदना नियंत्रित होतात. चहा आणि कॉफी दिवसातून एक वेळा घेणे हानिकारक नाही, पण हे दूधाबरोबर घेतले पाहिजे. पेप्टिक अल्सर असलेल्या रूग्णांनी कधीही मद्यपान करू नये, धूम्रपान करणे टाळावे आणि मिरची आणि मसाल्यांसारख्या जळजळ होणा-या आहाराचे सेवन करू नये.

**मद्य**

योग्य आहार न घेता नियमित मद्यपान करण्यामुळे यकृताची हानी होऊ शकते किंवा जठरआतड्यामध्ये बिघाड होऊ शकतो. सतत वापर करण्यामुळे व्यसन लागते आणि सहनशीलता निर्माण होते. मद्यामुळे यकृत, मूत्रपिंड, हृदय यांमधील चरबी नष्ट होते आणि इतर गुंतागुंती निर्माण होतात.

**धूम्रपान**

धूम्रपान करणारे श्वसन संस्थेच्या विकाराने त्रस्त्र होतात, जसे की ब्रॉन्कायटिस, श्वास नलिकांशी संबंधित दमा, श्वास नलिकांचा कार्सिनोमा (कर्करोग) इ., हृदय धमनीच्या गुंतागुंती जसे की हृदय धमनीमध्ये रक्ताची गुठळी होणे, थ्रॉम्बोएॅन्जायटिस ऑब्लिटेरान्स (पायांच्या बोटांचे गॅंगरीन), पेप्टिक अल्सर, दृष्टी कमी होण्याशी संबंधित डोळयातील बदल इ.

## सुपारी बरोबर तंबाखुची पाने चघळणे

यामुळे जीभेला, हिरड्यांना जखमा/व्रण होतात, दंतक्षय आणि तोंडाचा कर्करोग होतो.

## चहा आणि कॉफी

याचा कॅफीन घटक डोकेदुखीसाठी उपयोगी आहे कारण हे मध्यवर्ती चेतासंस्थेला आणि तात्पुरत्या सतर्कतेला उत्तेजित करते, जी दोन तासांपर्यंत राहते. चहा आणि कॉफी यांचे सेवन सुद्धा मध्यम स्वरूपात करण्याची शिफारस करण्यात आली आहे. जास्त प्रमाणात चहा घेतल्यास पचनाच्या क्रियेमध्ये बिघाड होतो. अति क्रियाशीलता टाळण्यासाठी 12 वर्षांपेक्षा कमी वयाच्या लहान मूलांना चहा देऊ नये.

## आहार आणि पचन संस्था

## पोट आणि आतडे

पचन हे सामान्य भूकेपेक्षा वेगळे आहे. संपूर्ण पचन म्हणजे कर्बोदके, चरबी, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिज यांचे एकरूप होणे/मिसळणे किंवा अधिक चांगला उपयोग होणे.

पचनास एका सामान्य भूकेची मदत होते. जठर आणि आतड्याच्या समस्या, भूक न लागणे आणि पचनातील बिघाड यांच्याशी सामान्यपणे जोडलेल्या आहेत. जास्त प्रमाणात खाणे आणि नीट न चावता अन्न तसेच गिळणे यामुळे पचनामध्ये व्यत्यय येतो. नियमित जेवणे आणि व्यायाम यामुळे पचनाला आणि एकरूप होण्याला/मिसळण्याला मदत मिळते.
पचनाची क्रिया लाळेच्या ग्रंथींमधील लाळेपासून तोंडामध्ये सुरू होते. नंतर जठरातील पाचक रस याचे रूपांतर साध्या पदार्थांमध्ये करतात. लहान आतड्यामध्ये या आहाराचे पुढील पचन पित्तरसाद्वारे, स्वादुपिंडातील रसाकडून आणि आतड्यातील पाचक रसाकडून केले जाते. पचन झालेले अन्न लहान आतड्याकडून शोषले जाते.

## एकरूप होणे/मिसळणे

एखादी व्यक्ती चांगले खाऊ शकते आणि चांगले पचन झाले आहे असे सुद्धा त्याला वाटू शकते आणि तरीही ती व्यक्ती रोगी असल्यासारखी दिसते कारण त्याने जे खाल्ले आहे ते योग्यपणे एकरूप झाले नाही/मिसळले नाही.

नीट एकरूप न होणे/न मिसळणे यासाठी जबाबदार असलेले घटक निश्चित केले पाहिजेत आणि त्यानुसार त्यावर उपचार केले पाहिजेत. आल्बो सांग आणि गॅस्ट्रोमोन यांचे मिश्रण/संयोजन, अनेक आहार घटकांच्या एकरूपतेला/मिसळण्याला प्रोत्साहित करण्यास मदत करते.

**पचन**

सलफोज आणि गॅस्ट्रोमोन हे चांगले पाचक आहेत. पचनाच्या त्रासांचा संबंध काही वेळा हायपरएॅसिडिटी (अति पित्त) शी असू शकतो ज्याचा उपचार मॅग्नाईन ने केला जातो. वातबद्धता, पोट दुखणे आणि वेदना होणा-या विकारांचा संबंध जठरआतड्याच्या मार्गाशी असतो हे सुद्धा या औषधांनी दुरूस्त केले जातात.

**अपचन / ऍॅसिडिटी (पित्त)**

गॅस्ट्रोमोनचा वापर अपचनासाठी केला जातो. जर रूग्ण बद्धकोष्ठता किंवा अपचनाने त्रस्त असेल, तर सलफोज आणि स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई किंवा टॅक्साईन यांचा वापर केला जाऊ शकतो. आल्बो सांग एक टॉनिक म्हणून दिले जाऊ शकते विशेषत: अशक्त रूग्णांसाठी.  जे लोक एक आळशी जीवन जगतात त्यांना जेवणापूर्वी वेगाने चालण्याचा सल्ला दिला आहे.

**गॅस्ट्रायटिस (जठराचा दाह होणे)**

गायस्ट्रायटिस म्हणजे उलटी होणे, पोटात दुखणे आणि डिहायड्रेशन (शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे). जर यामध्ये आतड्याचा समावेश असेल, तर याला गॅस्ट्रोएन्टरायटिस असे म्हणतात (अतिसार, तीव्र डिहायड्रेशन आणि कोसळणे). थोडा वेळ कोणतेही अन्न घेऊ नये. पण मॅग्नाईन बरोबर पाणी आणि इतर द्रव्ये थोड्या प्रमाणात वारंवार पिऊ शकता. अतिसार नियंत्रणात आणण्यासाठी डयासिन घेतली जाऊ शकते. जेव्हा अधिक तीव्र लक्षणे कमी होतात तेव्हा प्रत्येक 3 ते 4 तासांनी आल्बो सांग बरोबर हलका आहार घेण्यास सुरूवात केली जाऊ शकते.

**पेप्टिक अल्सर** (पोटाच्या आतल्या पदराला आणि लहान आतड्याच्या वरच्या भागाला व्रण पडणे),

यामध्ये गॅस्ट्रिक (जठराचा) आणि ड्युओडेनल (पक्काशयाचा) अल्सरचा समावेश असतो. याचा संबंध पोटाच्या वरच्या भागात वारंवार वेदना होण्याशी असतो. वेदना होण्याच्या जागी मृदुपणा सुद्धा असू शकतो. दोन्हींचा संदर्भ हायपरएॅसिडीटी (अति पित्त) होण्याशी असू शकतो. गॅस्ट्रिक अल्सर मध्ये अन्न खाल्यावर लगेच वेदना

होते म्हणजे आहारामुळे जळजळ होते आणि म्हणून तेथे वेदना होते. ड्युओडेनल (पक्काशयाशी) अल्सर मध्ये, अन्नाचे सेवन केल्यानंतर अर्ध्या तासाने वेदना होऊ लागते म्हणजे जेव्हा अन्न पक्काशयामध्ये पोहोचते तेव्हा. तीव्र संदर्भांमध्ये, येथे तीव्र वेदना होत असतात ज्यामुळे काहीवेळा उलटी होण्यास प्रवृत्त केले जाते. मॅग्नाईन हा ऍसिडिटी (पित्तासाठी) बरे करण्यासाठीचा एक पर्याय आहे. गॅस्ट्रोमोनचा सुद्धा वापर केला जाऊ शकतो. रूग्णांना मद्यपान आणि धूम्रपान करणे टाळण्याचा सल्ला आहे. आहार सपक असला पाहिजे आणि यामध्ये मसाले असू नयेत आणि ते व्यवस्थित चावले पाहिजे. वैद्यकीय उपचार सहा महिने चालू ठेवला पाहिजे.

**अतिसार**

याचा अर्थ असा की अधिक वारंवार शौचास होते (आतड्याची हालचाल) आणि त्याचे स्वरूप सामान्यापेक्षा पातळ असते. हे अनेक कारणांमुळे होऊ शकते उदा. अपचन आणि संक्रमणे जसे की अमिबाजन्य जुलाब किंवा बॅसिलरी जुलाब (जीवाणूजन्य संक्रमण). अतिसाराचे कारण शोधले पाहिजे आणि त्याप्रमाणे उपचार केला पाहिजे. डयासिन हे अमिबाजन्य आणि बॅसिलरीजन्य जुलाब दोन्ही मध्ये उपयोगी आहे.

**अमिबाजन्य जुलाब** अर्ध घट्ट स्वरूपात मल विसर्जित होणे, पोटामध्ये दुखणे (काहीवेळा आतड्याशी संबंधित) आणि शौचास होताना वेदना होण्यासह मलामधून रक्त आणि श्लेष्मल त्वचा जाणे.

**बॅसिलरीजन्य जुलाबामध्ये**, वरील लक्षणांशिवाय मलाचे स्वरूप सामान्यपणे द्रवरूप असते आणि यामुळे डिहायड्रेशन (शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे) होण्याची शक्यता असते. नुकत्याच झालेल्या शौचामधील मलाचा नमुना घेऊन त्याची मायक्रोस्कोपिक तपासणी करून निदान निश्चित केले जाते.

प्रत्येक 4 तासांनी डयासिन दिले जाते. रूग्णास अंथरूणामध्ये उबदार स्थितीमध्ये ठेवले पाहिजे आणि फक्त द्रवरूप आहार दिला पाहिजे. अशा रूग्णांना मऊ सपक अन्नाची गरज असते किंवा साबुदाणा दूधामध्ये उकडून दिले जाते. एखाद्याने भरपूर पाणी पिऊ नये आणि स्वच्छतेच्या तत्वांचे पालन केल पाहिजे म्हणजे चांगले निर्जंतुकीकरण करणे, अन्न दूषित होण्यापासून रक्षण करणे, माशांचा नायनाट करणे.
बॅसिलरीजन्य जुलाबासाठी अतिसाराचे नियंत्रण झाल्यानंतर पुढील 3 दिवस डयासिन तोंडावाटे देण्याचा उपचार चालू ठेवला पाहिजे. उन्हाळ्यात होणा-या अतिसारासाठी, लिंबाच्या रसाबरोबर गॅस्ट्रोमोन आणि चिनियमको देणे अत्यंत उपयोगी आहे. अतिसारातून बरे झाल्यानंतर भूक वाढविण्यासाठी आणि पचनाचे विकार प्रतिबंधित करण्यासाठी सॉलफॉसची लहान मात्रा दिली जाते.

## कावीळ आणि सोरायसिस

कावीळ ही एक चिकित्सालयीन खूण आहे ज्याचे गुणधर्म असतात डोळयातील पांढरा भाग आणि त्वचा पिवळी होणे. येथे ताप येणे आणि खाजणे सुद्धा होऊ शकते. मलाचा रंग मातकट असतो, लघवीचा रंग गडद पिवळा असतो आणि येथे भूक कमी होते. लवकर निदान होणे आणि त्वरीत उपचार सुरू करणे आवश्यक आहे कारण याचे स्वरूप अडथळा आणणारे आणि विषारी असू शकते. अडथळा आणणारा प्रकार विषाणूच्या संक्रमणांमुळे किंवा परजीवीच्या (कीटक) प्रादुर्भावांमुळे, स्वादुपिंडाच्या हानिकारकतेमुळे किंवा पित्तरस विषयी सोरायसिस मुळे झाला असू शकतो. यकृताच्या सोरायसिस साठी किंवा हानिकारकतेसाठी येथे कोणताही उपचार नाही.

औषधामुळे झालेली यकृताची विषाक्तता किंवा पित्ताशयाशी संबंधित सोरायसिस वर उपचार केला न जाणे यांमुळे विषारी कावीळ होऊ शकते. या कारणावर लवकर उपचार करणे आवश्यक आहे कारण त्यामुळे गुंतागुंती होणे रोखले जाते. कायनोटोमाईन गोळया हा नेहमीचा उपाय आहे. आवश्यकता असेल त्यानुसार हर्बिटार्सची जोड सुद्धा दिली जाऊ शकते. नळाचे पाणी (म्हणजे क्लोरीनयुक्त पाणी) यामुळे सुद्धा विषाणूचा प्रादुर्भाव होऊ शकतो. म्हणून या रूग्णांनी उकळलेले पाणी प्यायले पाहिजे. सर्व संदर्भांमध्ये लिंबूवर्गीय फळाचा रस दिला पाहिजे आणि त्यानंतर पाणी प्यायले पाहिजे. आल्बो सांग बरोबर दूधाची पावडर घेणे किंवा साय नसलेले ताक पिणे याला अनुमती दिलेली आहे, जे दुखण्यातून हळूहळू बरे होण्याच्या वेळी आणि बरे झाल्यानंतर दिले पाहिजे. रूग्णांना उपचारा दरम्यान आणि हळूहळू बरे होण्याच्या वेळी संपूर्ण विश्रांती घेण्याचा आणि चरबी रहीत आहाराचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो.

## स्प्रू (उष्णकटिबंधात होणारा लहान आतड्याच्या दाह होण्याशी संबंधित विकार)

स्प्रू हे शोषणाच्या बिघाडाचे एक संलक्षण आहे आणि त्याची लक्षणे असतात अचानक नकळत पातळ जुलाब होण्यास सुरूवात होणे, सामान्य अशक्तपणा आणि वजन कमी होणे. मलाचा रंग फिकट असतो, ते जड, शिरेदार, आणि चिकट असते. याचा उपचार विविध टप्प्यांमध्ये केला जाऊ शकतो.

1. आहारयुक्त उपचार
2. डिहायड्रेशनचा उपचार
3. तब्येत हळूहळू बरी होण्या दरम्यानचा उपचार.

गॅस्ट्रोमोन, आल्बो सांग आणि व्हिटेस्सनची शिफारस करण्यात आली आहे. प्रतिबंधित आहारामुळे (दूध आणि फळे) वैद्यकीय उपचाराला मदत होईल. कर्बोदके आणि चरबी या गोष्टी प्रतिबंधित आहेत.

**अतड्याशी संबंधित पोटदुखी**

आतड्यातील बिघाड (सामान्यपणे बद्धकोष्ठतेचा एक परिणाम म्हणून) किंवा गॅस/वात साचून राहिल्यामुळे आतड्यामध्ये पिळवटून वेदना होणे/कळ येणे. लहान आतड्यातील वेदनेला हायपोगॅस्ट्रीक प्रदेशाशी (बेंबीच्या खालच्या भागाशी) संदर्भित केले जाते. यामध्ये दाब दिल्यावर आराम मिळू शकतो. काहीवेळा याच्याबरोबर अतिसार किंवा बद्धकोष्ठता होऊ शकते. कोणतेही अन्न खाऊ नये. जर याचे स्वरूप दाहक/जळजळ होणारे असेल तर रूग्णालयात भरती होण्याचा सल्ला दिला जातो. गॅस/वात हरण्यासाठी गरम पाण्याच्या बाटलीने गरम वाफेने शेक घेणे उपयोगी असू शकेल. सॉलफॉस वातबद्धता आणि त्याचप्रमाणे बद्धकोष्ठता यांपासून आराम देऊ शकते. अतिसाराचा उपचार डयासिन ने केला जातो.

**जंत/कृमी**

आतड्यामधील कृमी ह्या सामान्यपणे गोल कृमी, पिन कृमी, धागा कृमी, हुक कृमी इ. असतात. लहान मूलांमधील आतड्यातील कृमी असण्याची मुख्य लक्षणे म्हणजे जळजळणे, दात खाणे, फुगलेले पोट, भूक न लागणे, फेफरेयुक्त आकडी येणे, कमी प्रमाणात ताप येणे आणि अशक्तपणा/रक्तहीनता.

**बद्धकोष्ठता**

बद्धकोष्ठता म्हणजे शौचास होणे अनियमित असणे. नाजूक आणि वयोवृद्ध, गर्भवती आणि स्तनपान करणा-या स्त्रियांमधील बद्धकोष्ठता असणा-यांनी आणि शरीर रचना अशक्त असणा-या रूग्णांनी काळजी घेतली पाहिजे. शौचास नियमित होण्याच्या नियंत्रणामुळे पोट योग्यरीतीने साफ होण्यास मदत होते. तीव्र रेचकांचा नियमित वापर केल्याने आतड्यांना इजा होऊ शकते, डिहायड्रेशन आणि वारंवार बद्धकोष्ठता तसेच पोषणाशी संबंधित विकार होऊ शकतात.

स्पोलॅक्स किंवा स्पोलॅक्स-ई च्या बरोबर आल्बो सांग आणि गॅस्ट्रोमोन दिले असता कोणतेही दुष्परिणाम न होता शौचास होणे नियंत्रित होते आणि पोषक द्रव्यांशी सुद्धा हस्तक्षेप होत नाही. स्पोलॅक्स किंवा स्पोलॅक्स-ई यांचा उपयोग मूळव्याधामध्ये सुद्धा होतो.

जुनाट बद्धकोष्ठतेसाठी, हर्बिटार्स आणि सॉलफॉसच्या संयोजनाचा वापर पंधरवडा ते एक महिन्या दरम्यानच्या एका अवधीसाठी करा. तीव्र बद्धकोष्ठतेमध्ये, टॅक्साईन, स्पोलॅक्स किंवा स्पोलॅक्स-ई चा वापर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

## वातबद्धता

हवा गिळण्या व्यतिरीक्त, अपचन, बद्धकोष्ठता किंवा जास्त प्रमाणात खाणे यांमुळे सुद्धा वातबद्धता होते. मॅग्नाईन. सॉलफॉस आणि गॅस्ट्रोमोन हे वातबद्धता रोखतात. जेवणांबरोबर पाणी पिणे टाळा.

## अपेन्डायसिटिस (अपेंडिक्स/आंत्रपुच्छ नावाच्या अवयवाचा दाह होणे)

ही एक तीव्र स्थिती आहे ज्यासाठी त्वरीत शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असू शकते.

## आहार आणि औषधाची ऍलर्जी

काहीवेळा रूग्ण काही औषधे किंवा आहार घटक सहन करू शकत नाहीत जरी ते सर्वांकडून सामान्यपणे वापरले जात असले तरी. अशा संदर्भांमध्ये, गॅस्ट्रोमोनचा वापर केला जातो. सुरूवातील अगदी थोड्या प्रमाणात देऊन संवेदनशीलता कमी केली जाते आणि या विशिष्ट आहारासाठीची किंवा औषधाची सहनशीलता पोटामध्ये विकसित होईपर्यंत कमी अवधीच्या अंतराने हळूहळू प्रमाण वाढविले जाते.

## यकृत-पित्ताशय संस्था

यकृत हा एक मुख्य अवयव आहे जो कर्बोदके, प्रथिने आणि चरबी यांच्या चयापचयामध्ये एक महत्वाची भूमिका बजावतो. यकृताचा आकार अनेक कारणांनी मोठा होऊ शकतो उदा. मलेरीया, चरबीयुक्त यकृत किंवा हेपटायटिस. यकृताचा समावेश असण्यामध्ये येथे भूक न लागणे, धातू सारखी चव लागणे, पित्त रस जास्त प्रमाणात स्त्रवणे, बद्धकोष्ठता किंवा अतिसार या गोष्टी असतात. उपचार करण्याआधी निदान होणे आवश्यक आहे. अशा रूग्णांना उच्च प्रथिन असलेला आहार, (लिंबू वर्गीय) फळांचा रस, आणि साय काढलेले दूध नियमित अंतराने देण्याची आवश्यकता असते. सेवन केलेल्या आहाराचे एकरूप होणे/मिसळणे यावर उपचाराचे यश अवलंबून असते. रूग्णाने संपूर्ण विश्रांती घेतली पाहिजे. मद्य, तळलेले किंवा तेलकट पदार्थ आणि जास्त मसाले असलेला आहार घेणे टाळले पाहिजे. रूग्णाला शौचास नियमितपणे झाले पाहिजे. चांगली भूक लागणे आणि पचन होणे ही तब्येत सुधारण्याची लक्षणे आहेत. यासाठी सलफोज, गॅस्ट्रोमोन आणि हर्बिटार्स अत्यंत उपयोगी आहेत. हळूहळू बरे होत असताना आल्बो सांग ची शिफारस केली आहे.

## पित्ताचा खडा

मोठा खडा काही वेळा पित्तरस वाहिनी बंद करतो ज्यामुळे पित्तरसाशी संबंधित पोटदुखी होते. ही अचानक होणारी आणि त्रासदायक वेदना असू शकते जी बरगड्यांच्या काठाने सभोवताली आणि खाद्यांच्या सभोवताली पसरू शकते. यासाठी पेटके येणे/कळ येणे-रोधकाने उपचार दिला जातो. हर्बिटार्स ची शिफारस करण्यात आली आहे. जास्त प्रमाणात खाणे टाळले पाहिजे. चरबीयुक्त आहार घेणे प्रतिबंधित आहे. हिरव्या पालेभाज्या आणि फळे मुक्तपणे खाता येतात.

**प्लीहा**

प्लीहाचा आकार वाढलेला असणे ही मलेरीयामधील एक सामान्य गुंतागुंत आहे. याच्यासाठी एका मलेरीया-रोधकाने आणि हर्बिटार्स ने अंदाजे दोन आठवडे उपचार केला पाहिजे. आल्बो सांग हे एक टॉनिक आहे, आणि याचा वापर मलेरीयामुळे झालेल्या रक्तहीनता, अशक्तपणा आणि भूक न लागणे यासाठी केला जातो.

**मलेरीया**

मलेरीया हे एक परजीवी (कीटक) चावल्यामुळे होणारे संक्रमण आहे, संक्रमित ऍनोफेलिस नावाच्या डासाची मादी चावल्यानंतर हे होते. हे तीव्र किंवा जुनाट असू शकते. तीव्र हल्ल्याची लक्षणे आहेत थंडी वाजून येणे, खूप ताप येणे आणि घाम येणे, हा हल्ला एक दिवसाआड होऊ शकतो किंवा प्रत्येक चार दिवसांनी होऊ शकतो.

मलेरीयाच्या एका विशिष्ट हल्ल्यामध्ये तीन टप्पे असतात:

थंड पडण्याचा टप्पा: हे 1/4 ते 2 तासांपर्यंत राहते. रूग्णास डोकेदुखी असते आणि हात-पाय आणि पाठ दुखते, त्याचबरोबर थंडी वाजून येते, त्यानंतर रायगर (खूप जोराची थंडी/कंप सुटण्या इतकी थंडी) होतो, ज्यामध्ये त्याचे दात एकमेकांवर घासले जातात, त्याच्या शरीराचे खूपच कंपन होत राहते आणि आतून थंड वाटते.

उष्ण टप्पा: सामान्यपणे 4 तासांपर्यंत राहतो, उष्णतेची भावना हळूहळू संपूर्ण शरीरभर पसरते, नेहमी याबरोबर ग्लानी येते आणि चित्त भ्रम होणे.

घाम येण्याचा टप्पा: 1 ते 2 तास. जास्त प्रमाणात घाम येण्याची शक्यता असते; ताप एकदम खाली उतरतो आणि अस्वस्थता आणि वेदना यांपासून आराम मिळतो. दररोज, प्रत्येक तीन दिवसांनी एक हल्ला येऊ शकतो किंवा चार दिवसांनी पुन्हा येऊ शकतो हे मलेरीयाच्या परजीवीवर अवलंबून असते.

**चेतासंस्थेमधील बिघाड**

चेता संस्था इतर सर्व संस्थांचे नियंत्रण करते: श्वसन संस्था, हृदयधमनी, जठर-आतड्याच्या संस्था, दृष्टी आणि ऐकणे. ऑटोनॉमिक (स्वयंनियंत्रित) चेता संस्थेमधून उत्पन्न होणा-या विशेष नसा हृदय, पोट, आतडे, डोळे, कान इ. चे नियंत्रण करतात. संक्रमण किंवा औषधामुळे चेता संस्थेला इजा होण्यामुळे मध्यवर्ती चेता संस्थेमध्ये तीव्र गुंतागुंती निर्माण होतात. त्याचप्रमाणे इतर संस्थांमधील बिघाड विशेषत: जठरआतड्याच्या संस्थेतील (पोषण, पचन) बिघाडामध्ये चेता संस्थेचा अप्रत्यक्ष समावेश असू शकतो. भावनिक अस्वस्थता, बद्धकोष्ठता किंवा इतर जोखमी असलेले घटक मध्यवर्ती चेता संस्थेच्या विकारांसाठी जबाबदार आहेत.

पोषकद्रव्यांच्या विकारांवर आल्बो सांग आणि योग्य आहाराने, आणि बद्धकोष्ठतेवर सॉलफॉस आणि स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई किंवा टॅक्सिन ने उपचार केला जाऊ शकतो. भावनिक अस्वस्थता व्हिटेस्सन ने दुरूस्त केली जाऊ शकते. चेता संस्थेची आक्रमकता आणि बद्धकोष्ठता मध्ये दूध आणि फळांचे रस यांसह एक द्रवरूप आहार उपयोगी आहे. प्रौढ रूग्णांसाठी लिव्हॅक्टिन-जी ची शिफारस केली आहे. मानसिक विकारांवर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असते. 'आल्बो सांग बरोबर व्हिटेस्सन' हा नियमित उपाय आहे.

**चित्त भ्रम होणे (डेलिरीयम)**

ही ताप येण्याची एक सामान्य गुंतागुंत आहे. कारणावर उपचार केल्याने चित्त भ्रम होण्याची स्थिती आपोआप बरी होईल. व्हिटेस्सन हे औषध एक पर्याय आहे. लहान मूलांमध्ये हे चिनियमको बरोबर दिले पाहिजे.

**फेफरे येणे**

फेफरे येण्यावर व्हिटेस्सन ने उपचार केले जातात. पण वारंवार फेफरे येण्याच्या संदर्भांमध्ये अगरको हे अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**इन्सोम्निया/अनिद्रा (किंवा झोप न लागणे)**

हे चिंता किंवा भावनिक अस्वस्थता यांमुळे झाले असू शकते. काहीवेळा जास्त प्रमाणात धूम्रपान करणे आणि चहा किंवा कॉफीचा वापर करणे यांमुळे सुद्धा झोप येत नाही. याशिवाय, सर्व वेदनादायक स्थिती झोपेमध्ये हस्तक्षेप करू शकतात. जेव्हा रूग्ण झोप न लागण्याची तक्रार करतात तेव्हा उच्च रक्त दाब ही गोष्ट सुद्धा लक्षात घेतली पाहिजे. म्हणून, अनिद्रेच्या उपचारामध्ये कारणावर उपचार केला पाहिजे. उपचार करण्याआधी योग्य निदान होणे आणि कारणाची निश्चिती करणे अत्यंत आवश्यक आहे. अनावश्यकपणे गुंगी आणणारी किंवा

संमोहक औषधे देऊ नयेत कारण संमोहकांचा सतत वापर केल्यामुळे त्याची सवय किंवा व्यसन लागते. व्हिटेस्सन  हा नसा दुखणे आणि झोप न येणे यासाठीचा उपचार आहे. हे चिंता, ताण, बेचैनी आणि थकवा दूर करण्यासाठी आणि ताजेतवाने वाटणारी झोप येण्याची खात्री देण्यासाठी सुद्धा मदत करते. डोक्याच्या त्वचेवर आणि तळपाय दोन्हीवर झोपायला जाण्याच्या अर्धा तास आधी ओलोसिनच्या काही थेंबाने मसाज करण्यामुळे शांत झोप येते.

## स्मरणशक्ती नष्ट होणे

स्मरणशक्ती नष्ट होणे ही सामान्य गोष्ट आहे जेव्हा तिचा संबंध वय होण्याशी असतो. अल्झायमरचे विकार, स्ट्रोक (मेंदूला रक्त पुरवठा कमी होणे), वारंवार आजारी पडणे जसे की मेनिनजायटिस (मेंदू आणि पाठीच्या कण्याच्या वेष्टनाचा दाह) किंवा अपस्मार, ताण, अवैद्य औषधांचा किंवा औषधोपचारांचा वापर करणे, बुद्धी मंद होणे/वेडेपणा किंवा शरीराला एखादा शारीरिक आघात होणे यांसारख्या वैद्यकीय स्थितींमुळे सुद्धा स्मरणशक्ती नष्ट झाली असू शकते. स्मरणशक्ती नष्ट होणे बहुतेक करून हळूहळू होते आणि ही स्थिती येण्यास काय कारणीभूत आहे यावर अवलंबून त्याची तीव्रता वेगवेगळी असू शकते. गोंधळ होणे किंवा सतर्कता कमी होणे हे स्मरणशक्ती कमी होण्याचे आणि तसेच एखाद्या गंभीर आजाराचे पहिले कारण असू शकेल, विशेषत: वयस्करांमध्ये. जेव्हा हे अल्झायमरच्या रोगासारख्या वैद्यकीय स्थितीमुळे झालेले असते, तेव्हा स्मरणशक्ती हळूहळू नष्ट होते आणि कायमची नष्ट होण्याची प्रवृत्ती असते. इतरवेळी ही स्थिती तात्पुरती असते आणि केवळ एखाद्याच्या अनुभवाच्या एखाद्या भागाशी संबंधित स्मरणशक्तींवर परिणाम होतो. स्मरणशक्ती नष्ट होणे बरे होण्याच्या स्थितीतील असेल तरच त्यावर उपचार करता येतो आणि हा उपचार स्थितीच्या प्राथमिक कारणावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो.

जेव्हा स्मरणशक्ती नष्ट होणे हे एका अधिक तीव्र रोगाचे एखादे लक्षण असते, तेव्हा ही त्रस्त असलेली रोगाची स्थिती ओळखण्यात आली आणि बरी झाल्याबरोबर हे बरे होऊ शकते. वयानुसार स्मरणशक्ती नष्ट होणे बरी होत नाही पण प्रतिबंधात्मक उपाय अनुसरून या लक्षणांमध्ये सुधारणा केली जाऊ शकते. स्मरणशक्तीवर उपचार करण्यामध्ये वनौषधी असलेल्या औषधांचा किंवा जीवनशैलीमध्ये एक बदल करण्याचा समावेश असू शकतो. चांगली गुणवता असलेली आणि दीर्घ काळ झोप लागणे याबरोबरचा पूरक आहार आणि संभाव्य जोखमीचे घटक टाळणे यांमुळे सुद्धा रूग्णाच्या सामान्य स्थितीमध्ये सुधारणा होऊ शकते. स्मरणशक्ती नष्ट होण्यावरील उपचारामध्ये कुटुंबाचा पाठिंबा महत्वाची भूमिका बजावते. कुटुंब सदस्यांना बहुतेक करून त्यांचा आजारी नातेवाईकाकडे विशेष लक्ष देण्यास प्रवृत्त केले जाते आणि आजारी लोकांना सामाजिक कार्यामध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले जाते. रूग्णास नियमितपणे आल्बो सांग दिले जाऊ शकते. लिव्हॅक्टिन-जी हे निर्देशित करण्यात आले आहे कारण यामुळे मानसिक कार्यांमध्ये सुधारणा होते.

### चेतासंस्थेच्या वेदना आणि बाह्य भागाच्या/वरवरच्या वेदना

दात दुखणे, कान दुखणे, सांधे दुखणे, डोकेदुखी, स्नायू दुखणे यांवर डेसिल+ ने उपचार केले जातात. जर याचा संबंध झोप न येण्याशी असेल तर हे व्हिटेस्सन बरोबर सुद्धा दिले जाऊ शकते.
टीप: हे जठरआतड्याच्या मार्गामध्ये जळजळ उत्पन्न करते आणि हे जठराचा त्रास होत असेल तर विरूद्ध लक्षण दर्शविते आणि याची मात्रा जास्त प्रमाणात घेण्यामुळे यकृतास इजा होऊ शकते.

### न्युरास्थेनिया/दुर्बलता

न्युरास्थेनिया/दुर्बलता याची लक्षणे अशी असतात शरीराची आणि मनाची स्थिती थकलेली असणे, यासाठी कारणीभूत घटक असतात- तीव्र शारीरिक ताण येणे, रक्तस्त्राव होणे, तीव्र आजारीपण किंवा जुनाट संक्रमणांमुळे विषबाधा होणे आणि अपचन होणे. बहुतेककरून आवश्यक असणारी गोष्ट म्हणजे वातावरणामधील एखादा बदल, त्याचबरोबर सामान्य आरोग्याकडे लक्ष देणे, सुधारीत आहार आणि टॉनिकची औषधे.
आल्बो सांग, गॅस्ट्रोमोन आणि व्हिटेस्सन, यांमुळे एक सहक्रियात्मक क्रिया होऊ शकते. जर भूक कमी लागत असेल, तर सलफोस, आणि स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई चा वापर करा किंवा बद्धकोष्ठतेसाठी टॅक्सिनचा वापर करा. लिव्हॅक्टिन-जी चा फायदा विशेषकरून वयस्कर रूग्णांना होतो.

### उन्माद

जेव्हा काही प्रखर भावना दडपल्या जातात तेव्हा उन्माद होतो. चिंता किंवा उदासिनता टाळण्यासाठी त्यांना लक्षणात्मक किंवा सहायक मानसोपचाराची आवश्यकता असते. रूग्णांना अकरको आणि व्हिटेस्सन घेण्याचा सल्ला द्या. आल्बो सांग किंवा लिव्हॅक्टिन-जी यांचा वापर सामान्य आरोग्य सुधारण्यासाठी सुद्धा केला जातो.

### अपस्मार

अपस्मार वेगवेगळया प्रकारचे असू शकतात – मुख्य अपस्मार (किंवा ग्रॅंडमल/मोठा) किरकोळ अपस्मार (किंवा लहान). हे कोणत्याही टप्प्यामध्ये होऊ शकते, पण हे सामान्यपणे लहानपणी होते. मुख्य अपस्माराचा हल्ला/ऍटॅक येण्याआधी सामान्यत: काही प्रकारच्या भावना (औरा) निर्माण होतात. रुग्ण किंचाळतो आणि अचानक पडतो, वारंवार स्वत:ला गंभीर दुखापत करून घेतो. स्नायू जखडले जातात आणि घट्ट आवळले

जातात. जो चेहरा पहिल्यांदा फिकट असतो तो नंतर काळानिळा पडतो, कारण श्वसनक्रियेमध्ये अडथळा निर्माण होतो. काही सेकंदांनंतर, स्नायू पिळवटतात आणि जोराने धक्के बसू लागतात, डोळयातील बुब्बुळे फिरतात, जबडा जखडतो आणि शिथिल होतो आणि जीभ तीव्रतेने चावली जाऊ शकते. आपोआप मलविसर्जन आणि मूत्रविसर्जन होऊ शकते. हळूजळू रूग्ण कोमाच्या/बेशुद्ध होण्याच्या स्थितीमध्ये जातो. हात-पाय शिथिल पडतात आणि तो काही वेळ झोपतो, कधीकधी चालतो, बहुतेक त्याची मानसिक स्थिती गोंधळलेली असत असेल. अपस्मारामध्ये, झोपायच्या वेळी अगरको घेण्याबरोबर, दिवसाच्या वेळी व्हिटेस्सन घेण्यास सुरूवात करा. पुरेशा आणि जास्तीतजास्त परिणामासाठी हा उपचार दीर्घकालीन अवधीसाठी चालू ठेवला पाहिजे.

वारंवार हल्ले/ऍटॅक्स येण्याची प्रवृत्ती असणा-या रूग्णांमध्ये, उपचाराची सुरूवात व्हिटेस्सन बरोबर केली पाहिजे. आल्बो सांग चा वापर एक सामान्य टॉनिक म्हणून केला जाऊ शकतो. जर अपस्माराचा संबंध उच्च रक्त दाब किंवा ऍन्जायना (छातीमध्ये कळ येणे) आणि औरा (अपस्मार येण्याच्या आधीच्या खूणा) यांच्याशी असेल तर ऍमिग्लिया उपयोगी आहे. जर अपस्मार येण्याच्या आधीच्या लक्षणांच्या वेळी ऍमिग्लिया घेतले तर ते नेहमी एखादा हल्ला/ऍटॅक थांबवतात. हल्ल्याच्या/ऍटॅक आलेल्या वेळी रूग्णाला स्वत:ला दुखापत करून घेण्यापासून प्रतिबंधित केले पाहिजे आणि काही वेळा त्याची स्वत:ची जीभ चावली जाऊ नये यासाठी त्याच्या तोंडामध्ये एखाद्या लाकडाच्या ठोकळयासारखी एखादी वस्तू घातली पाहिजे.

## रक्तामधील बदल – रक्तहीनता/अशक्तपणा

रक्तहीनता/अशक्तपणा विविध प्रकारचा असू शकतो. ते प्राथमिक असू शकतात (पोषक द्रव्यांचे विकार) आणि परजीवींची संक्रमणे, हानिकारकता किंवा रक्तस्त्राव होणे यांमुळे दुय्यम असू शकतात. अशक्तपणाचे कारण शोधून काढा आणि ते दुरूस्त करा. त्वचा, ओठ, पापण्यांच्या आतील भाग इ. फिकट/पांढरट पडणे, आळस येणे आणि चक्कर येणे आणि अगदी श्वास घेण्यास त्रास होणे आणि छातीत धडधडणे. येथे बहुतेक करून भूक लागत नाही आणि अपचन होते. ही स्थिती दुरूस्त करण्यासाठी फेरस फ्युमारेटचा वापर केला जाऊ शकतो. उपचाराचे सहायक म्हणून आल्बो सांग उपयोगी आहे.

## दुखणे आणि वेदना होणे

वेगवेगळया स्थितींमध्ये वेगवेगळया प्रकारचे दुखणे आणि वेदना होऊ शकतात. या सर्व दुखण्यासाठी आणि वेदनेसाठी डेसिल+ चा वापर केला जातो. जर मन उदास झाले असेल तर त्यामध्ये व्हिटेस्सन जोडा. सांधे

दुखण्यावर रेमोरीन घेण्याचा सल्ला दिला आहे. जेथे निर्देशित केले आहे तेथे बाह्य भागावर लावण्यासाठी रबजॉन, रेमोरीन तेल आणि चेसॉल यांचा वापर केला जातो.

### एखाद्या सांध्याचा दाह होणे

सांधे गरम आणि सुजलेले असतात आणि हालचाल वेदनादायक असते. हा भाग बॅन्डेजने/मलमपट्टीने बांधून किंवा आधार देऊन अचल/स्थिर  ठेवला जातो. जर या सांध्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता असेल तर एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते कारण या दाहाचे संक्रमणामध्ये परिवर्तन होऊ शकते. त्या जागी रबजॉन, रेमोरीन तेल किंवा चेसॉल हळूवारपणे लावा. जेव्हा सूज कमी होते, तेव्हा हळू हालचाली सुरू केल्या जातात. चेसॉल किंवा रेमोरीन तेलाने मसाज करणे हे बरे होण्यासाठी मौल्यवान ठरते. जुनाट संधिवातामध्ये शिफारस केलेल्या मात्रांमध्ये रेमोरीनच्या कॅप्स्युल्स दिल्या जाऊ शकतात आणि जेथे अनेक सांध्यांवर परिणाम झाला आहे अशा गंभीर संदर्भांमध्ये सुद्धा हे मोठ्या प्रमाणात यशस्वी असल्याचे सिद्ध झाले आहे. मानसिक वेदनेमध्ये व्हिटेस्सन इतर उपायांबरोबर दिले जाते.

### इतर वेदनादायक स्थिती:

डोकेदुखी, कान दुखणे, दात दुखणे, वेदनादायक मासिक पाळी, सायनसायटिस (नाकाच्या पोकळीचा दाह), शस्त्रक्रियेनंतरच्या वेदना आणि लचकणे. या स्थितींमध्ये डेसिल+ चा अत्यंत उपयोग होतो. इनफ्लुएंझाच्या अंग दुखींमध्ये सुद्धा हे उपयोगी आहे. तथापि, हे पोट दुखण्यावर आणि आतील वेदनांवर विरूद्ध लक्षण दाखविते.

### डोकेदुखी

सर्दी होण्यासह ताप येण्याच्या अनेक आजारांमध्ये सुरूवातीला तीव्र आणि तात्पुरती डोकेदुखी झाल्याचे आढळून येते. इतर सामान्य कारणे आहेत: अशक्तपणा, बद्धकोष्ठता, डोळयांवर ताण येणे, चिंता न्युरोसिस (घाबरणे, भिती वाटणे इ. मुळे), मायग्रेन (तीव्र डोकेदुखी), उच्च रक्त दाब, मूत्रपिंडाचे जुनाट रोग, आणि कान, नाक, घसा आणि दाताचे रोग. डेसिल+ चा उपयोग लक्षणात्मक उपचारासाठी केला जातो. कपाळावर रबजॉन लावण्याने आराम मिळतो. व्हिटेस्सन मुळे शांत झोप येते.

### गोनोरिया

गोनोरिया हा गोनोकॉकल संक्रमणामुळे होणारा एक लैंगिक विकार आहे. यामध्ये मूत्र मार्गाचा (मूत्रमार्ग, मूत्राशय, आणि मूत्रपिंड) आणि इतर अवयवांचा समावेश असतो. येथे लघवीला होताना आग होण्याबरोबरच मूत्रमार्गाचा तीव्र दाह होणे आणि अंगावरून पांढरे जाणे होऊ शकते. दुर्लक्षित संदर्भांमध्ये हे जुनाट होते आणि मूत्रमार्गातील कडकपणा, सांधे दुखणे, डोळयाच्या आणि हृदयाचा समावेश असणे सारख्या अनेक गुंतागुंती होऊ शकतात. अशा संदर्भांमध्ये विशिष्ट उपचारा बरोबर लोबाईन 2 ते 3 महिने चालू ठेवले पाहिजे. आल्बो सांग जुनाट संदर्भांमध्ये शक्तपणा कमी करण्यास मदत करते. लघवीला होताना जळजळ होण्यासाठी आणि अंगावरून पांढरे जाते त्यासाठी, हेमोप्लेक्स उपयोगी आहे. स्त्रियांमधील गोनो-हीयासाठी आतून आणि बाहेरून उपचार करण्याची आवश्यकता असते. त्या जागेची स्वच्छता ठेवण्याकडे लक्ष दिले पाहिजे. इतर उपचार पुरूषांप्रमाणे सारखेच असतात. दुखणे हळू हळू बरे होण्याच्या वेळेसाठी आल्बो सांग दिले जाते.

**सिफिलिस**

सिफिलिस हा एक सांक्रमिक रोग आहे जो ट्रेपोनेमा पॅलिडम नावाने ओळखल्या जाणा-या एका जीवजंतूमुळे होतो. यामध्ये काही तीव्र, जुनाट आणि जन्मजात गुंतागुंती असल्याची लक्षणे असतात. लैंगिक संपर्क झाल्यानंतर काही दिवसांत प्राथमिक जखम/व्रण (जननेंद्रियांवर) दिसू लागतात, जे पसरतात आणि घट्ट होतात. शेजारी असलेल्या ग्रंथींचा आकार सुद्धा वाढतो. याला प्राथमिक जखम/व्रण असे म्हणतात. त्यानंतर ग्रंथींचा आकार मोठा होतो, ताप येतो आणि इतर रचनांची स्थिती दाहक/सूज आलेली होते आणि दुस-या टप्प्यामध्ये सामान्य अस्वस्थता होते. तिस-याचा संबंध पॅरेसिस (स्नायूंची दुर्बलता) किंवा अर्धांगवायू/लकवा मारणे सारख्या चेता संस्थेच्या गुंतागुंतीशी असतो. सिफिलिसच्या उपचारासाठीचे विशेष उत्पादन म्हणजे लोबाईन आणि त्याबरोबर विशिष्ट प्रतिजैविके हे आहे. सिफिलिटिक अल्सरसाठी, चे मलम (हेमोप्लेक्स जे रीपॅन्टोने समृद्ध केले गेले आहे आणि मिसळले आहे) वापरले जाते. हेमोप्लेक्स तोंडावाटे दिले जाऊ शकते. यानंतर थोडा वेळ लोबाईनचा वापर केला जातो. लोबाईन सिफिलिसच्या केवळ तीव्र संदर्भांमध्येच फायदेशीर नसते तर जुनाट, सुप्त आणि जन्मजात स्वरूपांसाठी सुध्दा फायदेशीर असते.

**छाती आणि फुफ्फुसाची संक्रमणे**

**ब्रॉन्कायटिस (श्वास नलिकांचा दाह)**

ब्रॉन्कायटिस हे श्वसन मार्गाच्या वरच्या भागाचे संक्रमण आहे. छातीच्या वरच्या भागामध्ये आवळल्यासारखे वाटणे आणि वेदना होणे अशा एखाद्या सामान्य अस्वस्थतेने याची सुरूवात होते. येथे कोरड्या खोकल्याचा एक

विशिष्ट हल्ला होऊ शकतो त्यानंतर तापाचे प्रमाण वाढते. हळूहळू, हा खोकला ओल्या खोकल्यामध्ये बदलतो आणि श्वास घेण्यास श्रम पडतात, त्याचबरोबर छातीमध्ये बुडबुडे आल्यासारखा किंवा जोरात धडधडत असल्याचे आवाज येतात. या स्थितीसाठी कोफ्लिनच्या जोमदार उपचाराची आवश्यकता असते. जर ताप खूपच जास्त असेल, तर हेमोप्लेक्स देणे जोडले जाते. रूग्णाने काही दिवस अंथरूणातच राहिले पाहिजे आणि त्याला पाणी आणि दूधासारखे इतर द्रवपदार्थ भरपूर प्रमाणात दिले पाहिजेत. छातीवर आणि पाठीवर चेसॉल किंवा रबजॉन लावणे खूप उपयोगी असल्याचे आढळून आले आहे. जुनाट ब्रॉन्कायटिस मध्ये, मेडिटॅब ची शिफारस करण्यात आली आहे.

## प्युरीसी (फुफ्फुसावरणाचा दाह)

याची सुरूवात छातीमध्ये एक तीव्र वेदना होण्याने होते जी श्वास घेते वेळी आणि खोकताना अत्यंत वाईट होते. हा हल्ला/ऍटॅक नेहमी थंडी वाजून येण्याने आणि ताप सुमारे 101फॅ. पर्यंत वाढण्याने होतो. जेव्हा द्रावण बाहेर पडते तेव्हा वेदना कमी होते, पण बहुतेक करून श्वास घेण्यास त्रास होण्याची शक्यता असते. याचे निदान तात्पुरते चिकित्सालयीन लक्षणांवरून आणि खुणांवरून केले जाते. अंतिम निदान करण्यासाठी छातीच्या एक्स-रे ची आवश्यकता आहे. जर ताप खूपच जास्त झाला आणि त्याबरोबर थंडी जोरात वाजून येत असेल आणि जास्त प्रमाणात घाम येत असेल तर, एम्पिएमा (छाती आणि फुफ्फुसांच्या मधील जागेमध्ये पू होणे) झाल्याची शंका असते. एम्पिएमाचा संबंध सामान्यपणे रचनात्मक बिघाडाशी, वजन कमी होणे इ. शी असतो. पू शोषून काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करून आणि प्रतिजैविके देऊन याचा उपचार केला पाहिजे. या संदर्भांसाठी हेमोप्लेक्स हा महत्वाचा उपाय आहे. छातीला चेसॉल लावल्यामुळे केवळ वेदना कमी होत नाही तर हे ताप आणि दाह रोधक परिणाम सुद्धा देते. आल्बो सांग या संदर्भांमध्ये रूग्णाचे चैतन्य वाढविण्यास मदत करते. जर क्षयरोगामुळे झाले असेल  तर क्षयरोग-रोधक उपचार आवश्यक आहे.

## क्षयरोग

शुश्रूषा केंद्रामध्ये आणि क्षयरोगविरोधी औषधांद्वारे रुग्णांवर सर्वोत्तम उपचार केले जातात. त्यांना विश्रांती आणि पौष्टिक आहाराची आवश्यकता असते.  रूग्णांना रात्री घाम येतो, भूक लागत नाही, वजन कमी होते, खोकल्याची उबळ येऊन कफ पडणा-या खोकल्याची वाईट स्थिती उद्‌भवते कफामध्ये रक्त असू शकते. आल्बो सांग जे या रोगाविरूद्धची रचना मजबूत करते ते घेण्याची शिफारस आम्ही करतो. जर रूग्णास एखाद्या सुश्रूषा केंद्रामध्ये पाठवता येत नसेल तर त्याला ताजी हवा मिळावी म्हणून बागेमध्ये ठेवले पाहिजे. खोकल्यासाठी मेडिटॅबची लहान मात्रा दिली जाऊ शकते. हिमोप्टिसिस (मेकूड/कफामध्ये रक्त असणे) चा उपचार चिनियमको

आणि व्हिटेस्सन याने केला जातो. फळांचा रस, दूध यांसारखा आहार आणि आल्बो सांग देऊन कमी झालेले वजन दुरूस्त करता येते. हर्बिटार्स त्याबरोबर क्षयरोग-रोधक उपचार यकृताचे संरक्षक म्हणून उपयोगी असू शकते.

## डांग्या खोकला (पर्टुस्सिस)

हा एक संसर्गजन्य रोग आहे जो सामान्यपणे लहानपणी होतो. याची लक्षणे असतात खोकला येणे जो अचानक आवाज करणारा खोकला किंवा उबळ असतो. सामान्यपणे यानंतर श्लेमा सारखा चिकट पदार्थ लक्षणीय प्रमाणात  उलटीद्वारे बाहेर पडतो. खोकल्याची उबळ नेहमी रात्री झोपायच्या आधी आणि जेवणानंतर येते. हा रोग संसर्गजन्य असल्यामुळे आणि लहान मूले खूप ग्रहणशील/अतिसंवेदनशील असल्यामुळे डांग्या खोकल्याने त्रस्त असलेल्या लहान मूलास वेगळे ठेवले पाहिजे आणि ताप असताना अंथरूणावरच ठेवले पाहिजे, एका उबदार पण चांगली हवा खेळणा-या खोलीमध्ये. जर उलट्या खूप होत असतील तर आहार फक्त दूधापुरताच मर्यादित केला पाहिजे. आहारातील निर्बंधे आणि हलकी जेवणे घेण्यामुळे उलटी थांबविण्यास मदत होईल. डॅन्जाईन हा शिफारस केलेला उपचार आहे. हे पेटके/कळ-रोधक आणि कफ पाडण्याचे काम करते. याशिवाय तीव्र खोकल्याची उबळ नियंत्रित करण्यासाठी व्हिटेस्सन दिले जाऊ शकते. चेसॉलने छातीवर हळूवार मसाज केल्याने मदत होते.

## मधुमेह

हे स्वादुपिंडाच्या विकारांशी जोडलेले आहे, ज्यामुळे कर्बोदके, प्रथिने आणि चरबी यांच्या चयापचयामध्ये हस्तक्षेप होऊ शकतो. येथे हायपरग्लायसेमिया (रक्तातील साखरेची पातळी जास्त होणे) आणि ग्लायकोयुरीया (लघवीमध्यील साखर) जास्त होऊ शकते. हा रोग चुकीच्या चयापच्यामुळे होऊ शकतो. या रोगामुळे उच्च रक्त दाब, दृष्टीतील दोष आणि पेशी किंवा शरीर नष्ट होण्याचे बदल वेगाने होऊ शकतात. यामध्ये काहीवेळा चेता संस्थेचा सुद्धा समावेश असू शकतो. मधुमेहावर सामान्यपणे पुढील गोष्टीने उपचार केला जातो : (1) निर्बंधित आहार (2) व्यायाम आणि (3) औषधे.

रूग्णाचे वजन आणि रोगाची श्रेणी यानुसार आहारावर निर्बंध घातले पाहिजेत. मधुमेहामध्ये चालणे हा उत्तम स्वरूपाचा व्यायाम आहे. आहारामध्ये साय काढलेले दूध साखरेशिवाय घेणे, ब्रेड, किंवा पोळया/चपात्या आणि थोड्या प्रमाणात चरबी आणि भात. खूप प्रमाणात भात खाणे, साखर, पिष्टमय पदार्थ बटाटे, केळी, आंबे पूर्णपणे थांबविले पाहिजे, किंवा लघवीच्या तपासणीमध्ये जोपर्यंत साखर असल्याचे दिसत नाही आणि लक्षणे पूर्णपणे नाहीशी होतात त्यावेळी अगदी निर्बंधित प्रमाणात घेतले पाहिजेत. मोसंबा सारखी लिंबूवर्गीय फळे खाण्यास परवानगी आहे. मधुमेहासाठी मेर्सिनाची शिफारस करण्यात आली आहे. ही मात्रा आहार, व्यायाम आणि सध्या

चालू असलेली औषधे यांच्या संबंधाने योग्यपणे समायोजित केली पाहिजेत. वेळोवेळी रक्तातील साखरेवर नियंत्रण राखले जाऊ शकेल. उदासिनता आणि जळजळ होणे यांसाठी आम्ही व्हिटेस्सन बरोबर मेर्सिनाच्या संयोजनाची शिफारस करतो.

वजन कमी होणे आणि स्नायूमधील अशक्तपणा यांसाठी, आल्बो सांग गोळया उपयोगी आहेत. ही सर्व लक्षणे प्रथिनांच्या अभावामुळे असू शकतात. म्हणून, पाचकांसह उच्च प्रथिने असलेला आहार आणि व्यायाम याची मधुमेही रूग्णांना मदत होऊ शकते.

**ड्रॉप्सी (सूज येणे)**

हे दोन प्रकारचे असू शकेल:

1. नॉन-पिटिंग ऑन प्रेशर (दाब दिल्यावर त्वचा आत न जाणारी सूज).

2. पिटिंग ऑन प्रेशर (दाब दिल्यावर त्वचा आत जाणारी जूज).

नॉन-पिटिंग एडिमा/सूज ही मिक्सीडिमा (थायरॉईडचा अभाव) मुळे होतो.

पाऊलांवरची किंवा हात-पायाच्या खालच्या भागातील पिटिंग एडिमा (दाब दिल्यावर आत जाणारी सूज) किंवा अवलंबून असलेल्या भागावरी सूज ही हृदयाला रक्त पुरवठा न झाल्यामुळे होणा-या हृदय आघातामुळे झाली असू शकते. चेह-यावर सूज येणे हे मूत्रपिंडाच्या विकारामुळे होते. ऍसिटेस (पोटामध्ये द्रव साचून राहणे) हे यकृताच्या विकारांमुळे होते. पोषणाशी संबंधित सूज येण्याच्या सुरूवातीच्या टप्प्याचा उपचार जीवनसत्व बी1, उच्च प्रमणात प्रथिने असलेला आहार आणि आल्बो सांग याने केला जातो. जेव्हा मूत्रपिंडावर परिणाम होतो, तेव्हा तुरैको चा वापर केला जाऊ शकतो. सूज येणे किंवा ऍसिटेस (पोटामध्ये द्रव साचून राहणे) शी संबंधित यकृत विकारामध्ये कायनोटोमाईन उपयोगी आहे. जेव्हा हृदयाचा समावेश असतो, तेव्हा ग्रॅन्डिकोचा वापर केला जाऊ शकतो. तथापि, सूज येण्याच्या किंवा ऍसिटेस (पोटामध्ये द्रव साचून राहणे) च्या सर्व संदर्भांमध्ये मीठरहीत आहाराचे सेवन करणे अत्यंत आवश्यक आहे आणि लिंबूवर्गीय फळाचा रस उपयोगी असेल. वरील उपचारा बरोबर अंथरूणामध्ये पूर्ण विश्रांती घेण्यामुळे तब्येतीमध्ये वेगाने सुधारणा झाल्याची दिसेल.

**ग्रंथी – लिंफ ग्रंथींचा आकार मोठा होणे**

(1) हे वेदनादायक आणि आकार मोठा झालेला असू शकेल. उदा. दाहक प्रक्रिया. या तीव्र स्थितीवर सामान्यपणे प्रतिजैविकांनी उपचार केला जातो.

(2) ग्रंथींचा आकार मोठा होऊ शकतो, पण वेदना होत नाहीत; अशी स्थिती काही रोगांमध्ये दिसून येते. हे हानिकारतेमुळे, विषाणूच्या संक्रमणामुळे किंवा इतर स्थितींमुळे होऊ शकते. क्षयरोगयुक्त ग्रंथींसाठी क्षयरोग-रोधक उपचाराची आवश्यकता आहे. ताजी हवा, सूर्य प्रकाश, दूध, फळाचा रस, त्याबरोबर आल्बो-सांग आवश्यक आहे. दाहक ग्रंथी प्रतिजैविकांनी उत्तमरितीने बरे केले जाऊ शकतात. ते आपोआप फूटत नाही तोपर्यंत कापण्याची आवश्यकता नाही. जर तेथे एखादी जखम असेल, रीपॅन्टो ने असेप्टिक ड्रेसिंग (सेप्टिक रोधक मलमपट्टी) करणे आवश्यक आहे. सर्व जुनाट स्थितींचा उपचार आल्बो सांग ने केला पाहिजे.

**त्वचेचे विकार**

त्वचेचा रोग तीव्र किंवा जुनाट असू शकतो. तीव्र संक्रमणासाठी सूक्ष्मजीवी-रोधक एजंटसने उपचार करणे आवश्यक आहे, तसेच असेप्टिक ड्रेसिंग (सेप्टिक रोधक मलमपट्टी), पोटीस किंवा प्लास्टर लावणे यांसह त्या जागी काम करणा-या औषधांनी उपचार करणे. काही जुनाट प्रकटीकरणांमध्ये रचनात्मक बिघाड बरोबर करण्यासाठी आतून देण्यात येणा-या औषधाने उपचार करण्याची आवश्यकता आहे. लोबाईन आणि गिगि ही माहित असलेली रक्त शुद्ध करणारी औषधे आहेत. आल्बो सांग एका सामान्य रीतीने रक्त समृद्ध करते. त्वचा रोग आणि इसब यांमुळे राठ झालेली त्वचा रिपॅन्टोच्या बाह्य वापराने निघून जाते. विविध त्वचा रोगांसाठी विशेषत: मुरूम आणि सौंदर्यपिटिकांसाठी गिगि सिरपचा उपयोग केला जाऊ शकतो.

**खरूज**

खरूज हे त्वचेचे एक सामान्य संक्रमण आहे आणि हे संसर्गजन्य आहे. याच्यामध्ये तीव्र खाज सुटते आणि काहीवेळा खाजण्यामुळे दाह होतो. सामान्य आरोग्याकडे आणि विकार झालेल्या त्वचेच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जेव्हा केव्हा आवश्यकता असेल, तेव्हा कपडे आणि अंथरूणावरची चादर बदलली पाहिजे. पुन्हा संक्रमण होऊ नये यासाठी स्वच्छता पाळली पाहिजे. जळजळ होणा-या प्रकाराची साबणे वापरू नयेत. हर्बो-सल्फ रीपॅन्टो मध्ये एकास दहा या प्रमाणात मिसळून पातळ करून झोपायच्या वेळी बाह्य भागावर लावण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो. हे दुस-या दिवशी सकाळी धुवून टाकता येते.

**गजकर्ण/रींगवर्म**

हा एक त्वचा रोग आहे जो शरीराच्या कोणत्याही भागावर परिणाम करू शकतो. याची सुरूवात एक लहान ठिपक्याने होते, ज्याचा विस्तार होऊन एक वर्तुळाकार धब्बा तयार होतो. गजकर्ण/रींगवर्म दाढी, डोक्यावरची

त्वचा इ. वर परिणाम करू शकते. स्किनमेंट लावून गजकर्ण/रींगवर्म बरा केला जाऊ शकतो जे सकाळी धुवून टाकता येते.

**सोरायसिस**

सोरायसिस हा एक जुनाट त्वचा रोग आहे ज्याची लक्षणे आहेत शरीराच्या कोणत्याही भागावरचे स्त्रवणारे खवलेदार धब्बे फुटणे.

**इसब**

हा एक जुनाट त्वचा रोग आहे ज्याची लक्षणे असतात काळे डाग पडणे. याचा उपचार लोबाईनने आणि रीपॅन्टो बाह्य भागावर लावून केला पाहिजे, जे त्वचेवर चोळले पाहिजे. हर्बो-सल्फ तोंडावाटे घेतले पाहिजे आणि रीपॅन्टो बरोबर हर्बो-सल्फचा (प्रमाण 1:5) बाह्य भागावर लावण्यासाठी उपयोग करणे चांगले परिणाम देतात. स्किनमेंटचा सुद्धा वापर केला जाऊ शकतो.
सर्व जुनाट त्वचा विकारांवर प्रथिनांनी समृद्ध असलेल्या आहाराने, लिंबूवर्गीय फळांनी, जीवनसत्व सी आणि आल्बो सांग ने उपचार केले पाहिजेत.

**अंगावर गांधी उठणे**

अंगावर गांधी उठणे ही एक सामान्य अतिसंवेदनशीलता प्रतिक्रिया आहे ज्याची लक्षणे असतात त्वचेच्या काही जागांवर सुजलेल्या भागाचे धब्बे (चक्र) आणि खाज येणारे पुरळ येणे. हे सामान्यत: छोट्या अवधीसाठी असते आणि वारंवार येऊ शकते हे काही ऍलर्जिक प्रतिक्रियेमुळे येऊ शकते. हा हल्ला/ऍटॅक अंडी, शिंपले या आहारांमध्ये असलेल्या काही प्रतिजनकांमुळे (ऍंटीजेन) किंवा औषधे, श्वासावाटे आत घेतली जाणारी औषधे (इनहलंटस), भावनिक उत्तेजना किंवा परजीवी चावल्याने संक्रमण होणे यांमुळे होऊ शकतो. जुनाट वारंवार होणा-या हल्ल्यांसाठी, जबाबदार असलेला घटक शोधून काढा. असे खाद्य पदार्थ खाणे टाळल्यामुळे सामान्यत: रूग्ण सुरक्षित राहतात. रूग्णाचे सामान्य आरोग्य चांगले झाले पाहिजे सेप्टिकच्या सूक्ष्मजीवांचा नायनाट झाला पाहिजे. कायनोटोमाईन गोळया दिवसातून 3 ते 4 वेळा घेण्यामुळे चांगला आराम मिळतो. मधाबरोबर आणि गरम पाण्याबरोबर हेमिप्लेक्स घेणे सुद्धा उपयोगी आहे. अशा संदर्भांमधील बद्धकोष्ठता स्पोलॅक्स किंवा टॅक्सिन ने दुरूस्त केली पाहिजे. पचन आणि शौचास साफ होणे याकडे योग्य लक्ष पुरविले पाहिजे. आल्बो सांग वरील औषधांशी जुळवून घेते (सुसंगत आहे).

## जखमा आणि कापणे

जखमांवर आणि कापलेल्या जागी त्वरीत असेप्टिक (जंतूसंसर्ग-रोधक) मलमपट्टी करणे आवश्यक आहे. मलमपट्टी करण्याच्या उद्देशासाठी रीपॅन्टोचा वापर केला जाऊ शकतो. पू होतो त्यावेळी असेप्टिक मलमपट्टी करण्याआधी तो पू आधी काढून टाकणे अधिक चांगले असते आणि जखम बरी होण्यासाठी हर्बो-सल्फचा वापर केला जाऊ शकतो. सर्व सेप्टिक जखमांसाठी हेमोप्लेक्स दिले जाऊ शकते. कापलेल्या जागी जखम बरी होण्यासाठीची पावडर घालता येते आणि मलमपट्टी करता येते. सेप्टिक स्थिती टाळण्यासाठी एन्ट्रॉप्स लावता येते.

## नखुरडे

हेअंगठा किंवा बोटांची जळजळ होणारे तीव्र संक्रमण आहे. जर संक्रमण खूप व्यापक आणि वेदनादायक असेल तर शस्त्रक्रियेचा अवलंब केला जाऊ शकतो. लिंबूवर्गीय फळांचे सेवन उपयुक्त असल्याचे आढळले आहे.

## मुडदूस (ऑस्टिओमॅलेसिया)

याचा संबंध जीवनसत्व डी चा अभाव असण्याशी आणि कॅल्शियमचे चयापचय बिघडले असण्याशी असतो. ही स्थिती सामान्यपणे वाढ होणा-या मूलांमध्ये दिसून येते. हे गर्भावस्था किंवा स्तनपान करते वेळी सकस आहाराचे सेवन न केल्यामुळे आणि सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे सुद्धा होऊ शकते. लहान मूलांमधील सुरूवातीची लक्षणे म्हणजे बेचैनी, डोक्यावर जास्त प्रमाणात घाम येणे आणि जळजळणे. लगेचच हाडांच्या टोकांचे भाग जाड होणे, दात येण्यास उशीर होणे असे बदल दिसून येतात. हे मूल उशीरा चालायला लागते. या मूलांमध्ये पोटाचा आकार वाढणे, पाय वाकलेले असणे, पाय आतल्या बाजूला वाकलेले असणे आणि इतर विकृती विकसित होऊ शकतात. कृत्रिमरित्या आहार देण्यात येणा-या बाळांमध्ये दिसून येणारे हे सामान्य लक्षण आहे. मुडदूस होणे टाळले पाहिजे आणि तसेच त्यावर उपचार केला पाहिजे. अशा संदर्भांमध्ये त्याच्यातील कॅल्शियम घटकाच्या प्रमाणाच्या दृष्टीने आल्बो सांग अत्यंत उपयोगी आहे. नवजात बालकांना स्तनपानाचा उपयोग होतो. पण मातेला जीवनसत्व डी आणि कॅल्शियम ने समृद्ध असलेला आहार दिला पाहिजे, नियमितपणे अल्बोकॅल दिले पाहिजे.

## लैंगिक क्षमतेतील अपुरेपणा किंवा नपुसंकत्व

हा अपुरेपणा शारीरिक अशक्तपणा, चेतासंस्थेची दुर्बलता, मानसिक स्थिती किंवा काही संक्रमण आणि त्याच्या गुंतागुंती यांमुळे असू शकतो. याचे कारण यकृताचे विकार किंवा गोनोरिया(जननेंद्रियाच्या मार्गातील गंभीर संक्रमण) किंवा सिफिलिस (एक प्रकारचा गुप्त रोग) सारखे लैंगिक विकार असू शकते.

उपचारासाठी रुग्णाचा इतिहास सहानुभूतीपूर्वक ऐकण्याची आवश्यकता असते. पोषक द्रव्ये, लैंगिक क्षमतेमध्ये एक महत्वाची भूमिका बजावतात. रूग्णांना नियमित व्यायाम करण्याचा आणि विवाहबाह्य लैंगिक संबंध न ठेवण्याचा सल्ला दिला पाहिजे. सेन्जाईन लैंगिक क्रियांना सौम्य उत्तेजना देते. नसांची दुर्बलता असल्याच्या संदर्भात, व्हिटेस्सन दिले जाऊ शकते. आल्बो सांग चा वापर एक टॉनिक म्हणून केला जाऊ शकतो.

## पुरूषांमध्ये रात्री वीर्यपतन होणे

ब-याच व्यक्तींना रात्री होणा-या वीर्यपतनाची अनावश्यक चिंता वाटते. एखाद्या तरूण पुरूषामधील आठवड्यातून एकदा होणारे वीर्यपतन हे नैसर्गिक असल्याचे मानले पाहिजे. रात्रीच्या वेळी होणारी ही वीर्यपतने, तथापि, जे ब-याच वर्षांपासून स्वत:ला दोष देत राहिले आहेत आणि ज्यांची रचनात्मक स्थिती बिघडली आहे त्यांच्या बाबतीत हा एक आजार बनू शकतो. अगदी या संदर्भांमध्ये सुद्धा निराश होण्याची आवश्यकता नाही. तथापि, नियमितपणे ताक, लिंबाचा रस पिण्याने, लिंबूवर्गीय फळे खाण्याने आणि तात्पुरते मांसाहारी अन्न खाणे टाळण्याने हे प्रतिबंधित केले जाऊ शकते. रूग्णाने मद्यपान करू नये. अशा रूग्णांना आल्बो सांग आणि नेव्हॉस्स घेण्याचा सल्ला दिला जातो. जेव्हा वीर्यपतनाचा संबंध नपुसंकत्वाशी असतो तेव्हा वीर्यपतनासाठी, आल्बो सांग आणि सेन्जाईन लहान मात्रेमध्ये दिले जाऊ शकते.

## फॉस्फेटयुरीया (लघवीमध्ये जास्त प्रमाणात फॉस्फेट असणे)

ज्या लोकांच्या लघवीमधून खूप जास्त फॉस्फेटेस जाते त्यांच्यासाठी व्हिटेस्सन बरोबर नेव्हॉस्स देणे चांगले असते. फॉस्फेटयुरीया काही वेळा वीर्यपतनाबद्दल चुकीचा समज निर्माण करते. ताक आणि फळे यांमुळे फॉस्फेटयुरीया कमी होऊ शकतो.

## दमा

ब्रॉन्कायल (श्वास नलिकांशी संबंधित) दमा हे एक चिकित्सालयीन संलक्षण आहे ज्याची लक्षणे असतात अचानक घरघर आवाज येणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे जे श्वासनलिका निमुळत्या झाल्यामुळे हवेच्या

प्रवाहाला प्रतिकार होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे होते हे पुढील गोष्टींमुळे सुद्धा होऊ शकते: (1) ऍलर्जी (2) भावनिक ताण येणे जो आघात किंवा ताण यामुळे होतो आणि (3) श्वसन मार्गाचे जीवाणूजन्य किंवा विषाणूजन्य संक्रमण जे प्रतिजैविकांनी संक्रमण नियंत्रित केल्यानंतर बरे होते.

पण मुख्य दोन संबंधित प्रक्रिया आहेत ब्रॉन्कोस्पाझ्म (श्वासनलिकांचे अचानक आकुंचन होण्यामुळे श्वास घेण्यामध्ये अडथळा निर्माण होणे) आणि श्वास नलिकांच्या आतील पदराचा (श्लेष्मल त्वचेचा) दाह. असे दिसते आहे की दम्यामधील श्वास नलिकांमध्ये अडथळा येणे जिवाणू संसर्गाच्या विकासास प्रवृत्त करू शकते.

दम्याची लक्षणे अशी असतात श्वास घेण्यास त्रास होण्याचा स्पॅझ्मोडिक हल्ला/ऍटॅक्स (श्वास नलिकांमधील स्नायूंचे आकुंचन झाल्यामुळे नळया निमूळत्या होणे) आणि खोकला येणे आणि गुदमरल्यासारखे वाटणे आणि छातीमध्ये आणि घशामध्ये आवळल्यासारखे होणे. दम्याचा हल्ला/ऍटॅक नेहमी रात्री येतो आणि रूग्ण श्वास घेण्याचा प्रयत्न करत जागा होतो. रूग्णाला खूपच यातना होत असतात आणि जास्तीची हवा मिळावी यासाठी अंथरूणातून उठून खिडकी उघडण्याचा एक प्रयत्न करू शकतो. सर्वात आधी छातीची हालचाल होत नसते, पण नंतर येथे खोलवर, हळूहळू उश्वास सोडले जातात, त्याचबरोबर जोरात घरघर आवाज येतो. ब्रॉन्कायल दमा असलेल्या रूग्णांना रोगाच्या मूळ घटकांबद्दल शिक्षित करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ काही आहार घटक किंवा औषधे, मद्य, अप्रिय वास, अनपेक्षित गोष्टी दृष्टीस पडणे, भावनात्मक बिघाड इ. मुळे ऍलर्जी होणे, ब्रॉन्कायल दम्याचा एखादा हल्ला/ऍटॅक शांत केला जाऊ शकतो. आरोग्याकडे सामान्य लक्ष देऊन आणि थकवा, बद्धकोष्ठता आणि जड जेवण करणे या गोष्टी टाळून एखादा हल्ला/ऍटॅक प्रतिबंधित करण्यासाठी बरेच काही करता येते. रात्रीचे जेवण खूपच हलके असले पाहिजे आणि संध्याकाळी लवकर केले तर उत्तम असते. उपचार कारणानुसार देता येतो. एखादा हल्ला/ऍटॅक रोखण्यासाठी लक्ष देणे गरजेचे आहे. लहान मूले आणि प्रौढ या दोघांमध्ये श्वसन क्रियेचा व्यायाम करणे अत्यंत मौलाचे असते. ब्रॉन्कायल दम्याचा स्पॅझ्मोडिक हल्ला/ऍटॅक्स रोखण्यासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी डेस्मा गोळया अत्यंत उपयोगी असतात.

## लहान बाळांचा आणि लहान मूलांचा उपचार

पुढे आई होणा-या स्त्रिला वेळेवर सूचित शिक्षण दिले जाते. तिला योग्य आहार, व्यायाम यांची गरज असते, कोणताही शारीरिक किंवा मानसिक ताण देऊ नये, किंवा भावनिकरित्या अस्वस्थ होऊ नये. पहिल्या त्रैमासिकात कोणतेही औषध देण्याचा सल्ला दिलेला नाही कारण त्यांमुळे नवजात बालकांमध्ये विकृती निर्माण होऊ शकते. गर्भाचा विकास होण्यासाठी कॅल्शियम, लोह आणि फॉलिक ऍसिड असलेली टॉनिकची औषधे आवश्यक असू शकतात. अल्बोकॅल, अल्बोव्हिट आणि आल्बो सांग ही अपेक्षित औषधे आहेत आणि तिस-या खेपेला ती दिली पाहिजेत. बाळाची रचना बहुतेककरून पालकांच्या रचनेवर, गर्भवती असतानाची औषधे आणि गरोदरपणातील अडथळा निर्माण करू शकणारी संक्रमणे आणि त्याच्या उपचारासाठी वापरण्यात

आलेली औषधे यांवर अवलंबून असते. लहान मूले संक्रमणासाठी खूपच संवेदनशील असतात. वाढत्या वयातील संक्रमणांमुळे, गतिमंदत्व येऊ शकते किंवा वाढ खुंटू शकते. संक्रमणाकडे त्वरीत लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे, उदा. देवी, कांजिण्या, गोवर, पोलियो, डांग्या खोकला इ., या गोष्टी प्राथमिक आणि द्वितिय लसिकरणाने रोखल्या जाऊ शकतात. गर्भवती महिलांप्रमाणेच, वाढणा-या मूलांना सुद्धा समृद्ध आणि सहज पचणा-या आहाराची आणि जीवसत्व उपचाराची आवश्यकता असते. आल्बो सांग हाडांच्या विकासासाठी उपयोगी आहे आणि वाढणा-या मूलांसाठी याची शिफारस करण्यात आली आहे. सॉलफॉस देऊन पचन क्रिया व्यवस्थित करता येते. बायो-साल हे वातहारक आहे आणि ढेकरा येण्यासाठी लहान मूलांना याची शिफारस करण्यात आली आहे. लहान मूलांमधील भूक न लागणे वर हर्बिटार्स सिरप ने उपचार केले जातात. मलेरीया मधील यकृताचा आकार वाढण्यावरील उपचार कायनोटोमाईन सिरपची लहान मात्रा देऊन केला जाऊ शकतो.

**दात येणे**

दात येण्याची क्रिया सामान्यपणे 6व्या महिन्यामध्ये सुरू होते. अशक्त असलेल्या बाळांसाठी हा एक त्रासदायक अवधी असतो आणि ते नेहमी उलटी आणि अतिसार याने त्रस्त असतात. जेव्हा अपेक्षित अवधीमध्ये येथे दात येण्याची क्रिया नीट होत नाही, तेव्हा लहान मूलांना आल्बो सांग लिहून दिले पाहिजे जे वाढणा-या मूलांसाठीचे एक आदर्श उत्पादन आहे. पोषण कमी होत असलेली लहान मूले सामान्यपणे दोषयुक्त दात येण्याने त्रस्त असतात. पालकांनी त्यांच्या मूलांची काळजी घेतली पाहिजे आणि दात येण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. दात येण्याच्या वेळी बायो-साल विशेषकरून उपयोगी आहे. जर बाळास खूपच त्रास होत असेल तर व्हिटेस्सिन द्या. पालकांनी लहान मूलांना दाताच्या स्वच्छतेच्या चांगल्या सवयी शिकविल्या पाहिजेत (दात घासणे आणि दातातील फटी स्वच्छ करणे).

**रक्त दाब**

वृद्धापकाळामध्ये उच्च रक्त दाब होणे हा एसेन्शियल उच्च रक्त दाब आहे. रक्त दाब वाढणे हे गरोदरपणातील विषबाधेमुळे सुद्धा असू शकेल. सामान्यपणे हे डोकेदुखी, चक्कर येणे, श्रम केल्यानंतर श्वास कमी पडणे काही वेळा चिडचिडेपणा होणे, झोप न येणे आणि छातीमध्ये धडधडणे यांचे प्रमाण वाढवते. हे हृदय आघात, मूत्रपिंड निकामी होणे, किंवा अर्धांगवायू आणि काहीवेळा आंधळेपणा या गोष्टी गुंतागुंतीच्या करू शकते. अशा तीव्र संदर्भांवर रूग्णालयामध्ये उत्तम उपचार केले जातात. काहीवेळा तरूणपणी येथे उच्च रक्त दाब होऊ शकतो, यामध्ये मूत्रपिंडाचा समावेश असतो. हे खूप गंभीर आहे. उच्च रक्त दाब मानसिक कारणांमुळे सुद्धा असू शकतो आणि अशा संदर्भांना उच्च रक्तदाब रोधक एजंटने कधीही उपचार करू नये. व्हिटेस्सन चिंता आणि काळजी करणे कमी करण्यासाठी आवश्यक आहे. आल्बो सांग रक्त दाब कमी होणे किंवा रक्त दाब जास्त होणे दोन्हीमध्ये

टॉनिक म्हणून दिले जाऊ शकते आणि बद्धकोष्ठता स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई किंवा टॅक्सिन ने दुरूस्त केली गेली पाहिजे.

एसेन्शियल उच्च रक्त दाबाचा उपचार: औषधाच्या उपचाराबरोबर आहाराच्या सवयींचे नियंत्रण करणे, रात्री हलके जेवण घेणे, धूम्रपान आणि मद्यपान, जास्त प्रमाणात चहा किंवा कॉफी घेणे टाळणे यांसारख्या खबरदा-या घेणे अत्यंत आवश्यक असू शकेल. फळाचा रस हा आणखिन एक आवश्यक घटक आहे कारण हा बद्धकोष्ठतेचे निर्मूलन करतो आणि लघवीचे प्रमाण वाढविणारे म्हणून सुद्धा काम करते. लघवीचे प्रमाण वाढविणारी औषधे सामान्यपणे पेशींमधील जास्तीचे द्रवाचे प्रमाण कमी करते आणि रक्त दाब खाली आणते. म्हणून फळाचा रस एक पोषक एजंट म्हणून काम करते तसेच लघवीचे प्रमाण वाढविणारे म्हणून सुद्धा काम करते.

**रक्तस्त्राव**

रक्तस्त्राव होणे किंवा रक्त जाणे (हेमरेज) याचे स्वरूप नाकातून रक्त येणे किंवा मूळव्याधामधील रक्त जाणे किंवा गर्भाशयातून रक्तस्त्राव होणे या स्वरूपात असू शकतो. तीव्र रक्तस्त्रावाचा संबंध सामान्यपणे शॉकशी असू शकतो. व्हिटेस्सन लिहून दिले जाते जे एक गुंगी आणणारे औषध म्हणून काम करण्याद्वारे शॉक प्रतिबंधित करते आणि चिनियमकोचा वापर प्राथमिक उपाय म्हणून केला जातो.

**कानाचे संक्रमण**

येथे कानाच्या बाह्य भागाची संक्रमणे किंवा मध्य कर्णाची संक्रमणे असू शकतात.

बाह्य कानाचे संक्रमण: सामान्यपणे एन्ट्रॉप्स किंवा जखम ब-या करणा-या पावडरने (चूर्णाने) याचा उपचार केला जातो.

मध्य कर्णाचे संक्रमण: हे तीव्र किंवा जुनाट असू शकते. तीव्र संक्रमणाचा संबंध सामान्यपणे तीव्र वेदना होणे किंवा काहीवेळा ताप येणे याच्याशी असू शकतो. हे लहान मूलांमध्ये सामान्य असते. अशी वेदना डेसिल+ ने लक्षणात्मकरित्या बरी केली जाऊ शकते. जुनाट संक्रमण हे कानातील ड्रम फाटल्यामुळे स्त्राव वाहण्यामुळे गुंतागुंतीचे असते. काहीवेळा येथे भागश: कर्ण बधिरता येऊ शकते. या स्थितीसाठी प्रतिजैविकाने दीर्घकाळ उपचार करणे आणि बाह्य वापरासाठी ऍन्टीसेप्टिक कानाचे ड्रॉप्स घालणे आवश्यक असते. एन्ट्रॉप्स आणि हेमोप्लेक्स चा उपयोग केला जाऊ शकतो. घसा गुळण्या करून पूर्णपणे स्वच्छ केला पाहिजे. सामान्य आरोग्याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

**स्त्रीरोगशास्त्राचे (गायनेकोलॉजिकल) विकार**

येथे गर्भाशय आणि योनी, फॅलोपियन ट्यूब्स (अंडाशयातून गर्भाशयात बीज वाहून नेणा-या) आणि अंडाशय (प्रजनन मार्ग) यांच्याशी संबंधित रोग असू शकतात. विकार संप्रेरकांमधील असंतुलनांमुळे किंवा अवयवामध्ये व्रण/जखम झाल्यामुळे किंवा अनियमित पाळी होण्यामुळे असू शकतात. हे तारूण्यात, रजोनिवृत्तीच्या वेळी किंवा या दोन्हीच्या दरम्यान होऊ शकतात. मासिकपाळी, खूप रक्तस्त्राव होणे, कमी रक्तस्त्राव होणे आणि वेदनेसह किंवा वेदनेशिवाय असू शकते. वरच्यासाठीचे कारण निश्चित करा आणि त्याप्रमाणे उपचार करा. अशा संदर्भांमध्ये व्हिटेस्सनचा वापर एक गुंगी आणणारे/वेदनाशामक म्हणून केला जाऊ शकतो.

**वेदनादायक मासिक पाळी (डॉयसमेनोरिया)**

मासिकपाळीच्या वेळी वेदना होणे. योनीचे फायब्रॉईडस (योनीच्या पेशींची वाढ) सारख्या अवयवांच्या कारणामुळे हे होऊ शकते पण अधिक सामान्यपणे कोणत्याही जखमेशिवाय/व्रणाशिवाय होते. अशा रूग्णांना गुंगी आणणा-या/वेदनाशामक औषधाची, विश्रांतीची आवश्यकता असते आणि फर्स्ट लाईन (पहिला) उपचार म्हणून खात्रीशीर औषधाची आवश्यकता असते. ब्रॉम्हडाइन किंवा ब्रॉम्हडाइन सिरप हे पिळवटून/कळ येऊन वेदना होण्यासाठीच्या औषधाची निवड आहे. व्हिटेस्सन एक गुंगी आणणारे/वेदनाशामक म्हणून दिले जाऊ शकते. तीव्र संदर्भांमध्ये, चिनियमको किंवा ऍमिग्लिया घेण्याचा सल्ला दिला जातो. सामान्य आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे उदा. नियमित व्यायाम, अशक्तपणा आणि बद्धकोष्ठता यांचा उपचार करणे.

**गर्भाशयाचे इतर विकार**

अमेनोरिया (मासिकपाळीमध्ये रक्तस्त्राव कमी होणे) संदर्भामध्ये औरॅटिनम दिले जाऊ शकते. मोनेरेजिया (वेदनादायक मासिकपाळी) आणि मेट्रोहॉगिया (मासिकपाळीमध्ये रक्तस्त्राव खूप होणे) यांसाठी, चिनियमको हा बरोबर उपाय आहे. या सर्व स्थितींमध्ये ब्रॉम्हडाइन किंवा ब्रॉम्हडाइन सिरप दिले जाऊ शकते कारण हे गर्भाशयाचे एक टॉनिक आहे.

**अंगावरून पांढरे जाणे (ल्युकोरिया)**

अंगावरून पांढरे जाणे याचे कारण निश्चितपणे माहित नाही पण हे सामान्यपणे अशक्त रचना असलेल्यांमध्ये दिसून येते. अशा संदर्भांमध्ये चैतन्य वाढविण्यासाठी आल्बो सांग आणि अल्बोव्हिट उपयोगी आहेत. सौम्य संदर्भांमध्ये ब्रॉम्हडाइन किंवा ब्रॉम्हडाइन सिरपचा पहिल्यांदा एक मुख्य उपाय म्हणून वापर करून पाहिला पाहिजे. तीव्र संदर्भांमध्ये औरॅटिनम आणि चिनियमको एकत्रपणे उपयोगी आहेत. अंगावरून पांढरे जाण्याचा

संबंध काहीवेळा लैंगिक संक्रमणाशी असू शकतो. अशा संदर्भांमध्ये सूक्ष्मजंतूरोधक एजंटसनी त्या जागेचा आणि शारीरिक उपचार करणे आवश्यक असते आणि योनीच्या जळजळीसाठी ऍंन्टिसेप्टिक्स ने उपचार करावा. अशा संदर्भांमध्ये तोंडावाटे देण्यात येणारे औषध, लोबाईन हे अत्यंत उपयोगी आहे.

## गरोदरपणा

गरोदरपणामध्ये आल्बो सांग, अल्बोकॅल आणि अल्बोव्हिट हे आईच्या पोषणासाठी मदत करते. गर्भाच्या विकासासाठी या गोष्टींची मदत होते. हे स्तनपान करणा-या महिलांना सुद्धा दिले जाऊ शकते.

## प्रसुति

काही वेळा प्रसुतिकाळ खूप अवघड असू शकतो. औरॅटिनम प्रसुति सरळ आणि नैसर्गिक होण्यासाठी मदत करते. हे प्रसुति कळांना प्रवृत्त करते जेव्हा त्या कमकुवत (हळू) असतात किंवा अजिबात नसतात तेव्हा. औरॅटिनम आणि चिनियमो दिले जाऊ शकते. व्हिटेस्सन हे प्रसुति काळामध्ये चिंता दूर करण्यासाठी खूप मौलिक आहे. जर प्रसुति होण्यास विलंब झाला आणि रूग्ण चिंतातूर किंवा आक्रमक झाला असेल तर व्हिटेस्सन दिले पाहिजे. जर प्रसुति नंतर रक्तस्त्राव मोठ्या प्रमाणात झाला तर चिनियमको दिले जाऊ शकते. प्रसुति नंतर ताप आल्यास ती एक गंभीर बाब आहे. जर याकडे दुर्लक्ष केले गेले, तर हे काहीवेळा पू होण्यामुळे (सेप्सिस) गुंतागुंतीचे असू शकेल.

## ताप येणे

हे अनेक कारणांमुळे होऊ शकते. उदाहरणार्थ सन स्ट्रोक मुळे ज्याचा उपचार पूर्ण विश्रांती देऊन, फळाचा रस, पाणी देऊन आणि आवश्यकता असल्यास डेसिल+ देऊन केला जातो. फ्लू चा उपचार फ्लुजेन आणि डेसिल+ यांनी केला जातो. अंगदुखी, नसा दुखणे, स्नायू दुखणे आणि ताप येणे यांवर नियंत्रण करण्यासाठी याची मदत होऊ शकते. हृमॅटिक (संधिवाताशी संबंधित) ताप येण्यामध्ये डेसिल+ उपयोगी आहे. हे ताप कमी करते आणि वेदना शमवते.

## डोकेदुखी

हे विविध तीव्रता असणा-या अनेक वेगवेगळया रोगांचे एक लक्षण आहे. अनेक ताप येण्याच्या स्थितींमध्ये, सुरूवातीला सामान्य सर्दीसह तीव्र आणि तात्पुरती डोकेदुखी होत असल्याचे आढळून आले आहे. डोकेदुखीची

इतर सामान्य कारणे म्हणजे बद्धकोष्ठता, डोळयांना-ताण येणे, चिंता चेतासंस्थेचा विकार, उच्च रक्त दाब, नाकाचा किंवा कानाचा रोग, मायग्रेन (तीव्र डोकेदुखी), अशक्तपणा/रक्तहीनता, मूत्रपिंडाचा रोग इ.
योग्य उपचार करण्याआधी कारण निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. डोकेदुखींची लक्षणे बरी करण्यासाठी डेसिल⁺ चा वापर नियमितपणे केला जाऊ शकतो कपाळावर रबजॉन लावण्याने आराम मिळतो. झोपायच्या वेळी व्हिटेस्सन घेतल्यामुळे शांत झोप लागते.

**केसांचे आणि डोळयावरील त्वचेचे विकार**

केस गळणे, सामान्य दुर्बलता, जीवनसत्वाचा अभाव किंवा बुरशीजन्य संक्रमण यांमुळे असू शकते. सामान्य दुर्बलतेमध्ये, आल्बो सांग खूप उपयोगी आहे. ओलोसिन खोबरेल तेलामधे मिसळून दररोज डोक्याच्या त्वचेवर बोटांनी चोळले असता शांत झोप येते. ओलोसिन केसांच्या वाढीसाठी मदत करते आणि केस गळणे थांबविते. जर डोक्यावरील त्वचेवर झालेला गजकर्ण (रींगवर्म) केस गळण्याचे कारण असेल तर केस बारीक कापून स्किनमेंटचा वापर केला जाऊ शकतो.

**हृदय विकार**

हृदय रोगांनी त्रस्त असलेल्या एखाद्या रूग्णास श्रम करण्यामुळे श्वास कमी पडू शकतो, छातीची धडधड वाढू शकते, छातीमध्ये वेदना होऊ शकते, किंवा पाऊलांवर सूज येते, दाब दिल्यावर त्वचा खाली जाते. हृदय रोग अनेक कारणांमुळे होऊ शकतो. उदाहरणार्थ संक्रमण (म्हणजे ह्रमॅटिक/संधिवाताशी संबंधित ताप येणे ज्यामुळे मिट्रल स्टेनोसिस (हृदयातील डाव्या कप्प्याच्या झडपा निमूळत्या होणे) नावाचा एक वाहिन्यांचा रोग). डेसिल⁺ मुळे ताप आणि सांध्यांचा दाह कमी होऊ शकतो. पण त्या जागी झालेल्या पू वर उपचार करण्यासाठी प्रतिजैविकांची आवश्यकता असू शकते. हृदयाची धडधड होणा-या आणि श्वास कमी पडणा-या रूग्णांना ग्रॅन्डिको दिले जाऊ शकते. एंजायना पिक्टोरीस (हृदयामध्ये तीव्र वेदना होणे) सारख्या हृदयाच्या विकारावर ऍमिग्लिया ने उपचार केला जाऊ शकतो. हृदयधमनीमध्ये रक्ताची गुठळी होणे हा अत्यंत गुंगागुंतीचा संदर्भ आहे आणि रूग्णाने अंथरूणामध्ये पूर्ण विश्रांती घेतली पाहिजे किंवा त्याला रूग्णालयामध्ये दाखल केले पाहिजे आणि वेदनाशामके, गुठळीरोहक आणि  व्हॅसोप्रेसर (वाहिन्यांचे आकुंचन करणारी औषधे) औषधाने उपचार केला पाहिजे. कोणतेही सारक औषध देण्याची शिफारस करण्यात आलेली नाही. अशा संदर्भांमध्ये फळाचा रस अत्यंत उपयोगी आहे. काहीवेळा पचनाशी संबंधित विकारांमुळे हृदयाच्या विकारांमध्ये निश्चितपणे वाढ होते, मुख्यत: गॅसेस/वात झाल्यामुळे. म्हणून पचनाशी संबंधित विकारांची स्थिती सॉलफॉस, गॅस्ट्रोमोन आणि स्पोलॅक्स-ई देऊन नीट ठेवली पाहिजे.

## मूत्रपिंडाशी संबंधित दुखणे (रेनल कोलिक)

तीव्र पिळवटून/कळ येऊन दुखणे हे मूत्रपिंडाशी संबंधित वेदना होण्याचे लक्षण आहे. ही वेदना लंबर प्रदेशात (मूत्रपिंड असते त्याच्या पाठीमागच्या भागात) अनुभवली जाऊ शकते आणि खाली मूत्राशयाकडे सरकते. ही पिळवटून/कळ येणारी वेदना असते, जी सामान्यपणे खड्यामुळे होते, ज्यांचा आकार वेगवेगळा असू शकतो. लहान खडा किंवा वाळूच्या कणाच्या आकाराचा खडा मूत्रमार्गामध्ये सहज खाली जाऊ शकतो आणि लघवीमधून निघून जाऊ शकतो काहीवेळा मूत्राशयामध्ये राहतो (जर आकार मोठा असेल तर). मोठ्या खड्यांवर मूत्रमार्गांवर परिणाम होऊ शकतो किंवा मूत्रपिंडाशी संबंधित वेदना वाढवून खूप त्रास होऊन निघून जाऊ शकतो. ही स्थिती निर्माण होण्याआधी रूग्ण खालच्या बरगड्या आणि ओटीपोटाच्या मधे वेदना होत असल्याची तक्रार करतो, अधूनमधून एॅटॅक येत असतो किंवा मूत्रपिंडाशी संबंधित वेदना अधिक असते. वारंवार मूत्र विसर्जन झाले पाहिजे पण याचे प्रमाण कमी असते आणि बहुतेककरून यामध्ये रक्त असते. जेव्हा खडा मूत्रमार्गातून खाली बाहेर पडत असतो, तेव्हा वेदनेची तीव्रता खूप वाढते. हे काहीवेळा सहन होत नाही आणि शॉक निर्माण होतो. वेगवेगळया कालावधीनंतर हा खडा अचानक निघून जातो आणि वेदना होणे थांबते. याच्यावर कळ येणे रोधकाने उपचार केला जातो. भरपूर पाण्यासह लिंबूवर्गीय फळाचा रस आणि ताक त्याबरोबर लिंबाचा रस असे आलटून पालटून दिल्यामुळे खड्याची वाढ होणे रोखले जाते आणि लहान खडे निघून जाण्यास मदत होते. मुख्य उपाय म्हणजे तुरैको हा आहे जे लघवीमधून अल्बुमिन जाण्यासाठीचा सुद्धा एक उत्कृष्ठ औषध आहे, जेव्हा पाठीमध्ये वेदना होत असते, तेव्हा बाह्य भागावर रबजॉन लावले जाऊ शकते.

## तोंड, जीभ, आणि दात

तोंडाला दुर्गंधी येणे हे पचनाच्या हस्तक्षेपामुळे, दातांची नीट निगा न राखल्यामुळे, अस्वच्छतेच्या स्थिती, ज्याचा संबंध संक्रमणाशी असू शकतो म्हणजे, हिरड्यांमधून पू स्त्रवणे किंवा काहीवेळा जीवनसत्व सी चा अभाव असणे (म्हणजे स्कर्व्ही) यांमुळे होते. काहीवेळा येथे अपचनाशी संबंधित तोंडाचा अल्सर्स (व्रण) होऊ शकतो.  औषधीय दाताच्या पावडरचा वापर दंतमंजन म्हणून केला जाऊ शकतो ज्यामुळे हिरड्यांचा दाह कमी होतो आणि हिरड्यांमधून पू स्त्रवणे रोखून ठिसूळ हिरड्यांचे दुखणे शमवले जाते. रूग्णांना लिंबूवर्गीय फळाचा रस, त्याबरोबर आल्बो सांग नियमितपणे घेण्याचा सुद्धा सल्ला दिला जातो. एन्ट्रॉप्स सारख्या एका एॅण्टीसेप्टिकने वारंवार तोंड धुणे आवश्यक आहे. नंतरच्याने सुद्धा वेदना कमी होतात, कारण हे एक वेदनाशाकम, एॅण्टीसेप्टिक आणि दाह-रोधक आहे. गुंगागुंतीच्या संदर्भांमध्ये, दंतवैद्यांना भेट दिली आहिजे. नियमितपणे दाताची तपासणी करून घेण्याचा सल्ला दिला जातो.

## हिरड्यांमधून पू स्त्रवणे (पायोरिया)

ही एक दाहक स्थिती आहे ज्याचा संबंध पू तयार होण्याशी असतो जो दात आणि हिरड्या जेथे एकत्र येतात त्या जागी तयार होतो. हिरड्या आकसतात आणि मागच्या बाजूस जातात, त्यामुळे दात सैल होतात. याच्याबरोबर तोंडाला दुर्गंधी येणे सुद्धा असू शकते. हिरड्यांमधून पू स्त्रवण्यामुळे अन्न चावून त्याचा लगदा करण्यावर परिणाम होऊ शकतो आणि त्यामुळे पचनाचे विकार होतात. हा पू गिळला जाऊ शकतो किंवा कोणत्यातरी रितीने रक्त-प्रवाहामध्ये शोषला जाऊ शकतो आणि यामुळे सामान्य आरोग्य गंभीरपणे बिघडू शकते. आमच्या औषधीय दाताच्या पावडरचा आणि एन्ट्रॉप्सचा वापर करण्यामुळे हिरड्यांमधून पू स्त्रवण्याला आळा बसतो आणि रोखले जाते. याचा वापर सकाळी आणि रात्री झोपायच्या वेळी केला पाहिजे, आणि जर येथे हिरड्यांचा दाह/सूज खूप जास्त असेल तर शक्यतो प्रत्येक जेवणानंतर केला पाहिजे. जर स्थिती खूपच पुढच्या टप्प्यावर/वाईट नसेल आणि खराब दात काढून टाकच्याची आवश्यकता नसेल तर एन्ट्रॉप्स हिरड्यांमधून पू स्त्रवणे बरे करण्यासाठीचा एक उपयोगी उपाय आहे.

**दात दुखणे आणि तोंड येणे (तोंडाचा अल्सर)**

दातदुखीवर डेसिल+ ने उपचार केला जातो. हिरड्यांना सूज येणे ज्याचा संबंध हिरड्यांच्या दाहाशी असतो त्याच्यावर आणि तीव्र वेदनेवर, वेदना आणि दाह/सूज यांपासून आराम मिळविण्यासाठी एन्ट्रॉप्स ने उपचार केला जाऊ शकतो. जर परिणाम हळू असेल, एक गुंगी आणणारे/वेदनाशाक म्हणून व्हिटेस्सन दिले जाऊ शकते. बद्धकोष्ठता स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई किंवा टॅक्सिन ने दुरूस्त केले जाते. औषधीय दाताची पावडर सकाळी आणि रात्री झोपायच्या वेळी वापरली जाते. जीवनसत्व सी किंवा लिंबाचा रस किंवा लिंबूवर्गीय फळाचा रस नियमितपणे दिला पाहिजे. जर सेप्सिस (पू होणे) तीव्र असेल तर, सूक्ष्मजीवी-रोधक एजंटसचा वापर केला पाहिजे.

**नाक**

नाक चोंदणे काहीवेळा खूपच त्रासदायक असते. जेव्हा नाक बंद होते तेव्हा ते काही गुंतागुंती निर्माण करू शकते जसे की ऍडेनॉईडस (नाकाच्या आणि घशाच्या मागच्या बाजूच्या मऊ भिंतीला सूज येणे त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे) किंवा सायनसायटिस (नाकाच्या पोकळीचा दाह) यांचा उपचार एन्ट्रॉप्स ने केला पाहिजे. हे नाकाच्या जुनाट त्रासापासून आराम देते. सकाळी आणि संध्याकाळी श्वासोच्छस्वासाचे व्यायाम सुरू केले पाहिजेत आणि 5 ते 10 मिनिटांसाठी नियंत्रित केले पाहिजेत.

**मूळव्याध**

हे गुदद्वाराच्या मुखाचे व्रण/चिरा पडणे पेक्षा वेगळे आहे. मूळव्याध शौचास नीट साफ न झाल्यामुळे असू शकते, बद्धकोष्ठता आणि पाणी कमी पिण्यामुळे, शौचास होते वेळी खूप जास्त प्रमाणात जोर द्यावा लागणे किंवा मल विसर्जित होणे अवघड जाणे, किंवा कडकपणा येणे यांमुळे असू शकते. या घटकांमुळे केवळ मूळव्याध होत नाही तर ते आधीच रक्तवाहिन्यांना पीळ पडणे, फुगणे किंवा सुजलेल्या असणे (व्हेरीकोज व्हेन्स) यांमुळे झालेल्या इजेने तीव्र रक्तस्त्रावासाठीसुद्धा जबाबदार असतात.

**आतील मूळव्याध** जो आतड्यामध्ये/मल विसर्जनाचा मधे होतो त्यामुळे जड होण्याची एक भावना निर्माण होते आणि जेव्हा मल बाहेर पडते त्यावेळी वास्तविक वेदना होते. येथे थोडा रक्तस्त्राव होऊ शकतो ज्याची प्रवृत्ती अतिशय वाईट होण्याची असू शकते आणि जेव्हा ते जुनाट होते तेव्हा यामुळे रक्तहीनता/अशक्तपणा होऊ शकतो.

**बाह्य भागाचा मूळव्याध** मूळव्याधामध्ये काहीवेळा रक्ताची गुठळी होते. जर रक्ताची गुठळी झाली, मूळव्याधाला सूज येते, खूपच मऊ होते आणि वेदनादायक होते. अशा संदर्भांमध्ये शस्त्रक्रियेचा उपचार करण्याची आणि प्रतिजैविकांनी उपचार करण्याची आवश्यकता असते. केवळ रक्त नियंत्रित करणे हा उपचार नाही. कारण गुंतागुंतीच्या मूळव्याधामध्ये (दुस-या किंवा तिस-या किंवा चौथ्या श्रेणीचा मूळव्याध) शस्त्रक्रियेच्या उपचाराची आवश्यकता असते. शौचास होण्याच्या (आतड्याच्या हालचाली) सवयी नियंत्रित करून आणि स्पोलॅक्स किंवा स्पोलॅक्स-ई ने बद्धकोष्ठता दुरूस्त करून मूळव्याध (पहिल्या श्रेणीचा) बरा केला जाऊ शकतो. अशा संदर्भांमध्ये कोणतेही रेचक औषध देऊ नये. जेव्हा येथे रक्तस्त्राव होतो, तेव्हा मल विसर्जन झाल्यानंतर हातमोजे घालून बोटाने गुदद्वाराच्या आतमध्ये रीपॅन्टो लावावे. चिनियमको गोळ्या तोंडावाटे दिल्या जातात. वेदना शमविण्यासाठी आणि रक्तस्त्राव थांबण्यासाठी हे मदतगार असू शकेल. फिशर्स मध्ये गुदद्वाराला कापल्यासारखा बारीक चिरा पडलेल्या असतात, रीपॅन्टोने याचा उपचार केला जातो. बद्धकोष्ठता होण्याचे टाळले पाहिजे पण द्रवरूप पॅराफिन व्यतिरिक्त कोणतेही रेचक देण्यास अनुमती नाही.

**प्रोलॅप्सस ऍनी (गुदद्वाराच्या भिंती/मलमार्ग गुदद्वार मुखातून बाहेर येणे)**

अतिसार किंवा जुलाब होऊन गेल्यानंतर कमी पोषण झालेल्या लहान मूलांमध्ये सामान्यपणे मलमार्ग बाहेर येतो/अंग बाहेर येते.  जर ते आपोआप आत गेले नाही तर हळूवार दाबून बाहेर येणे कमी केले जाऊ शकते. रीपॅन्टो त्या जागी लावला येते. अंग बाहेर येण्याच्या श्रेणीवर शस्त्रक्रियेचा उपचार अवलंबून असतो.

**मुरूम/तारूण्य पिटिका**

याच्यासाठीच्या औषधाची निवड गिगि सिरप आहे जे 6 महिन्यांपर्यंत चालू ठेवले जाऊ शकते. जेव्हा सूजलेला भाग फुटतो तेव्हा जखमेची मलमपट्टी करण्यासाठी रीपॅन्टो लावा. मुरूमामध्ये, चरबी नसलेल्या आहाराची शिफारस करण्यात आली आहे. रूग्णांना लिंबूवर्गीय फळे, ताक, लिंबू आणि दररोज बाहेर सौम्य व्यायाम करणे याला अनुमती देण्यात आली आहे. रूग्णाने दररोज खूप पाणी प्यायले पाहिजे.

**ह्रूमॅटिक (संधिवाताशी संबंधित) ताप येणे किंवा तीव्र ह्रूमॅटिझम (संधिवात)**

ही एक तीव्र ताप येणारी स्थिती आहे ज्याची लक्षणे असतात सांध्यांमध्ये तीव्र दाहक बदल होणे आणि हृदयाशी संबंधित गुंतागुंती होणे. एका विशिष्ट हल्ल्यामध्ये/एॅटॅक मध्ये येथे घशाचे एक प्राथमिक संक्रमण असते आणि बहुतेक करून सर्वात पहिल्यांदा गुडघ्याच्या सांध्यावर परिणाम होतो, ते वेदनादायक बनतात, लालसर आणि सुजलेले होतात. यानंतर यामध्ये इतर मोठ्या सांध्यांचा समावेश होतो. सेप्टिक होण्यावर लक्ष दिले पाहिजे आणि याचा उपचार सूक्ष्मजीवी-रोधक एंजटस ने केला पाहिजे आणि सांधे दुखण्यापासून आराम मिळण्यासाठी आणि ताप लक्षणात्मकरित्या कमी करण्यासाठी डेसिल+ दिले जाऊ शकते. जर चेसॉल किंवा रबजॉन बाह्य भागावर लावण्याबरोबर लोबाईन वापर करणे जोडले गेले तर त्याचे सहक्रियात्मक मौल्य वाढते. बहुतेक संदर्भांमध्ये आराम त्वरीत मिळतो, विशेषत: जेव्हा तेथे दाह होत असतो तेव्हा. पचनक्रिया आणि नियमित मल विसर्जित होणे याकडे लक्ष देणे आवश्यक असेल.

**सायटिका (पाठ, कंबर, कुल्ले, पोट-या यांमध्ये वेदना कळा येणे)**

पाठ, कंबर, कुल्ले, पोट-या या भागांमधील नसांमधील दाहक बदलांमुळे किंवा नसेच्या सभोवतालच्या भागांमध्ये दाब सदृष जाणीव होण्यामुळे पायामध्ये वेदना होणे. मूलगामी उपचार करणे खूप कंटाळवाणे/त्रासदायक असते. कारणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जेव्हा तेथे मऊ झालेले नसते तेव्हा वेदना कमी करण्यासाठी लक्षणात्मकरित्या डेसिल+ दिले जाऊ शकते. रबजॉन सारखे एक जळजळ रोधक बाह्य भागावर लावता येते. शेक दिल्यानंतर रेमोरीन तेल हळूवारपणे लावले जाऊ शकते. झोप यावी यासाठी व्हिटेस्सन दिले जाऊ शकते.

**लंबॅगो (कंबरेच्या भागामध्ये वेदना होणे)**

हे वरवरच्या भागामध्ये असलेल्या स्नायूंचा किंवा पाठीच्या कणाच्या नसांचा समावेश असल्यामुळे होते. स्नायू दुखण्यावार डेसिल+ ने उपचार केला जाऊ शकतो. स्नायू दुखण्याचे कारण निश्चित केले पाहिजे आणि त्यानुसार उपचार केले पाहिजेत. डेसिल+ हा लक्षणात्मक उपचार म्हणून दिला पाहिजे आणि रबजॉन आणि रेमिरीन तेल बाह्य भागावर लावण्यासाठी वापरले पाहिजे.

**घशाचे संक्रमण**

याच्यामुळे घशाचा दाह होतो. जेव्हा येथे जळजळ किंवा सूज असते, तेव्हा एन्ट्रॉप्सने गुळण्या करण्याची शिफारस करण्यात आली आहे आणि डेसिल+ वेदनेसाठी दिले जाते. एन्ट्रॉप्स गिळू नये. रूग्ण बरा होईपर्यंत रूग्णास हेमोप्लेक्स दिले पाहिजे.

**टॉन्सिलायटिस**

ही लहान मूलांमधील सामान्य गुंतागुंत आहे. येथे दाह होणे/सूज येणे, घशामध्ये दुखणे आणि गिळण्यास त्रास होणे होऊ शकते. ताप खूप जास्त येऊ शकतो, टॉन्सिल्स (घशातील एक प्रकारच्या ग्रंथी) सुजलेल्या आणि चोंदलेल्या असतात, श्वास घेताना धाप लागते आणि जबड्याच्या कोनामध्ये असलेल्या ग्रंथींचा आकार मोठा होतो आणि त्या वेदनादायक असतात. अशा संदर्भांचा उपचार डेसिल+ (12 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मूलांसाठी वैद्यकीय देखरेखी खाली वगळता डेसिल+ देण्याची शिफारस करण्यात आलेली नाही) आणि हेमोप्लेक्स ने केला जातो. एन्ट्रॉप्सने गुळण्या करण्याने मदत होते. मानेवर बाह्य भागावर रबजॉन लावले असता उपयोगी असल्याचे सिद्ध झाले आहे. सेप्टिक होणे (पू होणे) किंवा घशाचे संक्रमण घालवण्यासाठी त्याच्या बरोबरीने प्रतिजैविकांच्या एका नियमित कोर्सचा वापर करणे आवश्यक आहे. वेदना आणि दाह हळूहळू कमी होतात. सामान्य आरोग्य सुधारण्यासाठी नंतर आल्बो सांग चा वापर केला पाहिजे.

**मूत्रसंस्थेचे त्रास**

वारंवार लघवीला होणे (जास्त प्रमाणात नाही) हे चेतासंस्थेच्या अशक्तपणामुळे होऊ शकते, ज्याचा उपचार नेव्हॉस ने केला जातो. जास्त प्रमाणात आणि वारंवार लघवीला होणे हे मधुमेहामुळे असू शकते ज्यासाठी मेर्सिना चा वापर केला जातो. वीर्यपतन होण्यावर, सेन्जाईन दिले जाते. वेदनेशी संबंध असलेले लघवी साचून राहणे, यावर चिनियमको आणि तुरैको चा वापर केला जातो. सर्व संदर्भांमध्ये चैतन्य वाढविण्यासाठी आल्बो

सांग दिले पाहिजे. जर लघवी साचून राहणे अडथळयामुळे होत असेल, तर लघवी होण्याचे प्रमाण वाढविणारे औषध दिले पाहिजे. शस्त्रक्रियेच्या उपचाराची मदत घेतली पाहिजे.

**अंथरूणात लघवी होणे**

लहान मूलांमध्ये अंथरूणामध्ये लघवी होणे हे अत्यंत सामान्य आहे आणि नेहमी खूप त्रासदायक असते. असे रूग्ण सामान्यपणे उदासीन असतात. येथे व्हिटेस्सन आणि नेव्हॉस्स दिले जाऊ शकते. लहान मूलाचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करा आणि त्याला जास्तीचे प्रेम दाखवा. लहान मूलास झोपायल जाण्याच्या कमीतकमी 3 तास आधी आहार दिला पाहिजे. झोपायच्या वेळी मूत्राशय रिकामे केले पाहिजे.

**मायग्रेन (तीव्र डोकेदुखी)**

याला अर्धशिशी असे सुद्धा ओळखले जाते. काही संदर्भांमध्ये हा हल्ला/ऍटॅक तीव्र असू शकतो. याची लक्षणे असतात, वेदना होणे, कपाळावर किंवा गालांवर मऊपणा उत्पन्न होणे. याचा संबंध सायनसायटिसशी (नाकाच्या पोकळयांचा दाह होणे) सुद्धा असू शकतो. डेसिल+ ने लक्षणात्मक उपचार करणे परिणामकारक सिद्ध होते. थोड्या थोड्या अंतराने व्हिटेस्सन देण्यामुळे तात्पुरता आराम मिळतो. त्वरीत आराम मिळण्यासाठी, रूग्णास ऍमिग्लिया दिले जाऊ शकते. तीव्र संदर्भांमध्ये रूग्णास एखाद्या अंधा-या खोलीमध्ये ठेवले पाहिजे आणि मल विसर्जनाचे नियंत्रण केले पाहिजे. मानसिक आणि शारीरिक ताण येणे टाळले पाहिजे.

सहजपणे पचन होणारे अन्न घेतले पाहिजे. चरबीयुक्त आहार आणि ज्यामुळे मायग्रेनचा ऍटॅक होतो हे माहित असते असे काहीही खाणे टाळले पाहिजे. जेव्हा रूग्णास झोप येत नाही तेव्हा व्हिटेस्सन दिले जाऊ शकते. हल्ल्यांच्या/ऍटॅक्सच्या दरम्यान व्हिटेस्सन आणि गॅस्ट्रोमोन दिले पाहिजे. हर्बिटार्सचा नियमित वापर केल्याने हल्ले/ऍटॅक्स टाळले जाऊ शकतात. योग्य चष्म्याचा वापर करून दृष्टीतील दोष दुरूस्त केले पाहिजेत. सायनसायटिसचा उपचार एका नाकाच्या पोकळीच्या ऍन्ट्रल (जबड्याच्या वरच्या भागातील हाडांमधील एखाद्या नाकाच्या पोकळीमध्ये उघडणारी नाकाची पोकळी) वॉशने (धुण्याच्या साधनाने) केला जातो.

**इनफ्लुएंझा (फ्लू)**

इनफ्लूएंझा, ज्याला सामान्यपणे फ्लू असे म्हणतात, जो एखाद्या विषाणूमुळे झालेला एक संक्रामक/संसर्गजन्य रोग आहे. या रोगाची अत्यंत सामान्य लक्षणे आहेत थंडी वाजणे, ताप येणे, घसा खवखवणे, स्नायू दुखणे, तीव्र डोकेदुखी, खोकला येणे, अशक्तपणा/थकवा आणि सामान्य अस्वस्थता. गंभीर संदर्भांमध्ये इनफ्लुएंझा मुळे

न्युमोनिया होतो, जे जीवघेणे असू शकते, विशेषत: तरूण आणि वयस्करांसाठी. विशेषकरून, जेव्हा संक्रमित व्यक्ती खोकते किंवा शिंकते तेव्हा हवेमधून इनफ्लुएंझाचा प्रसार होतो. इनफ्लुएंझा थेट संपर्कानि किंवा नाकातून स्त्राव गळण्यामुळे किंवा दूषित पृष्ठभागाशी संपर्क आल्याने सुद्धा प्रसारीत होऊ शकतो. इनफ्लुएंझा ऋतूमधील साथीच्या रोगांमध्ये पसरतो, याचा परिणाम म्हणून दर वर्षाला अनेक मृत्यु होतात.

फ्लुजेन हे निवड करण्यात येणारे औषध आहे जे कमीतकमी सात दिवस घेतले जाते. स्नायू दुखीवर आणि ताप येण्यावर डेसिल+ चा वापर केला जातो. रूग्णांना भरपूर विश्रांती घेण्याचा, भरपूर द्रवपदार्थ पिण्याचा, मद्य पिण्यापासून आणि तंबाखुचा उपयोग करण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो. फ्लुजेनचा वापर एक प्रतिबंधात्मक औषध म्हणून सुद्धा केला जातो विशेषत: ऋतुमधील साथिच्या रोगाच्या वेळी.

**रोगांचे, औषधांचे वर्गीकरण आणि वापरासाठी ते कसे लिहून द्यावे.**

I. **वर्गीकरण**: रोगांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले जाऊ शकते:

(1) क्रियात्मक रोग: (उदा., सायकोन्युरोसिस/मानसिक विकृती) अशा संदर्भांसाठी उपचार करणा-या फिजिशियनकडून मन:शाती, खात्री आणि सल्ला देण्याची आवश्यकता असते.

(2) रचनात्मक रोग:

यामध्ये काही अवयवांचा समावेश आहे. उदाहरणार्थ: मूत्रपिंड, यकृत किंवा अंतःस्त्रावी ग्रंथी. त्यांचे कार्य दुर्बल झालेले असते. ते दुरूस्त करण्यासाठी औषधाच्या उपचाराची आवश्यकता असते.

II. **वर्गीकरण**: रोगांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले जाऊ शकते:

(1) गंभीर रोग: (म्हणजे, तीव्र रोग). उदाहरणार्थ: लोबार (फुफ्फुसांमधील मांसल भाग) न्युमोनिया, तीव्र जुलाब होणे. येथे फिजिशियनचे त्वरीत लक्ष देणे आवश्यक आहे.

(2) जुनाट रोग: (सामान्यपणे कमी तीव्रता असणारे)

येथे सामान्यपणे दीर्घकाळ राहणारे रोग आहेत आणि याचा संबंध गुंतागुंतीशी असेल किंवा असणार नाही. उदाहरणार्थ: सिफिलिस (एक प्रकारचा गुप्त रोग), नसेच्या गुंतागुंतीसह किंवा शिवाय.

III. **वर्गीकरण**: रोगांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले जाऊ शकते:

(1) जन्मजात रोग: (म्हणजे., जन्मल्यापासूनचा रोग)

उदाहरणार्थ: पहिल्या गर्भावस्थेमध्येम घेतलेल्या औषधांमुळे विकृती निर्माण होणे (टीप: या अवधी दरम्यान कोणतेही औषध घेऊ नये.

(2) प्राप्त झालेले/लागलेले रोग:

ते असे असू शकतात:

(a) आघाताचे रोग (इजा झाल्यामुळे किंवा भाजल्यामुळे इ.)

(b) सांक्रमिक/संसर्गजन्य रोग (रोगनिदानात्मक किंवा विषाणूजन्य सूक्ष्मजीवी किंवा परजीवी/किटक यांमुळे).

(c) दाहक रोग: उदाहरणार्थ: त्वचेला पुरळ येणे, ब्रॉन्कायल (श्वासनलिकेशी संबंधित) दमा.

(d) ऍलर्जिक विकार: उदाहरणार्थ: त्वचेला पुरळ येणे, ब्रॉन्कायल (श्वासनलिकेशी संबंधित) दमा.

(e) जीवनसत्वाचा अभाव असणे: उदाहरणार्थ: बेरीबेरी, स्कर्व्ही, रातांधळेपणा आणि प्रथिनांच्या अभावामुळे सूज येणे.

(f) घातक/जीवघेणे रोग: उदाहरणार्थ: कर्करोग, ल्युकेमिया (पांढ-या रक्तपेशींची संख्या कमी होणे)

(g) चयापचयाचे विकार: उदाहरणार्थ: हायपरथायरॉडिझम (थायरॉईडचे प्रमाण जास्त होणे), मधुमेह.

(h) औषधामुळे प्रेरीत रोग:

- ❖ संबध नसलेल्या औषधांचा वापर करणे किंवा औषधांचा दुरूपयोग करणे.
- ❖ औषधांची मात्रा जास्त किंवा अपूरी घेणे.
- ❖ अनेक औषधनिर्माण संस्थांचे आणि औषधांची परस्पर क्रिया होणे.
- ❖ जेव्हा विरूद्ध लक्षण दर्शवित असते तेव्हा त्या औषधाचा वापर करणे, याचा परिणाम म्हणून काही प्रतिकूल प्रतिक्रिया होतात किंवा मूत्रपिंड, यकृत आणि अस्थिमज्जेला कायमची हानी पोहोचते.

IV. **वर्गीकरण**: रोगांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले जाऊ शकते:

(1) त्वचा आणि श्लेष्मल त्वचेचे विकार. उदाहरणार्थ: सेप्टिकच्या जखमा, डोळे येणे, बॅसिलरीजन्य जुलाब (जीवाणूजन्य संक्रमण), मूत्र मार्गाचे संक्रमण.

(2) शारीरिक रोग:

(a) जठरआतड्याशी संबंधित: उदाहरणार्थ: पेप्टिक अल्सर (पोटाच्या आतल्या पदराला आणि लहान आतड्याच्या वरच्या भागाला व्रण पडणे).

(b) मध्यवर्ती चेता संस्था: उदाहरणार्थ: अपस्मार.

(c) ऑटोनॉमिक (स्वयंनियंत्रित) चेता संस्था: उदाहरणार्थ: उच्च रक्त दाब.

(d) हृदय धमनी संस्था: उदाहरणार्थ: एंजायना पिक्टोरीस (हृदयामध्ये तीव्र वेदना होणे), हृदय धमनीमध्ये गुठळी होणे.

(e) श्वसन संस्था: उदाहरणार्थ: श्वास नलिकेशी संबंधित दमा, फुफ्फुसांचा क्षयरोग.

(f) मूत्रपिंड: उदाहरणार्थ: नेफ्रायटिस (मूत्रपिंडाला सूज येणे/दाह होणे), नेफ्रोसिस (मूत्रपिंडाचा रोग).

(g) यकृत: उदाहरणार्थ: संक्रणात्मक हेपटायटिस ज्यामुळे कावीळ होते.

(h) अस्थि मज्जा किंवा रक्त: उदाहरणार्थ: रक्तहीनता/अशक्तपणा.

(i) प्रजनन संस्था: उदाहरणार्थ: अमेनोरिया (मासिक पाळी न येणे), डॉयसमेनोरिया (वेदनादायक मासिक पाळी).

(j) डोळे, कान, नाक आणि घसा यांच्याशी संबंधित रोग.

**कसे लिहून द्यावे:**

**पथ्य/औषधाचा उपचार**

जेव्हा रोग तीव्र असतो तेव्हा त्वरीत लक्ष देणे आवश्यक असते, नाहीतर यामुळे गुंतागुंत होऊ शकते किंवा ते जुनाट होऊ शकते. तीव्र रोगासाठी छोट्या अवधीच्या उपचाराची आवश्यकता असते उदा. न्युमोनिया, गोनोरिया(जननेंद्रियाच्या मार्गातील गंभीर संक्रमण) हे एका आठवड्यात बरे केले जाऊ शकतात. पण जुनाट रोगांसाठी 40-60 दिवसांच्या उपचाराची आवश्यकता असते. क्षयरोगासाठी कमीतकमी एक आणि दीड वर्षाच्या उपचाराची आवश्यकता असते. कुष्ठरोगासाठी विशिष्ट केमोथेरपेटिक (रासायनिक उपचार) एजंटने 4-8 वर्षे उपचार करण्याची आवश्यकता असते. सर्व जुनाट संदर्भांमध्ये सामान्य दुर्बलता/अशक्तपणा असतो आणि अशा संदर्भांचा उपचार टॉनिकच्या औषधांनी केला जातो आणि हळूहळू बरे होत असताना सहज पचन होणारा आहार देऊन केला जातो. अपू-या अवधीसाठी घेतलेली अपूरी मात्रा अनेक गुंतागुंती वाढवू शकते.

**टीप:**

1. विशेष टॉनिकचे औषध जे पोषण समृद्ध करते ते आल्बो सांग, अल्बोव्हिट आणि अल्बोकॅल आहे.

2. ती संयुगे ज्यांची पचन संस्थेवर थेट क्रिया होते ते आहेत: बायो-साल, चिनियमको, डयासिन, गॅस्ट्रोमोन, हर्बिटार्स, कायनोटोमाईन, मॅग्नाईन, सल्फोझ, स्पोलॅक्स, स्पोलॅक्स-ई आणि टॅक्सिन.

3. ती औषधे जी थेट चेता संस्थेवर क्रिया करतात ती आहेत अगरको, ऍमिग्लिया, डेसिल+, लिव्हॅक्टिन-जी, नेव्हॉस, सेन्जाईन आणि व्हिटेसन.

4. ती औषधे जी रक्तावर क्रिया करतात (टॉनिक आणि शुद्धीकरणाचे साधन) ती आहेत: आल्बो सांग, हेमोप्लेक्स, लोबाईन, मेडिटॅब, हर्बो-सल्फ आणि गिगि सिरप.

5. ती औषधे जी श्वसन संस्थेवर क्रिया करतात ती आहेत: डॅन्जाईन, डेस्मा, कॉफलिनआणि मेडिटॅब.

6. ती औषधे जी मूत्र संस्थेवर क्रिया करतात ती आहेत : नेव्हॉस आणि तुरैको.

7. ती औषधे जी रक्ताभीसरण संस्थेवर क्रिया करतात ती आहेत: ऍमिग्लिया, औरॅटिनम, ग्रॅन्डि-को, लिव्हॅक्टिन-जी, गिगि सिरप आणि हाईपसिल.

8. गर्भाशयावर क्रिया करणारी औषधे आहेत: औरॅटिनम, ब्रॉम्हडाइन सिरप आणि चिनियमको.

(1) तीव्र रोगांमध्ये एक एकमेव उपाय किंवा संयोजन त्रास बरा करण्यासाठी पुरेसा असू शकतो.

(2) तीव्र संदर्भ आणि दमवणूक करणा-या रोगांमध्ये, हळूहळू बरे होण्याच्या वेळी पोषणाकडे आणि पचनाकडे योग्य लक्ष दिले पाहिजे.

(3) औषधाची क्रिया ऊतींच्या कार्यात्मक अखंडतेवर, रूग्णाच्या रचनेवर आणि त्याच्या पोषणावर अवलंबून असते.

वैद्यकीय व्यावसायिकांचे (प्रॅक्टिश्नर) यश त्याच्या वैज्ञानिक ज्ञानावर, रोगाच्या नमुन्याच्या परिचयावर, औषधनिर्माणशास्त्राच्या क्रिया, औषधांमध्ये असलेला विषारीपणा या गोष्टी समजून घेण्यावर तसेच एका विशिष्ट रोगामध्ये औषधाची योग्य निवड करण्यावर अवलंबून असते.

औषध हे एक शास्त्र आहे, आणि उपचार करणे ही एक कला आहे. म्हणून, फिजिशियननी, त्यांच्या सिद्धांतिक तसेच रोगांच्या नैदानिक या दोन्ही पैलूंची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

वैद्यकीय व्यावसायिकांना रोगांच्या मूळ घटकांबद्दल माहित असले पाहिजे आणि उपचार सुरू करण्याच्या आधी पूर्णपणे तपासणी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या रोगाच्या तीव्र लक्षणांकडे आणि खुणांकडे लक्ष दिले पाहिजे.

**वितरीत करणे/देणे**

मात्रेचे मोजमाप, रूग्णाच्या वयानुसार केले पाहिजे. नवजात बालके आणि लहान मूले यांना लहान मात्रेची आवश्यकता असते, कारण त्यांची यकृत एन्झाईम संस्था पूर्ण विकसित झालेली नसते. त्याचप्रमाणे वृद्धावस्थेमध्ये पूर्ण किंवा उपचारात्मक मात्रा देण्याची शिफारस करण्यात आलेली नाही. सामान्यपणे त्यांना प्रौढांच्या उपचारात्मक मात्रेच्या ¾ मात्रेची आवश्यकता असते कारण वृद्धापकाळामध्ये झीज होण्याच्या बदलांमुळे यकृत कार्ये दुर्बल झालेली असतात आणि औषधांचे योग्यरितीने चयापचय होत नाही. उपचारात्मक सूचीमध्ये लिहून देण्यात आलेली मात्रा ही एका प्रौढ (20 ते 60 वर्षे वयाच्या दरम्यानच्या) व्यक्तीसाठीची आहेत. म्हणून साधारणपणे 10 वर्षे आणि त्यापेक्षा कमी वयाच्या लहान मूलांना प्रौढांच्या उपचारात्मक मात्रेच्या अर्ध्या मात्रेची आवश्यकता असते. लहान मूलांना केव्हाही गोळीच्या स्वरूपातील किंवा पावडरच्या/चूर्णाच्या स्वरूपातील औषध देऊ नये आणि कोणतीही औषधे जबरदस्तीने देऊ नयेत, कारण याचा परिणाम उलटी होण्यामध्ये होतो. या औषधांची पूड केली पाहिजे आणि मध किंवा सिरप मध्ये मिसळून स्वादीष्ट केली पाहिजेत. अतिसारामध्ये आणि जुलाब होत असताना विशिष्ट औषधाच्या उपचाराची आवश्यकता असते आणि डिहायड्रेशन (शरीरातील पाणी कमी होणे) आणि विषारीपणा निर्माण होणे, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. वरवरच्या वेदनांवर डेसिल+ ने उपचार केला पाहिजे. डेसिल+ हे अतिसार, टायफॉईड, तीव्र पोट दुखी आणि जठराचा दाह होणे यामध्ये विरूद्ध लक्षण दर्शवते. 12 वर्षांपेक्षा कमी वयाच्या लहान मूलांना डेसिल+ केवळ वैद्यकीय देखरेखीखालीच दिले पाहिजे.